

यशवंतराव चव्हाण
प्रतिष्ठान, मुंबई

# वार्तापत्र

वर्षा अंक



यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार २०१७








राज्यस्तरीय चर्चासत्र

तृतीयपंथीयांसाठी
स्वतंत्र धोरणाची आवश्यकता

# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

ट्रस्ट रजि. नं. एफ. १०६४३, दिनांक १७ सप्टेंबर १९८५, सोसायटी रजि. नं. एम. एम. एच. /बी. ओ. एम. - ५३९/८५

यशवंतराव चव्हाण सेंटर, जन. जगन्नाथराव भोसले मार्ग, मुंबई - ४०० ०२१.
दूरध्वनी क्रमांक : २२०२८५९८, २२०४५४६० फॅक्स : २२८५२०८१/८२


## ➢ विश्वस्त मंडळ सदस्य ➣

| | |
|---|---|
| १. मा. श्री. शरदराव पवार | अध्यक्ष |
| २. मा. श्री. अरुण गुजराथी | उपाध्यक्ष |
| ३. मा. सौ. सुप्रिया सुळे | कार्याध्यक्ष |
| ४. मा. श्री. श. गं. काळे | सरचिटणीस |
| ५. मा. श्री. हेमंत टकले | कोषाध्यक्ष |

६. मा. श्री. शिवाजीराव पाटील-निलंगेकर
७. मा. श्री. राम प्रधान
८. मा. श्री. वसंतराव कार्लेकर
९. मा. श्री. दिलीप वळसे-पाटील
१०.मा. श्री. अजित निंबाळकर
११.मा. श्री. बी. के. अग्रवाल
१२.मा. श्री. अमित डहाणूकर
१३.मा. श्री. डॉ. समीर दलवाई
१४.मा. श्री. ना. धों. महानोर
१५.मा. सौ. प्रभा कुलकर्णी

**महाराष्ट्र शासन प्रतिनिधी**

१६.मा. श्री. नितीन करीर
प्रधान सचिव, नगर विकास विभाग
१७.मा. श्री. एन. जे. जमादार
सचिव व वरिष्ठ विधी सल्लागार

## ➢ कार्यकारिणी मंडळ सदस्य ➣

१. मा. श्री. शरदराव पवार
२. मा. श्री. अरुण गुजराथी
३. मा. सौ. सुप्रिया सुळे
४. मा. श्री. श. गं. काळे
५. मा. श्री. हेमंत टकले
६. मा. श्री. जयंत पाटील
७. मा. श्री. राम ताकवले
८. मा. श्री. ना. धों. महानोर
९. मा. श्री. लक्ष्मण माने
१०.मा. श्री. विनायकराव पाटील
११.मा. श्री. के. बी. आवाडे
१२.मा. श्री. प्रकाश कुलकर्णी
१३.मा. श्री. जीवनराव गोरे
१४.मा. श्री. विजय शिर्के
१५.मा. श्री. जयराज साळगांवकर
१६.मा. श्री. गणपतराव अप्पासाहेब पाटील
१७.मा. श्री. राजेश टोपे
१८.मा. श्री. बाळासाहेब ऊर्फ शामराव पां. पाटील
१९.मा. श्री. यशवंतराव गडाख-पाटील
२०.मा. श्री. चंद्रशेखर मारुतराव घुले-पाटील
२१.मा. अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. (पदसिद्ध)

**महाराष्ट्र शासन प्रतिनिधी**

२२.मा. श्री. नितीन करीर
प्रधान सचिव, नगर विकास विभाग

## ➢ कार्यकारी समिती ➣

| | | | |
|---|---|---|---|
| १. मा. श्री. शरदराव पवार | अध्यक्ष | ५. मा. श्री. हेमंत टकले | कोषाध्यक्ष |
| २. मा. श्री. अरुण गुजराथी | उपाध्यक्ष | ६. मा. श्री. अजित निंबाळकर | विश्वस्त सदस्य |
| ३. मा. सौ. सुप्रिया सुळे | कार्याध्यक्ष | ७. मा. श्री. जीवनराव गोरे | सदस्य |
| ४. मा. श्री. श. गं. काळे | सरचिटणीस | ८. मा. श्री. यशवंतराव गडाख-पाटील | सदस्य |

**विभागीय केंद्र**

| | | |
|---|---|---|
| विभागीय केंद्र, कऱ्हाड | अध्यक्ष | श्री. बाळासाहेब ऊर्फ शामराव पां. पाटील |
| विभागीय केंद्र, पुणे | अध्यक्ष | श्री. अजित निंबाळकर |
| विभागीय केंद्र, नागपूर | अध्यक्ष | श्री. गिरीश गांधी |
| विभागीय केंद्र, नाशिक | मानद अध्यक्ष | श्री. विनायकराव पाटील |
| | कार्याध्यक्ष | श्री. विश्वास ठाकूर |
| विभागीय केंद्र, रत्नागिरी | अध्यक्ष | श्री. शेखर निकम |
| विभागीय केंद्र, औरंगाबाद | अध्यक्ष | श्री. अंकुशराव कदम |
| विभागीय केंद्र, लातूर | अध्यक्ष | श्री. डॉ. जनार्दन वाघमारे |
| विभागीय केंद्र, अमरावती | अध्यक्ष | – |
| जिल्हा केंद्र, अहमदनगर | अध्यक्ष | श्री. यशवंतराव गडाख-पाटील |
| जिल्हा केंद्र, सोलापूर | अध्यक्ष | श्री. गो. मा. पवार |
| जिल्हा केंद्र, अंबाजोगाई (बीड) | अध्यक्ष | डॉ. द्वारकादास लोहिया |
| जिल्हा केंद्र, ठाणे | अध्यक्ष | श्री. मुरलीधर नाले |
| जिल्हा केंद्र, जळगांव | अध्यक्ष | श्री. रवींद्र प्रल्हादराव पाटील |
| जिल्हा केंद्र, पालघर | अध्यक्ष | श्री. सुनिल देवराव रणाईत |
| नवी मुंबई केंद्र | अध्यक्ष | श्री. प्रमोद कर्नाड |
| जिल्हा केंद्र, परभणी | अध्यक्ष | सौ. संध्याताई दुधगांवकर |

**विविध विभाग**

| | | |
|---|---|---|
| सृजन | संकल्पना व संयोजक | सौ. सुप्रिया सुळे |
| शिक्षण | निमंत्रक | सौ. सुप्रिया सुळे |
| | प्रमुख संयोजक | डॉ. वसंत काळपांडे |
| नवमहाराष्ट्र युवा अभियान | संयोजक | श्री. दत्ता बाळसराफ |
| | सहसंयोजक | श्री. विश्वास ठाकूर |
| | संघटक | श्री. नीलेश राऊत |
| अपंग हक्क विकास मंच | निमंत्रक | सौ. सुप्रिया सुळे |
| | संयोजक | श्री. विजय कान्हेकर |
| वसुंधरा पर्यावरण संवर्धन अभियान | निमंत्रक | सौ. सुप्रिया सुळे |
| महाराष्ट्र महिला व्यासपीठ | संयोजिका | श्रीमती रेखा नार्वेकर |
| | कार्यकारी संयोजक | श्रीमती ममता कानडे |
| कृषी व सहकार व्यासपीठ | अध्यक्ष | श्री. अजित निंबाळकर |
| कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम | सदस्य सचिव | श्री. विनायक ना. कांबळे |

**मध्यवर्ती कार्यालय**

| | | |
|---|---|---|
| यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान व कलादालन रंगस्वर | सरव्यवस्थापक | श्री. विजय देसाई |
| यशवंतराव चव्हाण माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी | संचालक | ब्रिगेडिअर श्री. सुशील गुप्तन |
| यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई | कार्यक्रम व्यवस्थापक | श्री. दत्ता बाळसराफ |
| यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई | वित्त व लेखा व्यवस्थापक | श्री. महेश चव्हाण |
| यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई | आस्थापना व्यवस्थापक | श्री. संजय बनसोडे |
| यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई | ग्रंथालय संसाधन व ज्ञान व्यवस्थापक | श्री. अनिल पाझारे |
| मानद वास्तु विशारद | | मे. शशी प्रभू ॲण्ड असोसिएट्स |
| सांविधानिक लेखा परीक्षक | मे. सी. व्ही. के. असोसिएट्स, मुंबई | चार्टर्ड अकाउंटंट |
| अंतर्गत हिशेब तपासनीस | मार्क ॲण्ड असोसिएट्स, मुंबई चार्टर्ड अकाउंटंट | |

# संपादकीय

यशवंतराव चव्हाण यांची भूमिका आणि त्यांनी घालून दिलेल्या राजकीय घडीचे स्मरण करणे हे कधी नव्हे एवढे आज महाराष्ट्रात आवश्यक आहे, याबद्दल कुणाचेच दुमत नसेल. महाराष्ट्रातलं वातावरण आज जातीय वितुष्टाकडे ढकललं जात आहे, आणि ते शक्य तितक्या लवकर रोखायला हवं, अशीच आज महाराष्ट्रातील सर्वसाधारण जनभावना आहे. एखादा समाज जेव्हा न्यायाची अपेक्षा करतो आणि न्याय हा माझा हक्क आहे, अशी आग्रही मागणी घेऊन उभा राहतो, तेव्हा ज्यांचे हितसंबंध दुखावले जातात, त्यांच्यात आणि न्याय मागू पाहणाऱ्या समाजसमूहात संघर्ष होतच असतो. इथलाच नाही, तर हा जगभरचा सार्वकालिक अनुभव आहे. त्यामुळे, अशा संघर्षाला घाबरायचे कारण नाही. हा संघर्ष लोकशाहीच्या चौकटीत, संवैधानिक मार्गाने आणि अहिंसक झाला पाहिजे, एवढाच त्याबाबतचा आग्रह धरता येईल. भारतीय समाजाची काही वैशिष्ट्ये आहेत; आणि ही वैशिष्ट्ये इथल्या आर्थिक, सांस्कृतिक हितसंबंधांना कसा आकार देतात, या संबंधीचं स्व. यशवंतराव चव्हाण साहेबांचं चिंतन मुद्दामच या अंकाच्या सुरुवातीला दिलं आहे. परिस्थितीबाबतच्या आपल्या आकलनाची दिशा काय आहे, त्याचं हे टिपण म्हणजे प्रातिनिधीक चिंतन आहे.

समाजात वेळोवेळी उपस्थित होणाऱ्या सामाजिक, सांस्कृतिक मुद्यांना यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई नेहमीच सामोरं जातं. विधायक पद्धतीने समाजात विचार मंथन घडावं आणि सहमतीने त्याची उत्तरं शोधली जावीत, ही प्रतिष्ठानची त्यामागची भूमिका असते. आवश्यक तेथे व्यासपीठ उपलब्ध करून देऊन, कधी कलात्मक पातळीवरून त्याला वळण देण्याचा प्रयत्न आम्ही आमच्या कार्यक्रमातून करत असतो. जातीला तिलांजली देऊन जातविरहित समाजनिर्मितीचं ध्येय बाळगणाऱ्या गणपती महाराजांची संघर्ष कथा सांगणाऱ्या 'अजात' या चित्रपटाचं प्रदर्शन 'चित्रपट चावडी'वर तेवढ्यासाठीच केलं गेलं. हा चित्रपट पाहण्यासाठी झालेली गर्दी आणि त्यानंतर त्यावर झालेल्या चर्चेने चित्रपटाच्या प्रदर्शनाचा हेतू साध्य केला.

महिलांवरील अत्याचाराच्या, अन्यायाच्या मुद्यांवर चर्चा भरपूर होते पण, महिलावर्गातील उपेक्षित घटकांचे प्रश्न नेमके समजून घेऊन त्यावर थेट उत्तरं शोधण्याचा प्रयत्न मात्र त्या तुलनेत कमी होतो. बदलत्या सामाजिक वास्तवात एकल महिलांची संख्या झपाट्याने वाढली आहे. त्यांच्या एकलपणाची कारणं वेगवेगळी आहेत आणि त्यानुसार त्यांच्या सामाजिक दर्जातही मोठा फरक आहे. या महिलांच्या प्रश्नांकडे स्वतंत्रपणे बघण्याची, समजून घेण्याची गरज आहे. येत्या काळाचा विचार करून या महिलांसाठी स्वतंत्र धोरण आखलं जाण्याचीही गरज आहे. विकास अध्ययन केंद्र, कोरो, मुंबई आणि कम्युनिटी डेव्हलपमेंट ट्रस्ट व इतर स्वयंसेवी संस्था यांना सोबत घेऊन यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानने **'एकल महिलांसाठी स्वतंत्र धोरणाची आवश्यकता'** या विषयाला चालना देण्याचं ठरवलं आहे. १३ मार्च रोजी प्रतिष्ठानच्या मुंबईतील इमारतीत

त्याबाबतचं चर्चासत्र पार पडलं. या क्षेत्रात काम करणाऱ्या महाराष्ट्रातील संघटनांचे प्रतिनिधी आणि अभ्यासक त्या चर्चासत्रात मोठ्या संख्येने उपस्थित होते. या धोरणाच्या मसुद्याला आकार देण्यासाठी चर्चासत्रातच कालबद्ध कार्यक्रमही आखण्यात आला आहे.

तृतीयपंथीय हा आपल्या समाजातील सर्वाधिक उपेक्षित घटकांपैकी एक घटक. तृतीयपंथीय जेवढे उपेक्षित, त्यापेक्षाही त्यांच्याबाबतचे गैरसमज अधिक. कोंडीत सापडलेला हा घटक ही कोंडी फोडून मुक्त होऊ पाहत आहे, समाजाच्या त्यांच्याविषयीच्या धारणा बदलाव्यात यासाठी धडपडतो आहे. प्रतिष्ठानने त्यांना त्यासाठी मदत करण्याचं ठरवलं आहे. वेगवेगळ्या कारणांनी आणि विषयांवर प्रतिष्ठान त्यांना मदतीचा हात देत आहे. तृतीयपंथीयांसाठी समाजात जाणीवजागृती करायची, तर शिक्षक आणि पोलीस हे घटक त्यासाठी खूप साहाय्यकारी ठरू शकतात. भांडूपच्या पवार पब्लिक स्कूलमध्ये त्या दृष्टीने कार्यक्रम आयोजित केला गेला होता. कुलाबा पोलिस ठाण्यातही प्रतिष्ठानने विकास अध्ययन केंद्राच्या वतीने कार्यक्रम आयोजित केला होता. या दोन्ही ठिकाणी चांगला प्रतिसाद मिळाला.

प्रतिष्ठानच्या अपंग हक्क विकास मंचाचे कार्यक्रम महाराष्ट्रात सातत्याने सुरूच असतात. या कार्यक्रमांना आता आपण ज्येष्ठ नागरिकांसाठीच्या कार्यक्रमाची जोड देत आहोत. त्यांच्या प्रश्नांना अधिक तपशिलात जाऊन समजावून घेणं आणि त्या दृष्टीने धोरणात्मक पातळीवर काही गोष्टी घडवून आणणं असा हा प्रयत्न असेल. त्याचबरोबर त्यांची तपासणी करून त्यांना आवश्यक अशी सहाय्यभूत साधने उपलब्ध करून देण्याचा कार्यक्रम केंद्र सरकारच्या 'वयोश्री' या योजनेअंतर्गत हाती घेतला आहे.

फेब्रुवारी महिन्यात अंबाजोगाई केंद्राने आयोजित केलेल्या 'बालकुमार साहित्य संमेलना'चा विशेष उल्लेख करायला हवा. उत्तम तयारीने आयोजित केलेल्या या संमेलनाने काही दिवस तिथले वातावरणच बदलून गेले होते. अनेक साहित्यिकांनी या संमेलनाला बहुमोल मार्गदर्शन केले. कल्पकतेने आयोजित केलेल्या या संमेलनातील कार्यक्रमांनी बालगोपालांना अक्षरशः धमाल आली. 'चित्रपट चावडी'चे कार्यक्रम महाराष्ट्रातल्या आपल्या अनेक केंद्रांवर नियमितपणे सुरू आहेत. त्यांना उपस्थिती तर चांगली असतेच, पण त्याशिवाय चित्रपटावरील चर्चाही दर्जेदार होतात. चित्रपट पाहण्याची जाण वाढणं आणि त्या माध्यमातून व्यक्ती व समाजातील व्यवहार परिपक्वपणे समजावून घेण्याला यामुळे चांगली मदत होईल वाटते. विज्ञानगंगा, सृजन, रंगस्वर, शिक्षणकट्टा, शेतीकट्टा, दिव्यांगकट्टा हेही उपक्रम चांगल्या प्रतिसादात सुरू आहेत.

हा अंक आपल्या हाती देताना राज्यात उत्तम पाऊस पडतोय, ही समाधानाची बाब आहे. मात्र रस्तोरस्ती पडलेल्या खड्ड्याने जनता त्रस्त झाली आहे. तरीही वर्षाऋतूच्या मनःपूर्वक शुभेच्छांसह.



**(सुप्रिया सुळे)**

# वार्तापत्र

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई.
वर्ष : २२ वे / अंक ४३ वा / प्रकाशन : ऑगस्ट २०१८

सल्लागार
**मा. शरद काळे**
**मा. हेमंत टकले**

मानद संपादक
**सुप्रिया सुळे**

कार्यकारी संपादक
**दत्ता बाळसराफ**

सहसंपादक
**सुरेश पाटील**
**अनिल पाझारे**

विशेष सहाय्य
**पद्मभूषण देशपांडे**

सहाय्य
**मीनल सावंत**
**रमेश मोरे**
**मनिषा खिल्लारे**
**महेश साळवी**

**केंद्रातील सहकारी :**
विद्याधर खंडे, संगीता गवारे, स्मिता रायकर, महेश चौधरी, यतीन घोडेकर, राजेंद्र रुपवते, निवृत्ती भोर, संजना पवार, शैलेश चव्हाण, शोभा लोंढे, अनिल चिंदरकर, सुकेशनी मर्चंडे-शेवडे, सुहास बाभल, प्रियंका देसाई, विजय नागरे, जयेश गुजराथी, विश्वदत्त मुळे, सुरेश कोठावळे, महादेव सगरे, सुरेश सावंत, अशोक जाधव, मंगेश शिंदे, सतीश लाड, भक्ती जांभवडेकर, सुषमा साळुंखे, स्वाती शेलार यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल आभार

## अनुक्रमणिका

- माननीय यशवंतराव चव्हाण लेख ........ ०६

**मध्यवर्ती कार्यालय व विविध विभाग**

- नवमहाराष्ट्र युवा अभियान ........ ०९
- अपंग हक्क विकास मंच ........ १२
- शिक्षण विकास मंच ........ १७
- रंगस्वर ........ १८
- महाराष्ट्र महिला व्यासपीठ ........ १९
- यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय ग्रंथालय ........ २०
- माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी ........ २३

**विभागीय केंद्र, कार्यवृत्त**

- विभागीय केंद्र, कऱ्हाड ........ २५
- कृषी व सहकार व्यासपीठ आणि विभागीय केंद्र, पुणे ... २७
- विभागीय केंद्र, नागपूर ........ २९
- विभागीय केंद्र, रत्नागिरी ........ ३९
- विभागीय केंद्र, औरंगाबाद ........ ४३
- विभागीय केंद्र, लातूर ........ ४८
- जिल्हा केंद्र, अहमदनगर ........ ४९
- जिल्हा केंद्र, सोलापूर ........ ५०
- जिल्हा केंद्र, अंबाजोगाई ........ ५१
- जिल्हा केंद्र, ठाणे ........ ५८
- जिल्हा केंद्र, देवराष्ट्रे ........ ६०
- प्रतिष्ठानची प्रकाशने ........ ६१

हे त्रैमासिक मुद्रक-प्रकाशक-कार्यकारी संपादक श्री. दत्ता बाळसराफ यांनी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई करिता, मीडिया आर अँड डी (इं) प्रा. लि., कांदिवली (प) येथे छापून यशवंतराव चव्हाण केंद्र, जनरल जगन्नाथराव भोसले मार्ग, मुंबई ४०० ०२१ येथे प्रकाशित केले. नोंदणी क्र. ७१५८७/९९

# वर्ग संघर्ष आणि जाती संघर्ष

– यशवंतराव चव्हाण

मार्क्सने मांडलेले वर्गसंघर्षाचे तत्त्व, हा इतिहासशास्त्रातील एक क्रांतिकारक सिद्धान्त आहे. तो अमुक एका देशाला लागू आहे आणि अमुक एका देशाला लागू नाही, असे होऊ शकत नाही. हिंदुस्थानालाही तो लागू आहे. जोपर्यंत समाजात शोषित-पीडित लोक आहेत आणि त्यांना शोषून काढणारे लोक आहेत, तोपर्यंत मार्क्सचा सिद्धान्त भारतातही आहेच. शोषकांचे अत्याचार वाढतील, तसातसा हा वर्गसंघर्ष वाढत जाईल, यात मला मुळीच शंका वाटत नाही. माझे तर उलट असेच मत आहे की, हिंदुस्थानात वर्गसंघर्ष नव्हता, असे कधी झाले नाही. त्या संघर्षाची व्याप्ती अधूनमधून कमी-अधिक झाली असेल, इतकेच काय ते. पण संघर्षाची ही भावना अगदी पूर्वीही होती आणि आजही आहे; आणि मला वाटते, ती यापुढेही राहणारच आहे. कारण आपण इतर वर्गापेक्षा श्रेष्ठ आहोत, असे मानणारा वर्ग भारतात आजच्याप्रमाणेच पूर्वीही होताच आणि त्याचे ते वर्चस्व न मानता ते झुगारून द्यावे, असे वाटणारा वर्गही पूर्वी होता व आजही आहे. तेव्हा हिंदुस्थानमध्ये वर्गसंघर्ष ही काही नवीन घटना नव्हे.

वर्गसमन्वयाची भावना व भाषा आपल्या संस्कृतीत आहे, असे मानून घेणे ही देखील एक प्रकारची सोयीस्कर गैरसमजूत आहे. उलट, भारतीय संस्कृतीच्या निर्मात्यांनी या दीन-दलितांनाही काही मन आहे, भावना आहेत, याचा फारसा विचार केलेला नाही, असेच खेदाने म्हणावे लागते. समन्वयाची भाषा काढताना ती घडवून आणतानाही नेहमी दलित वर्गांना शोषणाखाली कायमचे जखडले जाईल, असाच प्रयत्न झालेला आहे. हा आपल्या समाजव्यवस्थेचा दोष आहे. शोषित आहे, तो शोषित राहू नये, असा प्रयत्न कधी झाला नाही. शोषिताने प्रतिकार करावा, इतके सामर्थ्य त्याला समाजव्यवस्थेने कधी प्राप्त होऊ दिले नाही.

भारतीय संस्कृतीच्या अगदी भरभराटीच्या काळातही चातुर्वर्ण्य-प्रणाली निर्माण करून समाजात कायमचा जातिभेद निर्माण करण्यात आला. जो शूद्र आहे, तो शूद्रच राहिला पाहिजे, असे युगानुयुगे सांगितले गेले. तेव्हा ज्या व्यवस्थेने माणसामाणसांत भेद केला, काही लोकांना हीन मानले, त्या व्यवस्थेत समन्वय हा शब्दही वर्णाश्रमव्यवस्थेला कायमरूप देण्यासाठीच होता, असेच म्हणावे लागते. हिंदुस्थानच्या इतिहासाचा असा समन्वयवादी अर्थ लावणे, हे वास्तवाकडे पाठ फिरवणे होणार आहे. शोषण करणारा समाज, वर्ग किंवा जाती आहेत, तोवर शोषित राहणारच आणि शोषित असले की, असंतोष किंवा संघर्ष येणार. हजारो वर्षांपासून हेच होत आले आहे आणि शोषणरहित समाजाचा उदय सर्व जगभर होईपर्यंत असेच घडत राहणार आहे.

वर्गसंघर्ष म्हटला की, तो अहिंसक असणे संभवत नाही. कारण एक तर वर्गविग्रहाची भावना पराकाष्ठेला पोहोचल्याशिवाय संघर्ष पेटणार नाही. संघर्ष हिंसक व्हायला नको असेल, तर तो पेटणारच नाही, अशी व्यवस्था करायला हवी. वर्गसंघर्षाने हिंसक वळण घ्यायला नको असेल, तर वर्गविग्रहाची भावना दूर करायला हवी. आर्थिकदृष्ट्या दुर्बल आहे, एवढ्या खातर कुणावर अन्याय होणार नाही, याची दक्षता घ्यायला पाहिजे आहे. आजही कुणी दरिद्री असेल, गरीब असेल, तर तो दोष त्याचा नसून संपूर्ण समाजव्यवस्थेचा आहे, असे मानले पाहिजे. ते न करता वर्गसंघर्ष हिंसक राहणार, की अहिंसक राहणार, ही चर्चा नुसती पोकळ व कोरडी ठरणार आहे. समाजात विविध स्तरांवरील वर्ग आहेत व त्यांतला एक वा अनेक सबल वर्ग दुसऱ्या कमकुवत वर्गांचे शोषण करतात, छळ करतात, हेच वर्गसंघर्षाचे मूळ कारण आहे. पूर्वी आपला समाजच अशिक्षित होता. आपल्यावर अन्याय होत असला, तरी ते 'आपले नशीब' असे मानण्याची शिकवण त्याला देण्यात आली होती. आता समाज जागा होत आहे. हरिजनही आता साक्षर होत आहेत, शहाणे होत आहेत. त्यांच्या नव्या पिढीला परंपरेने चालत आलेले अन्याय, अत्याचार सहन होत नाहीत. ते दूर करण्यासाठी आजचा शोषित कंबर कसून उभा

राहू म्हणतो आहे. त्याचा त्याच्या हक्कासाठी होणारा लढा हा वास्तविक समाजाने कौतुकाने स्वीकारला पाहिजे. इतकेच नव्हे, मी तर म्हणेन, त्याला सर्वतोप्रकारे मदत केली पाहिजे. हा संघर्ष अटळ आहे. आणि एकदा तो अटळ आहे, हे मान्य केले की, मग ती एक लढाई ठरते आणि लढाई नेहमी अहिंसकच राहिली पाहिजे, ही इच्छा चांगली आहे, पण व्यवहारात तसे घडणे अशक्य आहे.

मला वाटते, हरिजनांना अन् शोषितांना त्यांच्याच बाबतीत समाज पक्षपात करतो, असे वाटू न देणे, ही सर्वांत महत्त्वाची गोष्ट आहे. जातपात कोणतीही असो, सामाजिक प्रतिष्ठा असो वा नसो, आर्थिक स्थिती खालावलेली असो वा चांगली असो, सारा समाज आपल्याकडे 'माणूस' म्हणून पाहतो आहे, ही भावना त्यांच्यात वाढीस लावली पाहिजे. ते होणार नसेल, तर तो वर्ग संघटित होणार व आपल्या हक्कांसाठी संघर्षाला सज्ज होणार. परंतु हा वर्ग असा उग्र बनणार नाही, हिंसाचार करणार नाही. यावर उत्तम उपाय म्हणजे, समाजातील आर्थिक आणि सामाजिक विषमता दूर करणे हाच आहे. मार्क्सने सांगितलेली वर्गविग्रहाची कल्पना किंवा वर्गसंघर्षाचा सिद्धान्त त्याच्या देशात होता, तसाच्या तसा कदाचित हिंदुस्थानात दिसत नसेल. येथील निरनिराळ्या वर्गांची कल्पना व रचना कदाचित निरनिराळी असेलही, परंतु वर्ग आहेत, विषमता आहे, त्यांच्या हितसंबंधात विरोध आहे. पिढ्यान पिढ्या तो वाढतो आहे. जातिव्यवस्था ही अत्यंत वाईट स्वरूपाची वर्गविग्रह व्यवस्थाच आहे, असे माझे स्पष्ट मत आहे. या जातिव्यवस्थांना सध्या जे विकृत स्वरूप आले आहे, त्या स्वरूपासाठी त्या निर्माण करण्यात आलेल्या नव्हत्या, असे म्हणण्यात फारसा अर्थ नाही नि तसे म्हणणे म्हणजे स्वतःची फसवणूक करणे ठरेल. आपल्या समाजात प्रत्येक पिढीत किंवा युगात म्हणा, हवे तर, जातिव्यवस्था ही कायम स्वरूपाच्या जातिभेदात बदलत चालली आहे, हे ओळखणारे नेते किंवा समाजसुधारक नव्हते, की काय? पण तरीही हा ऱ्हास झाला व समाजजीवनात जातिभेदाचे हे विष खोलवर भिनले. कामावरून ठरवलेली जात जन्मावरून ठरणाऱ्या जातीला वाट करून का गेली? काम कोणतेही असो, आधी जात कोणती, त्याचा विचार त्यानंतर बळावला. त्यातूनच कामापेक्षा जन्म महत्त्वाचा ठरला आणि येथूनच आमच्या देशात जातिभेद हेच वर्गभेदाचे दुसरे नाव होऊन बसले.

आज हरिजन हा वर्ग राहिलेला नाही, ती जात बनली आहे. कदाचित शोषितांची आणि शोषकांची नवी जातच या देशात तयार होण्याचा धोका आहे. ती जात जन्मावरून नव्हे, तर आर्थिक संपन्नतेवरून किंवा विपन्नतेवरून ठरणार आहे. म्हणजे मार्क्सचा सिद्धान्त प्रत्यक्षात आलाच. भारतात तरी वर्गसंघर्ष आणि जातिसंघर्ष यांचा तोंडवळा बऱ्याच अंशी एकसारखाच आहे.

जयप्रकाशांनी हरिजनांवर होणाऱ्या अत्याचारांच्या संदर्भात वर्गसंघर्षाची कल्पना मांडली आहे. परंतु, माझ्या मते अशा वर्गसंघर्षातून हरिजनांचा लाभ होणार आहे, की नाही, या तात्विक चर्चेचा हा प्रश्न नाही. हरिजनांची आजची परिस्थिती काय आहे, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. हिंदुस्थानामध्ये आज अत्याचार ज्या पद्धतीने होताहेत, त्याची माहिती काढायचा जर प्रयत्न केला, तर असे दिसून येईल की, या सर्वांचे मूळ कारण सामाजिक अहंकाराचे आणि मोठेपणाचे जुने विचारच आहेत. त्याचबरोबर आजचे जे आर्थिक कार्यक्रम आहेत, त्या आर्थिक कार्यक्रमांना विरोध म्हणून हरिजनांवर हे अत्याचार होत आहेत.

या अत्याचारांची पाहणी करण्यासाठी माझ्या पक्षाने खासदारांच्या ज्या तुकड्या बिहार, गुजरात, उत्तरप्रदेश या राज्यांत पाठवल्या होत्या, त्यांनी आणलेल्या माहितीवरून दिसते की, ज्यांना जमिनी नव्हत्या, त्यांना जमिनी दिल्या, म्हणून त्यांच्यावर राग काढण्यात आला. कालपर्यंत बिनजमिनीचचे असलेले हे लोक आता जमिनीचे मालक व्हायला लागले, जमीनदार व्हायला लागले, हे अनेकांना पाहवले नाही.

त्याचप्रमाणे ज्यांना राहायला जागा नव्हत्या, त्यांना त्या मिळाल्या, तर अत्याचाऱ्यांनी त्या परत हिसकावून घेतल्या. वेठबिगारी पद्धतीत पिढीजात गुलामी करायला माणसे मिळत होती. त्यांना वर्षाकाठी काही धान्य दिले, थोडे कपडे दिले आणि पिढ्यान् पिढ्या आमचेच काम केले पाहिजे, म्हणून बांधून घेतले. तर अशी जी वेठबिगारी चालू होती, तिला विरोध करायला लोक उभे राहिल्याबरोबर त्यांच्यावर अत्याचार झाले आहेत. त्यातून हा संघर्ष निर्माण झालेला आहे.

म्हणजे हा संघर्ष मुळामध्ये आहेच. त्यांचे शोषण चालूच होते. त्यांचे सामाजिक, आर्थिक शोषण वर्षानुवर्षे चालले आहे आणि आज त्यांनी बरोबरीच्या नात्याने वागायचा प्रयत्न करतो म्हटल्याबरोबर त्यांच्यावरती, जणू काही आपले जन्मसिद्ध अधिकार जातील, या भावनेने शोषक त्यांच्यावर नुसती कुरघोडीच नव्हे, तर हिंसक हल्ले करतो आहे. हे चित्र काय दर्शविते? हेच की, हा वर्गसंघर्षच आहे. दुसरे काहीही नाही. आणि हा जो शोषक आहे, तो हिंसेचा वापर करून शोषिताला दाबायचा प्रयत्न करतो आहे. अशा परिस्थितीत तो शोषित वर्ग प्रतिकाराला उभा राहिला, तर त्याच्याविरुद्ध तक्रार कशी करता येईल?

अशा परिस्थितीत या वर्गाने त्याच्यावर जो अन्याय होतो आहे, त्याच्याविरुद्ध संघटित झाले पाहिजे आणि त्याचा संघटित प्रतिकार केला पाहिजे. अर्थातच संघर्ष केला पाहिजे. कारण हा त्यांच्या मूलभूत हक्काचा प्रश्न आहे. या संघर्षासाठी समाजातील सुजाण व्यक्तींनी त्याला आपणहून सर्व प्रकारची मदतही केली. कारण अशा संघर्षातून त्याला जो लाभ मिळेल, तो चिरस्थायी राहणार आहे. कुणाच्या तरी उपकाराने किंवा उदारतेमुळे त्याला काही दिले, तर त्याने त्याचे भागायचे नाही. त्याचे समाधानही होणार नाही. कुणी त्याला दया दाखवली तर त्याने काय होणार? अशा कृत्रिम मदतीने किंवा दयेने सामाजिक अन्याय, अत्याचार कधीच दूर होत नसतात. वरून येणाऱ्या कुणाच्या तरी दयेवर अवलंबून राहून सामाजिक एकता कधीच निर्माण होत नसते.

मी काही समाजात वितुष्ट निर्माण करावे, अशा मताचा नाही. वितुष्टे टाळली पाहिजेत, वितुष्टे निर्माण होणार नाहीत, असे प्रयत्न केले पाहिजेत, अशाच मताचा मी आहे. त्यासाठी समाजातल्या सर्व लोकांनी, शासकांनी, नेत्यांनी प्रयत्न केले पाहिजेत. याच भावनेने आमच्या पक्षातील खासदारांनी आणलेल्या माहितीच्या आधारे आपले पंतप्रधान मोरारजी यांना मी पत्र लिहिले आहे की, शासनाने आपली सर्व यंत्रणा या लोकांवरील अत्याचाराच्या प्रतिकारासाठी आणि असे अत्याचार होणार नाहीत, याची खबरदारी घेण्यासाठी सज्ज उभी करायला पाहिजे. हे शासनाचे काम आहे. सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रांतील जे कोणी नेते असतील, त्या सर्वांचे हे काम आहे. हा काही एका पक्षाचा वा राजकारणाचा प्रश्न नाही. समाजातील न्यायाचा प्रश्न आहे.

**– ('तरूण भारत' नागपूर,**
१९७७ च्या दिवाळी अंकातील लेख)

## विचारांचा संगम

संगम जिथे कुठे झालेला असेल, ते ठिकाण माझ्या आवडीचे असते. मला ते रम्य वाटते. स्फूर्ती देणारे, जीवनाचा एक वेगळाच अर्थ सांगणारे असे भासू लागते. नद्यांचा संगम झालेले स्थान हिंदुस्थानात पवित्र मानले जाते, पण ते धार्मिक अर्थाने. मला ते भौतिक दृष्टीने पवित्र वाटते. ते मनाला काही वेगळेच सांगत असते. दोन नद्या एकीत एक मिसळतात, तेव्हा दोन शक्तींचे मीलन झाल्याचे ते दर्शन असते. दोघी एक होऊन, एकरूप, एकजीव होऊन पुढे जातात आणि हजारोंचे जीवन संपन्न करीत असतात.

माणसामाणसांचे असे मीलन होईल, विचारांचा संगम होईल आणि माणसं एकजीव बनून कर्तृत्व करतील, तर सारेच सुखाने नांदतील, त्यांचे जीवन संपन्न बनेल, राग, व्देष, स्पर्धा, शत्रुत्व त्या संगमात मिसळून-विरघळून जाईल आणि विशुध्द जीवनाचा स्रोतच पुढे जात राहील, असे निसर्गाने निर्माण केलेल्या संगमाच्या ठिकाणी उभे राहिले, की माझे मन सांगू लागते.

**– मा. यशवंतराव चव्हाण**

# नवमहाराष्ट्र युवा अभियान

## कार्यवृत्त

नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे काम संयोजक दत्ता बाळसराफ, सहसंयोजक विश्वास ठाकूर, संघटक निलेश राऊत पाहतात. तर कार्यालयीन संघटक म्हणून सुरेश पाटील व सहाय्यक म्हणून मिनल सावंत, रमेश मोरे, मनीषा खिल्लारे, महेश साळवी कार्यरत आहेत.

**एकल महिलांसाठी स्वतंत्र धोरणाची आवश्यकता या विषयावर मान्यवरांचे मार्गदर्शन :**

दि. १३ मार्च २०१८ : यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, विकास अध्ययन केंद्र, कोरो मुंबई आणि कम्युनिटी डेव्हलपमेंट ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने 'एकल महिलांसाठी स्वतंत्र धोरणाची आवश्यकता' या विषयावर चव्हाण सेंटर मध्ये राज्यस्तरीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला विद्याताई चव्हाण, निशा शिवूरकर, आशा भिसे, दीप्ती राऊत, सुरेश शेळके आणि महेंद्र रोकडे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक रेणुका कड यांनी केले. तर एकल महिला कौटुंबिक, सामाजिक प्रश्न, उपजीविका आणि अर्थिक स्थिती या विषयावर आशालता देशपांडे, भाग्यश्री रणदिवे आणि राम शेळके यांनी मार्गदर्शन केले. 'एकल महिला आणि शासकीय योजना' या विषयावर विजय जाधव यांनी मार्गदर्शन केले. 'भटके विमुक्त समाजातील एकल महिला' या विषयावर वैशाली भांडवलकर आणि पल्लवी रेणके यांनी त्यांना आलेले अनुभव उपस्थितांना सांगितले.''एकल महिला आणि लैंगिक शोषण' या विषयावर मनीषा तोकले यांनी मार्गदर्शन केले. 'एकल महिलांच्या पाल्यांचे प्रश्न' या विषयावर करूणा महांतारे यांनी मार्गदर्शन केले. 'शहरी आणि ग्रामीण भागातील अविवाहित एकल महिलांचे प्रश्न' या विषयावर दिप्ती राऊत यांनी मोजक्या शब्दात मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला आलेल्या लोकांचे गट तयार करून चर्चा करण्यास सांगितले. त्यानंतर प्रमुख मार्गदर्शन निशा शिवूरकर यांनी केले तर अध्यक्षीय समारोप आमदार विद्या चव्हाण यांनी केला. पुढील कृती आराखडा आणि आभारप्रदर्शन दत्ता बाळसराफ यांनी केले.

**तृतीयपंथीयांच्या हक्कासाठी जाणीवजागृती मोहीम सुरू :**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई आणि विकास अध्ययन केंद्र मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने शिक्षकांसाठी Transgender Sensitiyation Training program भांडूप येथील पवार पब्लिक स्कूल मधील शिक्षकांसाठी आयोजित आला होता. कार्यक्रमामध्ये विकी शिंदे, माधुरी सरोदे आणि रेणुका कड यांनी शिक्षकांना मार्गदर्शन केले. शिक्षकांना त्यांचे प्रश्न विचारायला सांगून, सर्व प्रश्नांचे निराकरण करण्यात मान्यवरांनी केले. तसेच तृतीयपंथींयांच्या सर्व प्रश्नांवर शिक्षकांसोबत चर्चा करण्यात आली. चर्चेमुळे शिक्षकांच्या मनातील शंका दूर झाल्याचे सुमा दास यांनी सांगितले. कार्यक्रमाला सर्व शिक्षक आणि कर्मचारी यांची उपस्थिती होती.

**'गाणी श्रमिकांची' कार्यक्रमाने तरुणाईमध्ये प्रेरणा :**

मुंबई - कॉ. दत्ता देशमुख जन्मशताब्दी वर्षानिमित्त 'गाणी श्रमिकांची' हा लोकजागर कलापथक, संगमनेरचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ पत्रकार कुमार केतकर (खासदार-राज्यसभा) आणि मा. खासदार सुप्रिया सुळे उपस्थित होत्या. सदर कार्यक्रम दिनांक २९ मार्च २०१८ रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे कॉ. मोहन दत्ता देशमुख यांच्या दिग्दर्शनातून सादर झाला.

सदर कार्यक्रमाच्या अनुषंगाने कुमार केतकर यांचा खासदार झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. सत्काराबद्दल मनोगत व्यक्त करताना ते म्हणाले, आजवरच्या जडणघडणीत कॉ. एस.के. लिमये, कॉ. भाऊ फाटक, कॉ. यशवंत चव्हाण, कॉ. दत्ता देशमुख आणि कॉ. डांगे हे वेगळ्या पक्षात असले तरी, या पाच लोकांचा माझ्यावर प्रभाव आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीची पुन्हा एकदा आठवण या लोकजागर कलापथकाच्या कार्यक्रमाने श्रोत्यांना अनुभवता आली. शाहीर अमरशेख आणि अण्णाभाऊ साठे यांच्या आठवणींनाही उजाळा मिळाला. कॉ. दत्ता देशमुखांनी आपली संपूर्ण हयात कष्टकरी, कामगार आणि शेतमजुरांसाठी

घालवली. त्यांच्या संपूर्ण चळवळीत 'गाणी' हे लोकजागृतीचं हत्यार होतं. त्या सर्व आठवणी या कार्यक्रमाने जागृत केल्या. या संपूर्ण कार्यक्रमाबद्दल बोलताना डॉ. माधव चव्हाण म्हणाले की, गाणी हा चळवळीचा आत्मा आहे. त्यामुळे चळवळी जिवंत ठेवण्यासाठी, शेतकरी, कामगार, दलित, आदिवासी आणि महिलांची एकजूट उभारण्यासाठी गाणी हे प्रभावी माध्यम म्हणून तरुण लोकांनी वापरले पाहिजे. तसेच १०० वर्षाच्या सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक जडणघडणीत ज्यांनी ऐतिहासिक कामगिरी केली, त्या परंपरेची व्हर्च्युअल भिंत तयार करण्याचा संकल्प त्यांनी मांडला. सदर कार्यक्रमात 'भारतीय संविधानातील मूल्ये' या संविधान संवर्धन समितीच्या पुस्तिकेचे प्रकाशन मा. खासदार सुप्रियाताई सुळे यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाच्या आयोजनामध्ये यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, कचरा वाहतूक श्रमिक संघ, संविधान संवर्धन समिती, स्त्री मुक्ती संघटना, महिला राजसत्ता आंदोलन, कोरो, महिला मंडळ फेडरेशन, महाराष्ट्र महिला परिषद, कुसुमताई चौधरी महिला कल्याणी, शहीद भागवत जाधव स्मृती केंद्र, अनुभव मुंबई आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर शेती विकास व संशोधन संस्था सहभागी होत्या. सदर कार्यक्रमाच्या संयोजनासाठी राजेश ठोकळे, दत्ता बाळसराफ, प्रफुल्ल शिंदे आणि संजय लोखंडे यांनी विशेष परिश्रम घेतले.

**सामाजिक बहिष्कार विरोधी कायदा स्वागत व अंमलबजावणी राज्य परिषद संपन्न**

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती आणि यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, यांच्या संयुक्त विद्यमाने 'सामाजिक बहिष्कार विरोधी कायदा स्वागत व अंमलबजावणी राज्य परिषद' यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई येथे दि. ७ एप्रिल २०१८ रोजी संपन्न झाली. या कार्यक्रमाला महाराष्ट्रासह इतर राज्यातून अंनिसचे कार्यकर्ते उपस्थित होते.

कार्यक्रमाला समूह गीतांच्या सादरीकरणाने सुरुवात झाली. सामाजिक बहिष्कार विरोधी कायदा व अंमलबजावणी या विषयावर ॲड. डी. आर. महाजन, ॲड. डॉ. निलेश पावसकर, ॲड. मनिषा महाजन आणि ॲड. रंजना गवांदे इत्यादी वक्त्यांनी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून मा. रामराजे नाईक निंबाळकर (मा. सभापती, महाराष्ट्र विधान परिषद), प्रमुख वक्त्या मा. आमदार डॉ. निलमताई गोऱ्हे (प्रतोद व प्रमुख, विधान परिषद विशेष हक्क समिती), प्रमुख अतिथी मा. लक्ष्मीकांत देशमुख (अध्यक्ष, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन), प्रमुख उपस्थिती मा. खासदार सुप्रिया सुळे (कार्याध्यक्ष, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई), मा. आमदार जोगेंद्र कवाडे (सदस्य, महाराष्ट्र विधान परिषद), मा. अविनाश पाटील (राज्य कार्याध्यक्ष, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती) इत्यादी मान्यवरांनी सकाळच्या सत्रामध्ये उपस्थितांना मार्गदर्शन केले.

समारोप अध्यक्ष मा. प्रा. डॉ. एन. डी. पाटील (ज्येष्ठ नेते व संस्थापक अध्यक्ष, महाराष्ट्र अंनिस) यांच्या उपस्थितीत करण्यात आला.

**महाराष्ट्रातील जातीअंताच्या लढाईचे एक अज्ञात पर्व अजात**

जातीला तिलांजली देऊन जातविरहित समाज निर्माण करण्याचे ध्येय बाळगणाऱ्या गणपती महाराज यांची संघर्षकथा सांगणारा 'अजात' हा माहितीपट! यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्या चित्रपट चावडी मध्ये शनिवार दिनांक १९ मे २०१८ रोजी सायंकाळी ५.०० वाजता, रंगस्वर सभागृह येथे 'अजात' हा माहितीपट दाखवण्यात आला होता. अरविंद जोशी हे या माहितीपटाचे दिग्दर्शक आहेत. मंगरूळ दस्तगीर (जि. अमरावती) येथे १९१५ ते १९३५ या काळात गणपती महाराज यांनी समाजसुधारणेचे कार्य केले. शंभर वर्षांपूर्वी जात सोडण्याचे धाडसी काम त्यांनी नेटाने केले. स्वतः विधवेशी आंतरजातीय विवाह करून शिष्यांनाही आंतरजातीय विवाह करण्यास प्रोत्साहन दिले. ही चळवळ विदर्भात तग धरणारी ठरली. या आंतरजातीय विवाहातून जन्माला आलेल्या संततीची जात 'अजात' करण्यात आली. अमरावती व वर्धा जिल्ह्यात अजूनही शेकडो अजात आहेत. गणपती महाराजांच्या चळवळीचा सांगोपांग आढावा घेणारा हा माहितीपट रसिकांना अंतर्मुख करून गेला. यावेळी 'अजात' चे दिग्दर्शक अरविंद जोशी यांनी स्वतः उपस्थित राहून रसिक श्रोत्यांसोबत संवाद साधला.

**तृतीयपंथी आणि त्यांचे हक्क याविषयी जाणीव जागृती प्रशिक्षण शिबिर...**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान,मुंबई आणि विकास अध्ययन केंद्र,मुंबई ह्या संस्थांच्यावतीने मागील वर्षी दि. १३ नोव्हेंबर २०१७ रोजी 'एकल महिलांसाठी स्वतंत्र धोरणाची आवश्यकता' यावरील परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. ह्या

परिसंवादामध्ये तृतीयपंथी महिला आणि त्यांच्या समस्या याविषयी चर्चा करण्यात आली होती. या सर्व चर्चेतून एक समान सूर समोर आला तो म्हणजे 'तृतीयपंथीयांसाठी स्वतंत्र धोरणाची आखणी करणे गरजेचे आहे.' तृतीयपंथीयांचे अनेक प्रश्न तसेच समस्या आहेत. यामध्ये स्वतः त्याची त्यांना ओळख मिळणे हि मुख्य समस्या तर असतेच परंतु यासोबत कुटुंब, नातलग, तसेच समाजाकडून कडून होणारे भेदभाव, अपमान, शारीरिक व मानसिक अत्याचार, शिक्षण संधीचा अभाव, रोजगार संबंधीचा अभाव, पोलिसांकडून होणारा त्रास अश्या अनेकविध समस्यांना सामोरे जावून जीवन जगण्याचा संघर्ष करावा लागतो. या पोर्शभूमीवर वरील संस्थांच्या वतीने व आदरणीय सुप्रियाताई सुळे यांच्या पुढाकाराने तृतीयपंथीयांबद्दल 'जाणीव जागृती' आणि त्यांचे हक्क याबाबत राज्यातील विविध भागांमध्ये शासकीय यंत्रणांसोबत जाणीव जागृती प्रशिक्षण शिबीर घेणे सुरु केले. ह्या प्रशिक्षणातील पहिला टप्प्यामध्ये मुंबई उपनगरातील ६ शाळेतील एकूण ४०० पेक्षा अधिक शिक्षकांना तृतीयपंथी आणि त्यांचे हक्क जाणीव जागृती शिबीर मार्फत प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षणात किन्नर समाजातील विकी शिंदे, माधुरी सरोदेशम-शर्मा, विकास अध्ययन केंद्राच्या रेणुका कड, व प्रतिष्ठानच्या वतीने मनिषा खिल्लारे उपस्थित होत्या. यानंतर जाणीव जागृती या उपक्रमातील दुसरा टप्पा म्हणजे पोलीस यंत्रणा. यासाठी दिनांक ०४ मे २०१८ रोजी सकाळी ०९ वाजता कुलाबा पोलीस ठाण्यात हे प्रशिक्षण घेण्यात आले. या प्रशिक्षणाला सकाळच्या पाळीत उपस्थित असलेल्या पोलीस अधिकारी, कर्मचारी यांचा सहभाग होता. तृतीयपंथी हे एकल असल्यामुळे ते एखादी घटना घडली कि त्या परिसरात असल्यामुळे यांच्यावर घेण्यात येणारा संशय व त्यातून होणारे शारीरिक व मानसिक त्रास होत असतो. सगळेच तृतीयपंथी अपराधी किंवा गुनेह्गार नसतात. तरीही निरपराध्यांना सुद्धा याचा त्रास होतो म्हणून यासारख्या प्रशिक्षणाची गरज आहे. या प्रशिक्षणास विकी शिंदे यांनी पोलिसांना मार्गदर्शन केले. तसेच पोलिसांच्या उपस्थित प्रश्नांना विकी शिंदे आणि विकास अध्यन केंद्राच्या रेणुका कड यांनी योग्य उत्तरे दिली.

**मुंबईत वाचक जागराला सुरुवात :**

मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय आणि यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी प्रकाशकांची प्राथमिक बैठक दि.२२ मे २०१८ रोजी आयोजित करण्यात आली होती. मराठी वाचन संस्कृती वाढावी, वाचक संख्या वाढावी या उद्देशाने ग्रंथालयाच्या विशस्त खा. सुप्रिया सुळे यांच्या पुढाकाराने बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीला विश्वस्त अरविंद तांबोळी, ज्येष्ठ पत्रकार प्रताप आसबे, प्रमुख कार्यवाहक विश्वास मोकाशी आणि प्रतिष्ठानचे कार्यक्रम व्यवस्थापक दत्ता बाळसराफ यांनी मार्गदर्शन केले.

या बैठकीला राज्यभरातील ३० हून अधिक प्रकाशक सहभागी झाले होते. त्यात प्रामुख्याने महिन्याच्या पहिल्या शुक्रवारी 'वाचकजागर' उपक्रम तात्काळ घेण्याचे ठरले. जून महिन्यापासून या उपक्रमाचा शुभारंभ करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्रमुख कार्यवाह विशास मोकाशी यांनी केले. तसेच त्यांनी मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयात वाचकांचा राबता वाढवा म्हणून सर्वतोपरी सहकार्य करेन असे त्यांनी सांगितले. दोन्ही संस्थांच्या आवाहनाला प्रकाशकांनी प्रतिसाद देताना काही महत्त्वपूर्ण मुद्दे मांडून काही उपक्रम आणि योजनांची माहिती दिली.

विकास परांजपे यांनी वाचन जागर उपक्रम सुरू करण्याची इच्छा व्यक्त केली. पुढील पिढीला वाचनाचा आनंद मिळावा म्हणून अभिवाचन उपक्रम करावा असा सल्ला दिला. पत्रकार शीतल करदेकर यांनी प्रकाशक, वाचक आणि लेखक यांच्या भेटीचा एक दिवस ठरवावा, प्रत्येक प्रकाशकाने आपले पुस्तक ग्रंथलयास भेट द्यावे असे मत मांडले. तसेच सुदेश हिंगलासपूरकर यांनी जसा ग्रंथालयाने सहकार्याचा हात पुढे केला आहे, तसे प्रकाशकाने सहकार्य करावे, मी ग्रंथालीच्या नियतकालिकात या उपक्रमासाठी दोन पाने देत असल्याचे सांगितले. माधव शिरवळकर यांनी दुर्मीळ पुस्तके डिजिटलाईज होण्यासाठी ओसिआर तंत्राचा वापर करावा. तसेच तरुणांना वाचनाची आवड निर्माण होण्यासाठी किंडल साधनाचा वापर करावा असे सुचविले. अस्मिता विभाग यांनी संदर्भ विभाग अधिक लोकाभिमुख करण्याची विनंती केली. लता गुठे, अमोल नाले, संतोष बाईंग, अरविंद जोशी, विवेक नेत्रे, अरुण म्हात्रे, श्रीधर ठोंबरे, श्रीमती विद्या फडके व इतर मान्यवर बैठकीत सहभागी झाले होते. यापुढील दर तीन महिन्यातून अशी एक बैठक घेण्याचे ठरले आहे.

# अपंग हक्क विकास मंच

## कार्यवृत्त

महाराष्ट्रातील अपंग व्यक्तींच्या विविध समस्या, संवाद व समन्वयाच्या भूमिकेतून सोडविण्यासाठी अपंग हक्क विकास मंचाची निर्मिती झाली आहे. मंचाच्या निमंत्रक मा. सुप्रिया सुळे आहेत. मंचाचे संयोजक विजय कान्हेकर व दत्ता बाळसराफ तर समन्वयक सुहास तेंडुलकर, अभिजीत राऊत, विजय कसबे आणि या मंचाचे संघटक म्हणून सौ. सुकेशनी मर्चंडे-शेवडे काम पाहतात.

महाराष्ट्रातील अपंग व्यक्तींच्या विविध समस्या, संवाद व समन्वयाच्या भूमिकेतून सोडविण्यासाठी अपंग हक्क विकास मंचाची निर्मिती झाली आहे. मंचाच्या निमंत्रक मा. सुप्रिया सुळे आहेत. मंचाचे संयोजक विजय कान्हेकर व दत्ता बाळसराफ तर समन्वयक सुहास तेंडुलकर, अभिजीत राऊत, विजय कसबे आणि या मंचाचे संघटक म्हणून सौ.सुकेशनी मर्चंडे-शेवडे हे काम पाहतात. या मंचामार्फत महाराष्ट्रातील अपंगांसाठी विविध जिल्हयांत मोफत कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिरांचे आयोजन केले जाते. दिव्यांगांची पूर्वतपासणी करून त्यांना आवश्यक त्या साधनांसाठी किंवा अवयवांसाठी त्याचे मोजमाप घेऊन मोफत साहित्य उपलब्ध करुन दिले जाते. उदा. जयपूर फुट, कॅलिपर, कुबडी, एल्बो क्रचेस, वॉकींग स्टीक, वॉकर, सर्जिकल शूज, ट्रायसिकल, व्हिलचेअर, स्प्लिंट्स, कमोड चेअर, सी.पी. चेअर, एम.आर. कीट, ब्रेल कीट, अंध काठी, अंध गुगल, श्रवणयंत्र बेल्ट्स, आदी साहित्याचे मोफत वाटप 'कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिरात' करण्यात येते. सन २००९ पासून आजपर्यंत शासकीय योजनेच्या माध्यमातून महाराष्ट्रातील एकूण ४७ हजार ६३८ दिव्यांग व्यक्तींना कृत्रिम अवयव व साहित्य साधनांचा थेट लाभ देऊन समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न केला गेला आहे. तसेच मंचाच्यावतीने अपंगांच्या विविध विषयांवर/समस्यांवर नियमित चर्चा व कार्यशाळेचे आयोजन करून त्यांच्या समस्यांचे निरसन करण्यात आले आहे. तसेच मार्गदर्शन व सल्ला दिला जातो.

मुंबई, दिनांक ८ मार्च २०१८: दिव्यांग मुलांच्या पालकांसाठी जनजागृती कार्यशाळा : सामाजिक न्याय एवम् अधिकारीता मंत्रालय भारत सरकार अंतर्गत नॅशनल ट्रस्ट नवी दिल्ली, जय वकील फाउंडेशन, मुंबई (स्टेट नोडल एजन्सी), समाज कल्याण विभाग, मुंबई शहर यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई अपंग हक्क विकास मंच, महात्मा गांधी सेवा संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आणि फेलोशिप ऑफ फिजिकल हॅन्डिकॅप्ड, हाजीअली, मुंबई यांच्या सहकार्याने नॅशनल ट्रस्ट अंतर्गत मतिमंद, स्वमग्न, सेरेबल पाल्सी, बहु विकलांग या दिव्यांगांच्या पालकांसाठी एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन गरवारे सभागृह, वरळी येथे करण्यात आले होते. या कार्यशाळेसाठी केंद्र शासनाच्यावतीने सहसचिव मुकेश जैन यांची विशेष उपस्थिती होती. जय वकील संस्थेच्या अर्चना चंद्रा, समाज कल्याण विभागाच्या श्रीमती मोरे आणि श्री. विलास कोरगांवकर, श्री. विजय कान्हेकर, (सचिव, महात्मा गांधी सेवा संघ), मा. श्री.बुरुडे आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यशाळेत नॅशनल ट्रस्टच्या श्री. जैन यांनी पालकांना एकूण १० योजनांबाबत सविस्तर माहिती दिली. निरामय योजनेअंतर्गत या मुलांचे विमा संरक्षण करण्याचे आवाहन त्यांनी केले. त्याचबरोबर स्वयंसेवी संस्थांनी दिशा विकास, घरोंदा आदी योजनांच्या माध्यमातून या मुलांना व पालकांना आधार द्यावा असे मार्गदर्शन केले. तसेच एल.एल.सी.च्या माध्यमातून जिल्हाधिकाऱ्यांशी समन्वय साधून महाराष्ट्रातील दिव्यांगांच्या कायदेशीर पालकत्वाची प्रकरणे लवकर मार्गी लावावीत, असे सुचविले. या मुलांशी निगडित विविध विषयांवर चर्चा व मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. आयुषी मेहरा यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी राज्य समन्वयक दीपिका शेरखाने यांनी विशेष परिश्रम घेतले. या कार्यक्रमाकरिता फेलोशिप ऑफ फिजिकल हॅन्डिकॅप्ड संस्थेच्या कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

मुंबई, दिनांक ३१ मार्च २०१८ : 'तृतीयपंथी आणि त्यांचे अपंगत्व. या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा' : यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, (मुंबई) अपंग हक्क विकास मंच, शोधना

कन्सल्टन्सी प्रा.लि. (पूणे), आणि वॉटर एड (नवी दिल्ली), यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार दि. ३१ मार्च, २०१८ रोजी 'तृतीयपंथी आणि त्यांचे अपंगत्व' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा घेण्यात आली. तृतीयपंथीयांना समाजातील इतर घटकांप्रमाणे सर्वसामान्य जीवन जगता यावे यासाठी समाजात वावरताना येणाऱ्या अडचणी व त्यांच्या समस्यांवर विचार विनिमय करून कृती आराखडा तयार करण्यासाठी या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी या विषयावर काम करणाऱ्या तज्ज्ञ व्यक्ती, समाज सेवक, तृतीय पंथीयांचे प्रतिनिधी आदी मान्यवर उपस्थित होते. महाराष्ट्रातील विविध जिल्हयांत सर्व प्रवर्गातील गरजू दिव्यांगांसाठी मोफत कृत्रिम अवयव व सहाय्यभूत साधने वाटप करण्यासाठी नाव नोंदणी व मोजमाप शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमामुळे खेड्यापाड्यातील प्रत्येक दिव्यांगांपर्यंत पोहोचून त्यांची तपासणी करून त्यांना योग्य त्या साहित्याचा पुरवठा अपंग हक्क विकास मंचाच्या वतीने १५ दिवसाच्या कालावधीत करण्यात येणार आहे. यामुळे दिव्यांग स्वावलंबी बनून त्याचा आत्मविश्वास वाढतो. या उपक्रमामुळे दिव्यांगांचे सबलीकरण होते व तो आत्मनिर्भर बनण्याचा प्रयत्न करतो. हा वंचित दिव्यांग घटक समाजाच्या मुख्य प्रवाहात सामावला जाईल या अपेक्षेने गेली दहा वर्षे अविरत पणे सुरु आहे. यंदाच्या वर्षात आयोजित केलेल्या शिबिरांची माहिती पुढील प्रमाणेः

औरंगाबाद, दिनांक २० एप्रिल २०१८ः सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय भारत सरकार नवी दिल्ली, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई अपंग हक्क विकास मंच, महात्मा गांधी सेवा संघ परभणी, जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्र परभणी आणि समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने औरंगाबाद जिल्ह्यातील गरजू अपंगांना समाजाच्या मुख्य प्रवाहामध्ये आणण्याकरिता त्यांना मोफत कृत्रिम अवयव व सहाय्यभूत साधनांचे वाटप करण्याकरिता दिनांक २० एप्रिल,२०१८ रोजी सकाळी १० ते सायं. ५ या वेळेत गांधी भवन, सावरकर चौक, समर्थनगर, औरंगाबाद येथे दिव्यांगांची नांव नोंदणी व मोफत तपासणी करण्यात आली. यावेळी श्रीमती ज्योती राठोड, (समाजकल्याण अधिकारी - जिल्हा परिषद औरंगाबाद) श्री. पावरा (वै.सा.का. समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद औरंगाबाद,) ज्येष्ठ कार्यकर्ते श्री. राजाभाऊ गोकुळाष्टमी, श्री. विजय कान्हेकर (सचिव - महात्मा गांधी सेवा संघ ) आदी मान्यवर उपस्थित होते.

या शिबिरामध्ये एकुण ११२ दिव्यांगांची व्हील चेअर, श्रवणयंत्र, कुबडीजोड, एम.आर.कीट इत्यादी करिता नाव नोंदणी तर जयपूर फुट, कॅलिपर, एफ.ओ.के. एफ.ओ. इत्यादींसारखे दिव्यांगांना आवश्यक असलेले कृत्रिम अवयव व सहाय्यभूत साधनांकरिता मोफत तपासणी करण्यात आली.

संगमनेर जि. अहमदनगर, दिनांक २१ एप्रिल २०१८ः सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय भारत सरकार, नवी दिल्ली, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई अपंग हक्क विकास मंच, महात्मा गांधी सेवा संघ, परभणी, आणि समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद, अहमदनगर यांच्या संयुक्त विद्यमाने अहमदनगर जिल्हयातील गरजू अपंगांना समाजाच्या मुख्य प्रवाहामध्ये आणण्याकरिता त्यांना मोफत कृत्रिम अवयव व सहाय्यभूत साधनांचे वाटप करण्याकरिता शनिवार दिनांक २१ एप्रिल,२०१८ रोजी सकाळी ११ ते सायं. ५ पर्यंत लोमपंचायत, संगमनेर, जिल्हा अहमदनगर येथे दिव्यांगांची नांव नोंदणी व मोफत तपासणी करण्यात आली. यावेळी श्री. सीताराम राऊत (सदस्य, जिल्हा परिषद अहमदनगर), लोमपंचायतचे श्री. सारंग पांडे, श्री. उल्हास पाटील, श्री. सोमेश कोटकर, श्रीमती शालन शेळके श्री. विजय कान्हेकर (सचिव - महात्मा गांधी सेवा संघ) आदी मान्यवर उपस्थित होते.

सदर शिबिरामध्ये एकूण १०२ दिव्यांगांची व्हिलचेअर, श्रवणयंत्र, कुबडीजोड, एम.आर.कीट इत्यादी करिता नाव नोंदणी तर जयपूर फुट, कॅलिपर, एफ.ओ.के. एफ.ओ. इत्यादींसारखे दिव्यांगांना आवश्यक असलेले कृत्रिम अवयव व सहाय्यभूत साधनांकरिता मोफत तपासणी करण्यात आली.

पूणे, दिनांक २२ एप्रिल २०१८ः सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय भारत सरकार, नवी दिल्ली, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई-अपंग हक्क विकास मंच, महात्मा गांधी सेवा संघ परभणी, आणि समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद पूर्णे यांच्या संयुक्त विद्यमाने पूणे जिल्हयातील गरजू अपंगांना

समाजाच्या मुख्य प्रवाहामध्ये आणण्याकरिता त्यांना मोफत कृत्रिम अवयव व सहाय्यभूत साधनांचे वाटप करण्याकरिता रविवार दिनांक २२ एप्रिल २०१८ रोजी सकाळी ११ ते सायं. ५ पर्यंत जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्र, औंध हॉस्पिटल, पूणे येथे दिव्यांगांची नांव नोंदणी व मोफत तपासणी करण्यात आली. यावेळी माजी उपायुक्त (अपंग कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य) मा. बी.एम. तायडे, श्रीमती मिनिता पाटील (माजी अध्यक्षा, बालकल्याण संस्था), मा. अन्वर राजन (महात्मा गांधी स्मारक निधी, पूर्णे), मा. दत्तात्रय भोसले, मा. नंदकुमार फुले (प्रकल्प संचालक, जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्र, पूर्णे ), श्री. विजय कान्हेकर (सचिव – महात्मा गांधी सेवा संघ) आदी मान्यवर उपस्थित होते.

सदर शिबिरामध्ये एकूण १०५ दिव्यांगांची व्हिलचेअर, श्रवणयंत्र, कुबडीजोड, एम.आर.कीट इत्यादी करिता नाव नोंदणी तर जयपूर फुट, कॅलिपर, एफ.ओ.के.एफ.ओ. इत्यादींसारखे दिव्यांगांना आवयक असलेले कृत्रिम अवयव व सहाय्यभूत साधनांकरिता मोफत तपासणी करण्यात आली.

कोल्हापूर, दिनांक २३ एप्रिल २०१८ः सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय, भारत सरकार नवी दिल्ली, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई–अपंग हक्क विकास मंच, महात्मा गांधी सेवा संघ परभणी, आणि समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने कोल्हापूर जिल्हयातील गरजू अपंगांना समाजाच्या मुख्य प्रवाहामध्ये आणण्याकरिता त्यांना मोफत कृत्रिम अवयव व सहाय्यभूत साधनांचे वाटप करण्याकरिता सोमवार दिनांक २३ एप्रिल,२०१८ रोजी सकाळी ११ ते सायं. ५ पर्यंत विनयकुमार लोहिया कर्णबधिर विद्यालय, न्यू महाद्वार रोड, पेटाळा, सिध्दाळा गार्डन समोर, कोल्हापूर येथे दिव्यांगांची नांव नोंदणी व मोफत तपासणी करण्यात आली. सदर शिबिरामध्ये एकूण ६६ दिव्यांगांची व्हिलचेअर, श्रवणयंत्र, कुबडीजोड, एम.आर.कीट इत्यादी करिता नाव नोंदणी तर जयपूर फुट, कॅलिपर, एफ.ओ.के. एफ.ओ. इत्यादींसारखे दिव्यांगांना आवश्यक असलेले कृत्रिम अवयव व सहाय्यभूत साधनांकरिता मोफत तपासणी करण्यात आली.

परभणी, दिनांक २७ एप्रिल २०१८ः सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय भारत सरकार नवी दिल्ली, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई–अपंग हक्क विकास मंच, महात्मा गांधी सेवा संघ परभणी, जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्र परभणी आणि समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने परभणी जिल्हयातील गरजू अपंगांना समाजाच्या मुख्य प्रवाहामध्ये आणण्याकरिता त्यांना मोफत कृत्रिम अवयव व सहाय्यभूत साधनांचे वाटप करण्याकरिता दिनांक २७ एप्रिल,२०१८ रोजी सकाळी १० ते सायं. ५ पर्यंत जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्र, योगक्षेम कॉलनी, जिंतूर रोड, परभणी येथे दिव्यांगांची नांवनोंदणी व मोफत तपासणी करण्यात आली. सदर शिबिरामध्ये एकूण ७० दिव्यांगांना व्हिलचेअर, श्रवणयंत्र, कुबडीजोड, एम.आर. कीट इत्यादीकरिता नाव नोंदणी तर जयपूर फुट, कॅलिपर, एफ. ओ. के. एफ.ओ. इत्यादींसारखे दिव्यांगांना आवश्यक असलेले कृत्रिम अवयव व सहाय्यभूत साधनांकरिता दिव्यांगांची मोफत तपासणी करण्यात आली.

नांदेड, दिनांक १ मे, २०१८ः सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय भारत सरकार नवी दिल्ली, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई–अपंग हक्क विकास मंच, महात्मा गांधी सेवा संघ परभणी, आणि समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने नांदेड जिल्हयातील गरजू अपंगांना समाजाच्या मुख्य प्रवाहामध्ये आणण्याकरिता त्यांना मोफत कृत्रिम अवयव व सहाय्यभूत साधनांचे वाटप करण्याकरिता मंगळवार दिनांक १ मे, २०१८ रोजी सकाळी १० ते सायं. ५ पर्यंत जिल्हा परिषद, नांदेड येथे दिव्यांगांची नांव नोंदणी व मोफत तपासणी करण्यात आली. यावेळी मा. गोडगोडवार (वै.सा.का., अपंग विभाग) जिल्हा परिषद नांदेड, मा. बापू दासरी (निरीक्षक, समाज कल्याण अधिकारी कार्यालय), मा. विठ्ठलरावजी मंगनाळे (जिल्हा अध्यक्ष, प्रहार अपंग क्रांती आंदोलन) नांदेड, श्रीमती मोरे मॅडम (महिला जिल्हा अध्यक्षा), मा. विष्णु वैरागडे यांच उपसस्थित होत्या.

सदर शिबिरामध्ये एकूण ७० दिव्यांगांना व्हिलचेअर, श्रवणयंत्र, कुबडीजोड, एम.आर.कीट इत्यादी करिता नाव नोंदणी तर जयपूर फुट, कॅलिपर, एफ.ओ.के. एफ.ओ. इत्यादींसारखे दिव्यांगांना आवश्यक असलेले कृत्रिम अवयव व सहाय्यभूत साधनांकरिता दिव्यांगांची मोफत तपासणी करण्यात आली.

धुळे, दिनांक ३ मे २०१८ : सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय भारत सरकार नवी दिल्ली, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई-अपंग हक्क विकास मंच, महात्मा गांधी सेवा संघ परभणी, आणि समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने नांदेड जिल्हयातील गरजू अपंगांना समाजाच्या मुख्य प्रवाहामध्ये आणण्याकरिता त्यांना मोफत कृत्रिम अवयव व सहाय्यभूत साधनांचे वाटप करण्याकरीता गुरुवार दिनांक ३ मे २०१८ रोजी सकाळी ११ ते सायं. ५ पर्यंत रोटरी आय हॉस्पिटल, दोंडाईचा, जिल्हा धुळे येथे दिव्यांगांची नांव नोंदणी व मोफत तपासणी करण्यात आली.

या शिबिरामध्ये एकूण ७० दिव्यांगांची व्हिलचेअर, श्रवणयंत्र, कुबडीजोड, एम.आर.कीट इत्यादी करिता नाव नोंदणी तर जयपूर फुट, कॅलिपर, एफ.ओ.के. एफ.ओ. इत्यादींसारखे दिव्यांगांना आवश्यक असलेले कृत्रिम अवयव व सहाय्यभूत साधनांकरिता दिव्यांगांची मोफत तपासणी करण्यात आली.

इस्लामपूर, जिल्हा-सांगली : दिनांक २८ मे २०१८ : सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय भारत सरकार नवी दिल्ली, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई-अपंग हक्क विकास मंच, महात्मा गांधी सेवा संघ परभणी, आणि समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, सांगली यांच्या संयुक्त विद्यमाने सांगली जिल्हयातील गरजू अपंगांना समाजाच्या मुख्य प्रवाहामध्ये आणण्याकरिता त्यांना मोफत कृत्रिम अवयव व सहाय्यभूत साधनांचे वाटप करण्याकरिता सोमवार दिनांक २८ मे २०१८ रोजी सकाळी ११ ते सायं. ५ पर्यंत राजारामबापू ज्ञानप्रबोधिनी इस्लामपूर, सांगली येथे दिव्यांगांची नांव नोंदणी व मोफत तपासणी करण्यात आली. यावेळी मा. श्री. जाधव साहेब (वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता- समाज कल्याण विभाग), प्रा. शामराव पाटील (अध्यक्ष, राजाराम बापू बँक), श्री. लक्ष्मण शिंदे, (समन्वयक- जयंत दारिद्र निर्मूलन अभियान) व सर्व कर्मचारी वर्ग उपस्थित होता.

या शिबिरामध्ये एकूण ६५ दिव्यांगांना व्हिलचेअर, श्रवणयंत्र, कुबडीजोड, एम.आर.कीट इत्यादी करिता नाव नोंदणी तर जयपूर फुट, कॅलिपर, एफ.ओ.के. एफ.ओ. इत्यादींसारखे दिव्यांगांना आवश्यक असलेले कृत्रिम अवयव व सहाय्यभूत साधनांकरिता दिव्यांगांची मोफत तपासणी करण्यात आली.

कराड, जिल्हा-सातारा - दिनांक २९ मे २०१८ : सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय भारत सरकार नवी दिल्ली, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई-अपंग हक्क विकास मंच, महात्मा गांधी सेवा संघ परभणी, आणि समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, सातारा यांच्या संयुक्त विद्यमाने सातारा जिल्हयातील गरजू अपंगांना समाजाच्या मुख्य प्रवाहामध्ये आणण्याकरिता त्यांना मोफत कृत्रिम अवयव व सहाय्यभूत साधनांचे वाटप करण्याकरिता मंगळवार दिनांक २९ मे २०१८ रोजी सकाळी ११ ते सायं. ५ पर्यंत वेणूताई चव्हाण सभागृह, कराड, जिल्हा सातारा येथे दिव्यांगांची नाव नोंदणी व मोफत तपासणी करण्यात आली. यावेळी मा.श्री. मोहनराव डकरे (सचिव- यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान), श्री. विजय कान्हेकर (सचिव - महात्मा गांधी सेवा संघ), श्री. अशोक पोतदार (समन्वयक- वेणुताई चव्हाण सभागृह) कराड व त्यांचा कर्मचारी वर्ग उपस्थित होता.

शिबिरामध्ये एकूण ७५ दिव्यांगांना व्हिलचेअर, श्रवणयंत्र, कुबडीजोड, एम.आर.कीट इत्यादी करिता नाव नोंदणी तर जयपूर फुट, कॅलिपर, एफ.ओ.के., एफ.ओ. इत्यादींसारखे दिव्यांगांना आवश्यक असलेले कृत्रिम अवयव व सहाय्यभूत साधनांकरीता दिव्यांगांची मोफत तपासणी करण्यात आली.

ओतूर, जिल्हा-पूणे : दिनांक ३० मे २०१८ : सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय भारत सरकार नवी दिल्ली, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई अपंग हक्क विकास मंच, महात्मा गांधी सेवा संघ परभणी, आणि समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद पूणे यांच्या संयुक्त विद्यमाने पूणे जिल्हयातील गरजू अपंगांना समाजाच्या मुख्य प्रवाहामध्ये आणण्याकरिता त्यांना मोफत कृत्रिम अवयव व सहाय्यभूत साधनांचे वाटप करण्याकरिता बुधवार दिनांक २९ मे,२०१८ रोजी सकाळी ११ ते सायं. ५ पर्यंत पांढरी मारुती मंदिर येथे दिव्यांगांची नांव नोंदणी व मोफत तपासणी करण्यात आली.

शिबिरामध्ये एकूण ७९ दिव्यांगांना व्हिलचेअर, श्रवणयंत्र,

कुबडीजोड, एम.आर.कीट इत्यादी करिता नाव नोंदणी तर जयपूर फुट, कॅलिपर, एफ.ओ.के. एफ.ओ. इत्यादींसारखे दिव्यांगांना आवश्यक असलेले कृत्रिम अवयव व सहाय्यभूत साधनांकरिता दिव्यांगांची मोफत तपासणी करण्यात आली.

'दिव्यांग कट्टा' : यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई - अपंग हक्क विकास मंचातर्फे, नोव्हेंबर,२०१७ रोजी दिव्यांगांसाठी 'दिव्यांग कट्टा' सुरू करण्यात आला आहे. हा कट्टा प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या शुक्रवारी आयोजित केला जातो. सध्या दिव्यांग कट्ट्याच्या माध्यमातून दिव्यांग स्टॉल धारकांच्या समस्या व त्यांना येणाऱ्या अडचणी या विषयाचा मागोवा घेऊन पाठपुरावा केला जात आहे. या दिव्यांग कट्ट्याच्या आयोजनाचे काम शमीम खान (संघटक- अपंग हक्क विकास मंच) हे पाहतात. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी अपंग हक्क विकास मंचाच्या संघटक सुकेशनी मर्चंडे-शेवडे विशेष परिश्रम घेतात.

अंध प्रवर्गासाठी चर्चासत्र : यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई-अपंग हक्क विकास मंच आणि ब्लाइंड ग्रॅज्युएट फोरम यांच्या संयुक्त विद्यमाने गेल्या दोन वर्षापासून दर महिन्याच्या चौथ्या शनिवारी नियमित अंध प्रवर्गासाठी चर्चासत्राचा उपक्रम राबविला जातो. या सत्रात अंधांना विविध क्षेत्रातील मान्यवर तज्ज्ञांना बोलावून त्यांच्या संबंधित विषयावर मार्गदर्शनपर चर्चा केली जाते. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, शिक्षणातल झालेले बदल, नोकरीत, सामान्य जीवनात येणारे अडथळे अशा विषयांवर चर्चा केली जाते. या प्रवर्गातील अपंगांना त्यांचे आयुष्य सोप्या पध्दतीने कसे जगता येऊ शकते, याबद्दल विशेष मार्गदर्शन मिळते आणि समाजाच्या मुख्य प्रवाहात येण्यास मदतही होते. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी अपंग हक्क विकास मंचाच्या संघटक सुकेशनी मर्चंडे-शेवडे विशेष परिश्रम घेतात.

## राजसत्तेचे विकेंद्रीकरण

लोकशाही व राजसत्तेचा विकासासाठी उपयोग करावयाचा, हा मार्ग एकदा स्वीकारला, की सत्ता-संघर्षाला टाळता येत नाही. ग्रामीण क्षेत्रात नवे नेतृत्व निर्माण होण्याची आशा या कार्यक्रमाने निर्माण केली आहे. काही ठिकाणचा अनुभव कदाचित आशादायी नसेलही, परंतु विकेंद्रीकरणाच्या दिशेने टाकलेले पाऊल मागे घेता कामा नये. अनुभवांच्या प्रकाशात आत्मटीका जरूर व्हावी. मला एकदा माझे एक मित्र म्हणाले, की या विकेंद्रीकरणाने जिल्ह्याच्या व तालुक्याच्या ठिकाणी तुम्ही नवे 'साहेब' उभे केलेत, पण विकासाची प्रेरणा घेतलेल्या कार्यकर्त्यांची साखळी कोठे आहे? ही टीका कदाचित सार्थ असेलही, पण सत्तेची नवी स्थाने निर्माण केल्यानंतर प्रथम प्रथम हे अनुभव अपरिहार्य आहेत. पण त्यामुळे खचून जाण्याचे कारण नाही. पुन्हा एकदा आत्मनिरीक्षण करून पुढे पुढेच पावले टाकली पाहिजेत, अशी माझी श्रध्दा आहे.

**- मा. यशवंतराव चव्हाण**

# शिक्षण विकास मंच

## कार्यवृत्त

**कोचिंग क्लासेस मुलांच्या सृजनशीलतेला मारक...**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई आणि शिक्षण विकास मंच यांच्या संयुक्त विद्यमाने या वेळच्या शिक्षणकट्ट्यात 'खाजगी कोचिंग क्लासेस' या विषयावर चर्चा झाली. न्यायालयाकडून खाजगी कोचिंग क्लासेसवर नियंत्रण ठेवण्याचे निर्देश शासनास दिल्याने शासनातर्फे विधेयकाचा कच्चा मसुदा तयार झाला आहे. त्यावर शिक्षणकट्ट्यात चर्चा करण्यात आली.

ही चर्चा का ठेवण्यात आली ..? या विषयीची भूमिका श्रीमती बसंती रॉय यांनी उपस्थितांना सांगितली. कोचिंग क्लासेस ही आजच्या समाजाची भावनिक गरज बनली आहे. यास पालक, शिक्षक आणि आजची परीक्षा पद्धती कारणीभूत आहे. यामुळे विद्यार्थ्यांचा मानसिक छळ होतो. म्हणून हे धोरण ठरविताना विद्यार्थी केंद्रस्थानी ठेवावा. त्याचा विकास शाळा आणि क्लास दोघांच्याही समन्वयाने करावा. या विधेयकातून लहान आणि मराठी माध्यमाचे क्लासेस वगळण्यात यावेत; अशीही धारणा काही सदस्यांनी शिक्षणकट्ट्यात व्यक्त केली.

खाजगी क्लासेस मुलांना परीक्षार्थी बनवतात. तोच तो अभ्यासक्रम पुन्हा पुन्हा करून घेतात याने मुलांची सृजनशीलता मरून जाते याकडे शिक्षण विकास मंचचे संयोजक डॉ. वसंतराव काळपांडे यानी लक्ष वेधले. या कार्यक्रमास मोठया प्रमाणात शिक्षक, मुख्याध्यापक, प्राध्यापक, पालक, पत्रकार यांची उपस्थिती होती. शेवटी उपस्थितांचे आभार समन्वयक माधव सूर्यवंशी यांनी मानले.

## विज्ञाननिष्ठ समाज

विज्ञानसेवेचा किंवा प्रसाराचा विचार करताना माझ्या मते त्याच्या दोन प्रमुख अंगांचा विचार केला पाहिजे : एक तर मानवजातीसमोर आज जी संकटांची परंपरा उभी आहे, ती नाहीशी करण्यासाठी, निसर्गाचे गूढ उकलून, मानवाला जास्तीत जास्त शक्ती प्राप्त करून देणारे संशोधन करणे आणि अशा प्रकारच्या संशोधनास प्रोत्साहन देणे. दुसरे, जे माझ्या मते जास्त व्यापक कार्य आहे, समाजात विज्ञानविचाराचा प्रसार व प्रचार करून समाजच विज्ञाननिष्ठ बनविणे. हे काम करण्यासाठी मात्र आपणांस जास्त कष्ट घ्यावे लागतील, प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागेल. विज्ञानाचे मूळ स्वरूपच तर्कसंगत, बुध्दिसंमत विचार असे आहे. हा विचार जनतेच्या मनात दृढमूल झाल्यावरच आपण एक आधुनिक समाज निर्माण करू शकतो. जुन्या सनातन कल्पना समाजातून काढून टाकण्याचा हाच एक कार्यक्षम उपाय आहे. या दिशेने जितक्या लवकर जाऊ तितक्या लवकर आपला देश व समाज प्रगतिशील राष्ट्रांच्या मालिकेत जाऊन बसेल.

**– मा. यशवंतराव चव्हाण**

# रंगस्वर

## कार्यवृत्त

**गुरुवार दि. ०८ फेब्रुवारी २०१८ :** ''भरतनाट्यम नृत्य''- कलाकार - अपुर्वा लहीरी

**शुक्रवार दि. ०९ फेब्रुवारी २०१८ :** ''केली शास्त्रीय संगीत महोत्सव'' ''भरतनाट्यम''- ज्येष्ठ नृत्यांगना, पद्‌मश्री मालविका सरुकाई

**मंगळवार दि. २० फेब्रुवारी २०१८ :** ''येन्स लाईफ''- दिग्दर्शक - तुआन वु दीन, हिएतनाम/१०९ मिनिटे २०१५

**बुधवार दि. २१ फेब्रुवारी २०१८ :** ''गायन''- कलाकार - प्रमोद नागोरकर, गुरु- डॉ. मोहन दरेकर

**सोमवार दि. २६ फेब्रुवारी २०१८ :** ''ऑन द पीसफुल पिक''- दिग्दर्शक - न्युयेन हू मुओई, व्हिएतनाम/९५ मिनिटे/२०१५

**गुरुवार दि. २९ फेब्रुवारी २०१८ :** ''मधुमती''- दिग्दर्शक : बिमल रॉय- हिंदी/कृष्ण धवल/१९५८

**मंगळवार दि. २० मार्च २०१८ :** ''गायन''- कलाकार - वर्षा सोहोनी, गुरु- पं. मधुसूदन कानेटकर, तबला- विनायक नाईक, हार्मोनियम - मंदार दीक्षित

**बुधवार दि. २८ मार्च २०१८ :** ''सदमा''- दिग्दर्शक : बालू महेन्द्रु, हिंदी/रंगीत/१९८३

**बुधवार दि. ४ एप्रिल २०१८ :** ''जाने अज मी अजर''- किशोरीताई अमोणकरांच्या परिवारातर्फे श्रद्धांजली

**गुरुवार दि. १९ एप्रिल २०१८ :** ''गायन'' कलाकार-सारंगी आंबेकर -गुरु- श्रीमती माणिक भिडे, रामदास भटकळ आणि पं. अरूण द्रविड

**सोमवार दि. २३ एप्रिल २०१८ :** ''अवर फ्रेंड रशिद''- दिग्दर्शक : मर्शुदिल इस्लाम, बांगलादेश/९६ मि./रंगीत/२०११

**गुरुवार दि. २६ एप्रिल २०१८ :** ''दब सतार''- दिग्दर्शक : नुरुल अलम अतिक, बांगलादेश/९२ मि./रंगीत/२०११

**शुक्रवार दि. २७ एप्रिल २०१८ :** ''यमनरंग''- सादरकर्ते - अमरेंद्र धनेश्वर, साथसंगत - शंतनू शुक्ल (तबला), जावेद खान (सारंगी)

**गुरुवार दि. ३ मे २०१८ :** ''आरोही''- नेहा गुरव, विश्वनाथ शिरोडकर (तबला), सीमा शिरोडकर (हार्मोनियम), शहानबाज खान, अजहर अहमद (तबला), नागेश आडगावकर, यशवंत वैष्णव (तबला), स्वानंद कुलकर्णी (हार्मोनियम)

**शुक्रवार दि. ०४ मे २०१८ :** ''आरोही'' भाग्यश्री पांचाळे, शांतनु शुक्ला (तबला), सुधांशु घारपुरे (हार्मोनियम), सुमीत तिवारी, भूषण परचुरे (तबला), भाग्येश मराठे, स्वप्नील भिसे (तबला), सिद्धेश बिचोलकर (हार्मोनियम).

**गुरुवार दि. १७ मे २०१८ :** ''तबला सोलो''- कलाकार - अनिरुद्ध देशपांडे (तबला सोलो), गुरु- पं. अरविंदकुमार आझाद

**सोमवार दि. २१ मे २०१८ :** ''डाऊन बाय लॉ''- दिग्दर्शक : जिम जारमूश- यू एस ए/ १९९५/१०७ मि.

**मंगळवार दि. २२ मे २०१८ :** ''अ वे विथ वर्डस''- दिग्दर्शक - क्रिस्टेफर डॉयल, हाँगकाँग/१९९९/ ९५ मि.

# महाराष्ट्र महिला व्यासपीठ

## कार्यवृत्त

महाराष्ट्र महिला व्यासपीठाच्या वतीने महिलांच्या शारिरिक, मानसिक, आर्थिक, सामाजिक आदी विविधांगाने सक्षमता वाढावी यासाठी विविध उपक्रम, विविध कार्यशाळा आणि इतर कार्यक्रमाच्या माध्यमातून कृतिशील प्रयत्न केले जातात. संयोजिका रेखा नार्वेकर, कार्यकारी संयोजिका ममता रमेशचंद्र कानडे महिला व्यासपीठाचे काम पाहतात. त्यांना संजना संतोष पवार यांचे सहकार्य असते.

मुंबईमध्ये २० ते ४० हजार सहकारी गृहनिर्माण संस्था आहेत. या सर्व संस्थांचे काम चांगले होण्यासाठी शासनाचे कायदे किंवा उपविधी लोकांना माहीत असणे आवश्यक आहे. हे लक्षात घेऊन महाराष्ट्र महिला व्यासपीठातर्फे जून २०१० सालापासून यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईमध्ये 'सहकारी गृहनिर्माण संस्था व्यवस्थापक प्रशिक्षण' दिले जाते. या कार्यशाळेला मा. प्रभाकर चुरी, मा. देवयानी गोरे, ॲड. प्रमोद कुमार व सहकारी क्षेत्रातील इतर मान्यवरांचे मार्गदर्शन मिळते. या कार्यशाळेचे फायदे म्हणजे सहकारी गृहनिर्माण संस्थेत पूर्णवेळ/अर्धवेळ नोकरी मिळू शकते. तसेच हे प्रशिक्षणार्थी सल्लागार म्हणूनही चांगले काम करू शकतात, व आपल्या स्वतःच्या राहत्या सोसायटीत मॅनेजिंग कमिटीत चांगले काम करू शकतात. तसेच सामाजिक ज्ञान/भान याची जाणीव होते. आतापर्यंत २० ते अगदी ७० वर्षाच्या व ५०० च्या वर प्रशिक्षणार्थींनी हे प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केले आहे. त्यांना परीक्षा घेऊन प्रमाणपत्र देण्यात येते. या प्रशिक्षणाचा २१वा वर्ग जानेवारी ते मार्च २०१८ या कालावधीत पूर्ण झाला. २० प्रशिक्षणार्थींनी हे प्रशिक्षण पूर्ण केले. यशस्वी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले.

मार्च महिन्यात प्रख्यात सौंदर्य तज्ज्ञ डॉ. पूर्णिमा म्हात्रे यांचे विनामूल्य व्याख्यान ठेवण्यात आले. ६५ लोकांनी या कार्यक्रमाचा लाभ घेतला. डॉ. पूर्णिमा म्हात्रे यांनी सौंदर्यविषयक आधुनिक शस्त्रक्रिया, औषधे तसेच त्वचेची काळजी घेणारे घरगुती उपाय यावर मार्गदर्शन केले. चर्चा व प्रश्नोत्तरे अशा रितीने हा कार्यक्रम उत्कृष्टरित्या पार पडला. खास करून महिला वर्गाने या कार्यक्रमाचा आनंद घेतला.

ही वर सर्व नमूद केलेली प्रशिक्षणे व कार्यक्रम अत्यंत माफक फी मध्ये 'ना नफा, ना तोटा' या तत्वावर सुरू आहेतःयासाठी बाहेर खूप पैसे मोजावे लागतात. मार्गदर्शकास प्रत्येकाकडे लक्ष देता यावे यादृष्टीने. उगाच माफक फी च्या नावाखाली भरपूर प्रशिक्षणार्थी घेऊन आम्ही आमची कार्यशाळा यशस्वी करीत नाही, तर सहभागी झालेल्या प्रत्येक व्यक्तीस शिकवलेली कला आली पाहिजे; मग सराव करून ती व्यक्ती त्या त्या कला आत्मसात करू शकते.

आमची उद्दिष्टे सरळ, सोपी व समाजाचे भले व्हावे या दृष्टिकोनातूनच आहेत. आम्ही सतत लोकांना काय उपयुक्त देऊ शकतो, हाच विचार करत असतो. खूप मोठ्या प्रमाणात नाही; पण ज्या समाजात आपण वावरतो व ज्याच्याकडून आम्हालाही खूप काही शिकायला मिळते, त्या समाजाचे देणे परत करणे, हा आमचा खारीचा नाही; पण मुंगीचा वाटा नक्की आहे. आजही आमच्या प्रत्येक प्रशिक्षणार्थीकडून आम्हाला आमच्या कामाची मिळालेली दाद व भविष्यासाठीच्या शुभेच्छा हेच आमचे उद्दिष्ट सफल करते. हाच विचार घेऊन आम्ही भविष्यातही स्त्रियांसाठी व समाजासाठी खूप काही करत राहणार आहोत.

# यशवंतराव चव्हाण ग्रंथालय, मुंबई

## कार्यवृत्त

२१ वे शतक हे माहिती तंत्रज्ञानाचे युग म्हणून ओळखले जाते. या शतकामध्ये माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात संशोधन झाल्यामुळे नवनवीन तंत्रज्ञान उदयास आले आहे. या नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून ग्रंथालय क्षेत्रात अमूलाग्र बदल झालेला दिसून येतो. संगणकाच्या वापराने ग्रंथालयाच्या विकासावर खूप परिणाम झाला. त्यामुळे इलेक्ट्रॉनिक ग्रंथालय (E-Library), आभासी ग्रंथालय, डिजीटल लायब्ररी या नवीन संकल्पना उदयाला आल्या. ग्रंथालयात ऐतिहासिक दृष्टीने महत्त्वपूर्ण माहिती असते, तिचा उपयोग संशोधनासाठी केला जाऊ शकतो; परंतु अशी साधने दुर्मिळ आणि अत्यल्प स्वरूपात असतात. यशवंतराव चव्हाण ग्रंथालय हे संदर्भ ग्रंथालय आहे. ग्रंथालयात येणारे सभासद हे संशोधक, MPSC, UPSC अशा स्पर्धा परीक्षा देण्याच्या तयारीकरिता येतात. काही महत्त्वाच्या विषयांची वृत्तपत्र कात्रणे वाचकांना हाताळता यावीत याकरिता व्यवस्थित बांधणी करून ग्रंथालयामध्ये संदर्भाकरिता ठेवण्यात आली आहेत. त्याचप्रमाणे काही दुर्मिळ पुस्तके, जुन्या वर्तमानपत्रातील महत्त्वाची बातमी, लेख अशा विद्यार्थी, संशोधक यांच्याकरिता अद्ययावत माहितीकरिता नियतकालिकांची बांधणी करून संदर्भाकरिता ठेवली आहेत. ग्रंथालयात विविध नियतकालिके, समाजशास्त्र, शेती, इतिहास, कायदा, संस्कृती इ. विषयांवरील पुस्तके, आत्मचरित्रे, धर्मकोश, विश्वकोश, गॅझीटीयर, ॲटलास, इअरबुक, डिक्शनरी, निरनिराळ्या कायद्याचे ग्रंथ उपलब्ध आहेत. ग्रंथालयाला अनुसरून वेळोवेळी नवीन पुस्तके खरेदी करण्यात येतात. या व्यतिरिक्त महत्त्वाची दर्मिळ पुस्तके, वर्तमानपत्रातील बातमी, मासिकामधील लेख अशा प्रकारची महत्त्वाची संग्रहित केलेली साधने (ज्यांचा कागद खूप जुना होऊन ठिसूळ बनल्याने त्याची प्रतिलिपी सुद्धा काढता येत नाही) याकरिता हे वाचनसाहित्य भविष्यात इतरांसाठी संग्रहित करण्यासाठी त्यांना व्यवस्थितरित्या स्कॅन करून त्यांना ग्रंथालयाच्या OPAC वर अपलोड केले आहे, त्यामुळे, सभासदांना वाचण्यास सोईस्कर झाले आहे.

**ग्रंथालय व्यवस्थापन :** ग्रंथालयातील पुस्तकांचे विषयानुरूप वर्गीकरण, कॅटलॉगिंग करणे, 'कीर्डस्'द्वारे संगणकीय सॉफ्टवेअर (SLIM) मध्ये तयार केले आहेत. सभासदांची वेगवेगळ्या विषयासंबंधित माहितीची गरज लक्षात घेऊन त्यानुसार नवीन पुस्तके खरेदी केली जातात. ग्रंथसंग्रहाचे संगणकीकरण (कॉम्प्युटरायझेशन) करून नेटवर्कद्वारे सभासद घरबसल्या ग्रंथालयातील पुस्तके बघू शकतात.

**E- resources :** MPSC, UPSC अशा स्पर्धा परीक्षा देणाऱ्या सभासदांसाठी इंटरनेटवरून उपयुक्त माहिती शोधणे व ती वेगवेगळ्या विषयांनुसार 'ऑन-लाईन OPAC 'द्वारे प्रसारित करणे असे याचे स्वरूप असते. त्याचबरोबर E- resources च्या माध्यमातून अत्याधुनिक मासिके, पुस्तके, मार्केट रिपोर्टस्, कॉन्फरन्स इत्यादी माहिती वाचकांना दिली जाते.

- **E- Journals**

**NISCAIR Online Periodicals Repository -**

You can now access full text articles from research journals published by CSIR-NISCAIR! Full text facility is provided for all eighteen research journals viz. ALIS, BVAAP, IJBB, IJBT, IJCA, IJCB, IJCT, IJEB, IJEMS, IJFTR, IJMS, IJNPR, IJPAP, IJRSP, IJTK, JIPR, JSIR & JST. NOPR also hosts three Popular Science Magazines viz. Science Reporter (SR), VigyanPragati (VP) & Science Ki Duniya (SKD) and a Natural Products Repository (NPARR).

Link : **http://nopr.niscair.res.in/**

**SpringerOpen -**

The SpringerOpen portfolio has grown tremendously since its launch in 2010, Now that we offer researchers from all areas of science, technology, medicine, the humanities and social sciences a place to publish open access in journals

and books. Publishing with SringerOpen makes your work freely available online for everyone, immediately upon publication, and our high-level peer-review and production processes guarantee the quality and reliability of the work.

**Link : https://www.springeropen.com/**

**ElsevierOpen access journals -**

All articles in open access journals which are published by Elsevier have undergone peer review and upon acceptance are immediately and permanently free for everyone to read and download.

**Link : https://www.elsevier.com/about/openscience/open-access/open-access-journals**

- **E-Books**

**Directory of open access books**

The primary aim of DOAB is to increase discoverability of Open Access books. The directory is open to all publishers who publish academic, peer reviewed books in Open Access and should contain as many books as possible, rovided that these publications are in Open Access and meet academic standards.

Link : **https://www.doabooks.org/**

**Intech Open access books -**

In TechOpen is the world's largest Science, Technology and Medicine Open Access book publisher. With a goal to provide free online access to research since 2004, InTechOpen has published 3,377 books and 49,848 scientific works total by 108,482 international scientists.

Link :- **https://www.intechopen.com/about-intech.html**

**वृत्तपत्र कात्रण सेवा :** वृत्तपत्रांमधून कात्रणे मिळवून विषयांनुरूप संशोधक किवा विद्यार्थ्यांना योग्य वेळी योग्य माहिती कमी वेळात देता यावी याकरिता ग्रंथालयात विशेष प्रकारे माहिती संग्रहीत करून ठेवली आहे. ग्रंथालयात वर्तमानपत्रातील महत्त्वाच्या घडामोडींची कात्रणे करून त्यांच्या फाईल्स तयार करण्यात आल्या आहेत. तसेच झेरॉक्स काढून त्यांना व्यवस्थितरित्या बाईंडिंग करण्यात आल्या आहेत त्यांची यादी खाली दिल्याप्रमाणे:

१) १८५७ चा इतिहास

२) हिरक महोत्सव महाराष्ट्र, २००७

३) २६ नोव्हेंबर २००८ चा मुंबईवरील दहशतवादी हल्ला

४) अयोध्येत राममंदिर उभारणी बाबतीत निकाल, २०१०

५) साहित्य संमेलन २००३-२०१०

६) पुरस्कार (२००२-२००६) : साहित्य अकादमी पुरस्कार, भारत रत्न, नोबेल, ज्ञानपीठ, महाराष्ट्र भूषण

७) पुरस्कार ( २००६-२००९) : नोबेल, महात्मा फुले समता पुरस्कार, पद्मश्री, उत्कृष्ट ग्रंथनिर्मिती पुरस्कार

८) पुरस्कार (२००९-२०१२) : आल्फ्रेड नोबेल, झी गौरव, जीवन गौरव, भारतरत्न, कला गौरव, महाराष्ट्र भूषण, आदर्श शिक्षक, गोदागौरव

९) स्टिफन हॅत्कींग (Stephen Hawking)

**ग्रंथालयाचे नियम :** यशवंतराव चव्हाण ग्रंथालयाचे सभासद होण्याकरिता नमुना अर्ज तयार केला आहे. या अर्जामध्ये स्वतः च्या हस्ताक्षरात परिपूर्ण माहिती भरून त्यासोबत पुढील प्रमाणे वर्गणी भरणे.

**१. सर्वसाधारण सभासद :** सर्वसाधारण सभासदाकरिता रु.५००/- वार्षिक वर्गणी तसेच रु.५००/- अनामत रक्कम (१९९६).

**२. विद्यार्थी सभासद :** महाविद्यालयीन/उच्चशिक्षण/ संशोधन विद्यार्थ्यांकरिता वार्षिक रु. ५०/- नाममात्र वर्गणी व अनामत रक्कम रु.१००/-

३. यशवंतराव चव्हाण ग्रंथलयामध्ये संदर्भाकरिता काही विद्यार्थी एक दिवस ते एक आठवडा या कालावधीकरिता ग्रंथालयाचा लाभ घेतात. या विद्यार्थ्यांकडून रु.५०/- फक्त एका आठवड्याकरिता फी आकारण्यात येते. त्यांच्याकडून फक्त एका कार्डावर त्यांची वैयक्तिक माहिती भरून घेतली जाते.

४. माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी शिक्षण घेणारे विद्यार्थी संगणकविषयक पुस्तकांचा लाभ घेतात. त्याकरिता वेगळी फी आकारली जात नाही.

**अ) संयुक्त संस्था सभासदत्व (Corporate Membership):-** कॉर्पोरेट या शब्दाच्या व्याख्येत बसणारी संस्था या सभासदत्वासाठी पात्र असेल. तर एकरकमी वर्गणी रु. ५०,०००/- ५ वर्षासाठी. अनामत रक्कम :- सर्वसाधारणपणे अनामत रक्कम घेण्यात येत नाही. परंतु एखाद्या दुर्मिळ वा किंमती पुस्तकासाठी प्रतिष्ठान निश्चित करेल तेवढी अनामत रक्कम घेण्यात येते.

एका वेळी देण्यात येणारी पुस्तके:- एकावेळी जास्तीत जास्त १० पुस्तके दिली जातात.

**ब) संस्था सभासदत्व :** यासाठी शिक्षण व संशोधन संस्था व सांस्कृतिक संस्था पात्र राहतील. परंतु शिक्षण व संशोधन संस्था ही यु.जी.सी., आय .सी.एस.एस.आर. किंवा आय.सी.एच. आर. यांच्याकडून मान्यताप्राप्त झालेली असावी. सांस्कृतिक संस्था महाराष्ट्र शासन, केंद्र शासन किंवा मान्यताप्राप्त अधिघोषित विद्यापीठ यांनी मान्यता दिलेली असावी.

संस्था सभासदत्वासाठी : प्रवेश फी रु. १,०००/- ना परतावा

वार्षिक वर्गणी :- रु. ५,०००/-

दीर्घ कालावधीसाठी संस्था सभासद :- एकावेळी ५ वर्षासाठी वर्गणी रु. २०,०००/-

**एकावेळी देण्यात येणारी पुस्तके :** एकावेळी जास्तीत जास्त १० पुस्तके देण्यात येतील. अ व ब नुसार सबंधित संस्थेस / प्रमुखास सभासदत्व देण्यात येईल.

त्यांना ग्रंथालयाचे ओळखपत्र देण्यात येईल. संस्थेच्या प्रमुखास आवश्यक वाटल्यास ते त्यांच्या एक किंवा दोन कर्मचाऱ्यांना त्यांच्यावतीने पुस्तके घेण्यास /परत करण्यास नामनिर्देशित करू शकतील. नामनिर्देशन अधिकृत पत्राने करावे लागेल. मात्र, पुस्तके अबाधितपणे वेळेवर परत करणे व ग्रंथालयाच्या नियमांचे पालन करणे यांची जबाबदारी संस्था प्रमुखाची असेल. वरील सभासदत्व देण्याचा किंवा कारण न देता नाकारण्याचा पूर्ण अधिकार प्रतिष्टानला राहील.

**५) सर्वसाधारण सभासद :** सभासदाला एकावेळी एक पुस्तक/ ग्रंथ देण्यात येईल.ते ८ किंवा १५ दिवसात परत करणे आवश्यक आहे. तसेच संदर्भग्रंथाचा उपयोग ग्रंथालयातच करता येईल. संदर्भ ग्रंथ घरी नेता येणार नाही. पुस्तकाची किंमत भरलेल्या अनामत रकमेपेक्षा जास्त असेल तेव्हा अधिक अनामत रक्कम किंवा त्या पुस्तकाच्या किंमतीएवढी अनामत रक्कम भरून पुस्तक घरी नेता येईल.

**६)** महाविद्यालयीन व उच्चशिक्षण घेणारे विद्यार्थी/संशोधक यांना ग्रंथ, संदर्भग्रंथ, नियतकालिके ग्रंथालयात बसून वाचण्यासाठी/ संदर्भासाठी देण्यात येतात. घरी/ग्रंथालयाबाहेर नेण्याकरिता देण्यात येत नाहीत.

**७) ग्रंथालयाच्या वेळा व सुट्ट्या :** सकाळी ९ ते संध्याकाळी ६ वाजेपर्यत ग्रंथालय वाचकांकरिता तसेच पुस्तके परत करणे/ नवीन घेणे यासाठी राहील. दुसरा व चौथा शनिवार, सर्व रविवार आणि सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी ग्रंथालय सुरू राहील.

**८)** सभासदाचे कार्ड हरविल्यास त्यांना पुस्तक देण्यात येणार नाही. सभासदत्व नियमित ठेवण्याकरिता, सभासदाने स्वतः च्या हस्ताक्षरात अर्ज करून ग्रंथालयास सादर करावा. त्यानंतर कार्डाची दुसरी प्रत देण्याचा विचार केला जाईल.

**९)** सभासदांकडून ग्रंथ हरविल्यास त्यांना तो १५ दिवसात नवीन खरेदी करून द्यावा लागेल किंवा त्या ग्रंथाच्या अद्ययावत मूल्याइतकी रक्कम अनामत रक्कमेतून कमी करण्यात येईल व गरज पडल्यास अधिकची रक्कम सभासदाला भरावी लागेल. अनामत रक्कमेतून रक्कम भरणे अनिवार्य राहील.

**१०)** सभासदांनी ग्रंथालयामध्ये शांतता राखावी, आपआपसामध्ये किंवा ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांबरोबर चर्चा करणे टाळावे. धुम्रपान, थुंकणे, झोपणे याकरिता मनाई राहील. ग्रंथालयात मोबाईल फोन बंद ठेवावे.

**११)** ग्रंथालयातून बाहेर पडताना सभासदास दिलेल्या ग्रंथाचा वर्गांक, दाखलअंक ग्रंथालयाच्या गेटवर तपासला जाईल.

**१२)** सभासदास ग्रंथालयाचे सभासद राहावयाचे नसल्यास त्यांनी तसा लेखी अर्ज दयावा, त्यासोबत कार्ड प्रत करावे. त्यावर निर्णय घेऊन इतर येणे नसल्यास अनामत रक्कम बिनव्याजी वजा करण्यात येईल.

# माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी

## कार्यवृत्त

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या माहिती तंत्रज्ञान प्रबोधिनीमध्ये C-DAC व MKCL संस्थेचे कोर्सेस उप्लब्ध आहेत.

C-DAC चा PG DAC कोर्स १९ फेब्रुवारी २०१८ ला सुरू झाला. या कोर्सची शैक्षणिक पात्रता Engineering त्याचप्रमाणे M.Sc.(IT), M. Sc.(Computer Science), M. Sc. (Allied Subjects like Physics, Mathematics etc.) आहे. परंतु C-DAC ची C-CAT(C-DAC Common Admission Test) ही परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य आहे. C-CAT exam ची तयरी प्रबोधिनी मार्फत करून घेण्यात येते.

C-DAC चा PG DAC हा कोर्स विद्यार्थ्यांमध्ये चांगल्याप्लेसमेंटसाठी प्रसिद्ध आहे. PG DAC कोर्सच्या ऑगस्ट २०१७ बॅचच्या विद्यार्थ्यांसाठी २ फेब्रुवारी २०१८ ला C-DAC Mumbai Region तर्फे Industry Meet चे आयोजन करण्यात आले होते. मुंबईमधील C-DAC च्या पाच केंद्रांनी सहभाग घेतला. या Meet मध्ये साधारण १० कंपन्यांनी उपस्थिती दिली व विद्यार्थ्यांना Technical व HR विषयक व्याखाने दिली. या Meet चा विद्यार्थ्यांना चांगलाच उपयोग झाला. या Meet मध्ये ५०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

PG DAC कोर्सेच्या ऑगस्ट २०१७ बॅचसाठी कॉमन प्लेसमेंट प्रोग्राम ५ फेब्रुवारी २०१८ ला सुरू झाला. प्लेसमेंटसाठी C-DAC Mumbai, Tavisca, Miles Software, Morning Star, Smartstream Technologies, Diebold Nixdorf, Quantiphi Analytics, Raja Software Labs, Prorigo, Reliance Jio Infocomm, Saint Gobain इ. कंपनी उपस्थित होत्या.

MKCL चा महाराष्ट्र शासन प्रमाणित MS-CIT हा कोर्स माहिती आणि तंत्रज्ञान प्रबोधिनी तर्फे चालाविण्यात येतो. या कोर्ससाठी वयाची व शिक्षणाची कोणतीही अट नाही. पंतप्रधान आयोजित Digital India हा उपक्रम राबविला जातो. MS-CIT च्या जानेवारी २०१८ पासून सुरू करण्यात आलेल्या नवीन अभ्यासक्रमात २१ व्या शतकात उपयोगी पडणाऱ्या Basic IT Awareness, Scriting Skills, Life kills, Study Skills, Citiyenship Skills, Job Skills, Daily Life Skills, Typing Skills आणि Netiquettes & Cyber Security Skills चा समावेश करण्यात आला आहे.

PG DAC कोर्सच्या ऑगस्ट २०१८ बॅचसाठी C-DAC ची C-CAT (C-DAC Common Admission Test) २४ जून व १ जुलै २०१८ रोजी आयोजित करण्यात येणार आहे. ही परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी प्रतिष्ठानमध्ये एप्रिल व मे महिन्यात विशेष वर्ग आयोजित केले होते.

MKCL आणि यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने प्रबोधिनीमध्ये KLiC Certificate Course राबवण्यात येतात. यामध्ये प्रामुख्याने KLiC Tally, KLiC Web Dssign, KLiC DTP, KLiC Advanced Excel या कोर्सेसना विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद मिळाला.

सालाबादप्रमाणे अकॅडमीने विद्यार्थ्यांच्या पसंतीचे आणि आवडीचे उपक्रम हाती घेतले. अकॅडमीने नवीन सुरू केलेल्या कोर्सेसचा विद्यार्थ्यांना चांगला उपयोग झाला. दरवर्षीप्रमाणे यावर्षीही १० वी आणि १२ वीच्या विद्यार्थ्यांसाठी खास उन्हाळी सुट्टीचे वर्ग आयोजित करण्यात आले. उन्हाळी सुट्टीच्या ह्या वर्गांना विद्यार्थ्यांचा चांगलाच प्रतिसाद मिळाला. बऱ्याच विद्यार्थ्यांनी मुलभूत संगणक आणि मूलभूत मल्टिमिडिया कोर्सेसमध्ये भाग घेतला.

MKCL मार्फत MSCIT कोर्सच्या उन्हाळी सुट्टीतील विद्यार्थ्यांना लिंबू पाण्याचे वितरण करण्यात आले. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई आणि माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी विभागातर्फे १० वी आणि १२ च्या विद्यार्थ्यांसाठी चव्हाण सेंटरमध्ये मोफत करिअर मार्गदर्शन सेमिनारचे आयोजन १२ मे २०१८ ला करण्यात आले होते. या कार्यक्रमात निवड संस्थेच्या सल्लागार प्रीती नायडू यांनी सेमिनारमध्ये मार्गदर्शन केले. दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद मिळाला. विद्यार्थ्यांनी नेमकं काय करायला हवं, कोणतेविषय निवडायला हवेत, भविष्यात करिअर मध्ये कुठे संधी निर्माण होतील याबद्दल चर्चा केली.

गरजू आणि अपंग विद्यार्थ्यांना माफक दरामध्ये शिक्षण उपलब्ध करून देण्याची संधी AIT ने दिली. अनेक कोर्सेस मध्ये अशा प्रकारच्या विद्यार्थ्यांना पडताळणीनंतर माफक दरात प्रवेश देण्यात येतो. IT (YCP) तर्फे लष्कर आणि पोलीस खात्यातील व्यक्ती आणि त्यांचे कुटुंबीय यांसाठी फी मध्ये सवलत दिली जाते. या विद्यार्थ्यांसाठी हप्त्याने फी भरण्याची सुविधा देण्यात येते. आपल्या प्रबोधिनीमधून प्रशिक्षण घेतलेले विद्यार्थी सर्वोत्तम Salary Package मिळविण्यात सतत पुढे दिसून येत आहेत याचा आम्हाला आनंद आणि अभिमान आहे.

वेगवेगळ्या कार्यक्रमाद्वारे तसेच इतर संस्थांच्या सहाय्याने अधिकाधिक संगणकीय प्रशिक्षणवर्ग चालविणे हेच, AIT चे उद्दीष्ट आहे.


**YASHWANTRAO CHAVAN PRATISHTHAN MAHARASHTRA MAHILA VYASPEETH**

Website: www.ybchavanpratishthan.org. Email : ycpmww@gmail.com

**Co-Operative Housing Society Magagement Certificate Course for Office Bearers/Consultants/Members/ Managers**

Certificates will be given to successful trainees.
Training is imparted in Marathi and English

Throughout the Year Training is Conducted.
**Please enroll as early as possible.**

**Sanjana Pawar**
**Contact : Mob. No. 8291416216**
**Office : 2204 5460, 22028598, Ext : 244**

**Place of Training**
Basement Hall, Yashwantrao Chavan Pratishthan Mumbai Maharashtra Mahila Vyaspeeth, General Jagannath Bhosale Marg, Next to Sachivalay Gymkhana, Mumbai - 400021.

**Next Regular Batch**
30th January 2017 to 3rd March 2017 (Monday to Friday)
Timing : 2.00 pm to 5.00 pm
**Fees Rs. 4500/-**

**Jobs are available in Housing Societies**

# विभागीय केंद्र, कऱ्हाड

## कार्यवृत्त

**स्व.** सौ. वेणूताई यशवंतराव चव्हाण यांची ९२ वी जयंती : यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई -विभागीय केंद्र कऱ्हाड व सौ. वेणूताई चव्हाण चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या वतीने स्व. सौ. वेणूताई यांची ९२वी जयंती मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली. स्व. यशवंतरावजी चव्हाण यांच्या जीवनात सौ. ताईंचा सहभाग फार मोलाचा होता. दोघांनाही परस्पराबद्दलचा जिव्हाळा फार मोठा होता. प्रकृती अस्वास्थामुळे सौ. ताई रशियावगळता कोणत्याही देशात जाऊ शकल्या नाहीत. परदेशात गेल्यावर ज्या हॉटेलमध्ये साहेबांचा मुक्काम असावयाचा, त्याच हॉटेलच्या लेटरपॅडवर साहेब सौ. ताईंना पत्र लिहावयाचे. परदेश दौरा संपल्यानंतर, १, रेस कोर्समध्ये आल्यावर 'ही तुझी पत्रे' म्हणून सौ. ताईंना ही पत्रे देत असत. स्व. साहेबांच्या हस्ताक्षरातील १०० पत्रे विरंगुळ्यात सुस्थितीत आहेत. स्व. यशवंतराव व स्व. सौ. वेणूताई संबंधी सर्व माहिती श्री. मोहनराव डकरे यांनी सौ. वेणूताई ट्रस्टमध्ये अभ्यास करणाऱ्या मुलांना सांगितली. विरंगुळा व सौ. वेणूताई ट्रस्टमधील फोटोंना पुष्पहार घालण्यात आले. समाजातील सर्व क्षेत्रातील मान्यवरांची दिवसभर रीघ लागली होती. सौ. ताईंची ९२ वी जयंती २ फेब्रुवारी २०१८ रोजी उत्साहात पार पडली.

**स्व. यशवंतराव चव्हाण यांची १०५वी जयंती :**

स्व. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री असल्यापासून दिल्लीतही त्यांच्याबरोबर अखेरपर्यंत असणारे श्री. राम खांडेकर यांची साहेबांच्या जयंतीदिनी साहेबांच्या 'विरंगुळा' बंगल्यात उपस्थिती हा एक फार मोठा, अगदी कपिलाषष्ठीचा योग म्हणावा लागेल. त्यांच्याच हस्ते विरंगुळ्यात व सौ. वेणूताई ट्रस्टमध्ये पुष्पहार घालण्यात आले. श्री. नंदकुमार बटाणे, ॲडव्होकेट मोहिते तसेच यशवंतराव चव्हाण महाविद्यालय व सौ. वेणूताई चव्हाण कला वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक-प्राध्यापिका व नागरिक पदयात्रेसाठी उपस्थित होते. मा. राम खांडेकर यांच्या शुभहस्ते नारळ वाढवून पदयात्रेला सुरुवात झाली. कऱ्हाडमधील मुख्य रस्त्यावरून साहेबांच्या समाधी स्थळापर्यंत पदयात्रा काढली गेली. भव्य व सजविलेल्या रथातून साहेबांच्या फोटोसह पदयात्रा काढण्यात आली. स्व. यशवंतरावांचे पुतणे श्री. अशोकराव चव्हाण व त्यांचे मित्र ॲडव्होकेट प्रकाश पाटील पदयात्रेला आवर्जून उपस्थित होते. स्व. पी. डी. पाटील प्रतिष्ठानच्या वतीने समाधीस्थळी हजारो मुलांच्या राष्ट्रीय गीत गायनाच्या भव्य व श्रवणीय स्पर्धा झाल्या. कऱ्हाड शहरातील व जिल्ह्यातील नेते या कार्यक्रमासाठी उपस्थित होते. समाधी स्थळावर दिवसभर १२ मार्च २०१८ रोजी लोक येत होते.

**अपंग हक्क शिबिर :**

सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय भारत सरकार नवी दिल्ली, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, अपंग हक्क विकास मंच मुंबई, महात्मा गांधी सेवा संघ व समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद सातारा यांच्या संयुक्त विद्यमाने दिव्यांग व्यक्तींना मुख्य प्रवाहामध्ये आणण्याकरिता त्यांना एडीप योजनेअंतर्गत मोफत कृत्रिम अवयव व साधनांचे वाटप करण्याकरिता पहिल्या टप्प्यामध्ये नाव नोंदणी व मोजमाप शिबिर दि. २९ मे २०१८ रोजी सौ. वेणूताई चव्हाण स्मारक, कऱ्हाड येथे यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई यांच्या वतीने आयोजित करण्यात आले.

श्री. विजय कान्हेकर यांच्या हस्ते देशनेते यशवंतराव चव्हाण व स्व. सौ. वेणूताई चव्हाण यांच्या पुतळ्याला पुष्पहार घालून अपंग शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई यांच्याकडून या अपंग शिबिराची पूर्वसूचना दिल्यामुळे, वर्तमानपत्रातून या अपंग शिबिराची प्रसिद्धी करण्यात आली. त्यामुळे भरपूर प्रतिसाद मिळाला. सकाळी ९ वाजल्यापासून सायंकाळी ६ वाजेपर्यंत सलगपणे शिबिराचे काम सुरू होते. श्री. कान्हेकर यांचे नियोजन फारच चांगले होते. सातारा व सांगली जिल्हा, कराड शहर परिसर व सभोवतालच्या गरजू अपंग व्यक्तींनी या अपंग (दिव्यांग) शिबिराचा उपयोग करून घेतला. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईचे कऱ्हाड विभागीय केंद्र व सौ. वेणूताई चव्हाण ट्रस्टमधील सर्व कर्मचाऱ्यांनी उत्तम सहकार्य केले. या अपंग शिबिराचा फायदा बऱ्याच गरजू व्यक्तींनी घेतला.

**जडण घडण (व्यक्तिमत्व विकास शिबिर) :**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई-केंद्र देवराष्ट्रे येथे दि.२५ व २६ एप्रिल २०१८ रोजी दोन दिवसीय व्यक्तिमत्व विकास शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाच्या वेळी श्री.रवी बावडेकर व श्री. दत्ता बाळसराफ यांचे हस्ते मा. यशवंतराव चव्हाण साहेबांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून या कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. दि.२५ रोजी श्री. रवी बावडेकर यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा व करियर या विषयांवर मार्गदर्शन केले. स्पर्धा परीक्षा देत असताना खेडेगावातील मुलांना येणाऱ्या अडचणींविषयी मार्गदर्शन केले, तसेच मुलांबरोबर संवाद देखील साधला. त्यानंतर श्री. संजय बनसोडे यांनी मुलांना अंधश्रद्धा व व्यसनमुक्ती या विषयावर मार्गदर्शन केले. सध्या अंधश्रद्धा व वाढती व्यसनाधीनता यामुळे समाज कसा रसातळाला चालला आहे हे देखील त्यांनी मुलांना सांगितले, तसेच भोंदूगिरी करणारे सर्व बाबा कशा पद्धतीने लोकांना फसवतात यांची चित्रफीत दाखवण्यात आली. श्री. नितीन शिंदे यांनी मुलांना वैज्ञानिक दृष्टिकोन या विषयावर मार्गदर्शन केले. शिंदे यांनी मुलांना चित्रफितीच्या माध्यमातून आकाशगंगेची सफर करून दाखवली. तसेच चंद्रयानातून अंतराळवीर अवकाशात कसे जातात, यानातील आतील परिस्थिती या विषयी मुलांना मार्गदर्शन करण्यात आले.

दि. २६ रोजी श्री. उमेश खाडे यांनी मुलांना ताणतणाव मुक्त अभ्यास कसा करावा याचे मार्गदर्शन केले. श्री.खाडे यांनी मुलांना बोलते केले. मुलांच्या अभ्यासाच्या समस्या जाणून घेऊन त्यावर मार्गदर्शन केले. गाणी, मनोरंजनात्मक कार्यक्रम देखील खाडे यांनी घेतले. श्री.दत्ता बाळसराफ यांनी मुलांना भारतीय संविधानातील मूल्य, स्वरूप व आशय या विषयावर मार्गदर्शन केले. श्री. बाळसराफ यांनी चालू घडामोडी व आजची परिस्थिती काय आहे, आपण कोठे आहोत, आज जगात काय चालले आहे यांची विद्यार्थ्यांना जाणीव करून दिली.

या कार्यक्रमाच्या वेळी यशवंतराव चव्हाण हायस्कूल चे सुमारे १५० विद्यार्थी या दोन दिवसीय शिबिरात सहभागी झाले होते. हायस्कूलच्या उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना प्रतिष्ठान मार्फत एक एक प्रमाणपत्र देखील देण्यात आले.

## स्त्री व समाज

जेव्हा स्त्रीत बदल होत जातो, तेव्हा समाजातही बदल होणं अटळ असतं. समाजबदलाची प्रक्रिया ही स्त्रीच्या बदलात प्रतिबिंबित होत असते. समाजबदलाची ती इंडेक्स असते. कोणत्याही समाजात बदल होत आहे की नाही, होत असेल तर तो किती, कसा होतो आहे, हे जर अभ्यासायचं असेल, तर स्त्रीमधील बदल लक्षात घेतला, तरी कळू शकतं.

म्हणून म्हणावंसं वाटतं, भारतीय समाजात निश्चितपणे बदल घडू पाहताहेत, कारण भारतीय स्त्री बदलते आहे. हुंडाविरोधी, बलात्काराविरोधी आंदोलन करायला घरातील स्त्री आता रस्त्यावर येत आहे. समाजात बदल घडवायला, समाजातील दीनदुबळ्यांना प्रेम द्यायला ती हिरिरीनं पुढं सरसावली आहे. स्त्रीनं पुरुषाला संसारात सुखदु:खात साथ दिली. आता पुरुषानं तिलाही साथ देण्यासाठी आपणहून पुढं यायला हवं.

**- मा. यशवंतराव चव्हाण**

# विभागीय केंद्र- पूणे

## कार्यवृत्त

**सहकार निवडणूक नियमावली (सुधारणा) :**
सहकारी संस्थांच्या अडीअडचणी, निवडणुकांवेळी येणारा अनुभव लक्षात घेता सहकारी संस्थांना सोयीस्कर होतील, असे २४ बदल सहकारी निवडणूक प्राधिकरणाने करणेचे योजिले आहे. त्यावर चर्चा करण्यासाठी १७ फेब्रुवारी २०१८ रोजी व्यासपीठाची सभा आयोजित केली होती. सहकारी निवडणूक प्राधिकरण आयुक्तांनी केलेल्या विनंतीनुसार प्राधिकरणाचे अधिकारी श्री. वाडेकर, पूणे जिल्हा गृहनिर्माण संस्था महासंघ तसेच अनेक सहकारी संस्था प्रतिनिधी व सहकार खात्याचे व सहकारी संस्थांचे माजी अधिकारी सभेस हजर होते. सदर सभेच्या शिफारशीवर आधारित लेख प्रसिद्धीसाठी वृत्तपत्रांना २८/०२/२०१८ ला देण्यात आला. त्याचप्रमाणे संबंधित शिफारशी मा. आयुक्त सहकारी निवडणूक प्राधिकरण व महाराष्ट्र शासन यांनाही सादर करण्यात आल्या.

**पेस्टीसाईड मॅनेजमेंट बिल २०१७ :**
केंद्र शासनाने वरील बिलावर दि. १९ फेब्रुवारी २०१८ रोजी सर्व संबंधितांकडून (उदा. शेतकरी, व्यापारी, उत्पादक, संशोधक इत्यादी) अभिप्राय मागविले होते. कृषी व सहकार व्यासपीठाची सभा सदर विषयावर विचार करण्यासाठी दि. ३ मार्च २०१८ रोजी आयोजित करण्यात आली. सभेत कृषी विद्यापीठातील कृषी खात्यातील, सहकार खात्यातील व हिंदुस्थान ऑरगॅनिक केमिकल्स यांतील माजी अधिकारी व कृषी प्रक्रिया उद्योजकांनी सहभाग घेतला.

चर्चेच्या अनुषंगाने ज्या सूचना प्राप्त झाल्या, त्या जॉईंट सेक्रेटरी (प्लँट प्रोटेक्शन), मिनिस्ट्री ऑफ फार्मर वेलफेअर अँड ॲग्रीकल्चर यांना अंकुशराव काकडे यांच्या सहीने दि. ७ मार्च २०१८ रोजी सादर करण्यात आल्या.

त्याशिवाय सभेतील तज्ज्ञांना त्यांची मते स्वतंत्रपणे कळविण्यास सांगण्यात आले. डॉ. घारपुरे यांनी त्यानुसार आपली मते-विचार कळविले. त्याचप्रमाणे वरील विषयावर या व्यासपीठाच्या संयोजकांनी एक लेख तयार करुन तो प्रसिद्धीसाठी पाठवला.

**पीक विमा योजना :**
निवृत्त (भा.प्र.से.) अधिकारी डॉ. गलांडे हे शासनाचे पीक विमा योजनेमध्ये काय सुधारणा कराव्यात त्यासाठी स्थापन केलेल्या समितीचे सदस्य सचिव आहेत. वरील विषयावर त्यांचे व्याख्यान दि. २६/०४/२०१८ रोजी आयोजित करण्यात आले होते. शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या वेगवेगळ्या प्रकारच्या जोखीमांवर उदा. ओला व सुका दुष्काळ, गारपीट, वादळ, पीक व पशुधन रोगराई इत्यादींवर डॉ. बुधाजीराव मुळीक यांनी सुचविलेल्या सर्वंकष विम्याबाबत वर उल्लेखलेली शासनाची समिती काय काम करीत आहे, त्याबाबतची माहिती डॉ. गलांडे यांनी दिली.

श्री.बी.एच. श्रीकांत यांनी व श्री. कापरे या व्यासपीठाच्या सदस्यांनी २०१८ सालचे इंफाळला (मणीपूर) सायन्स काँग्रेसमध्ये हजेरी लावली होती. त्यांनी आपले अनुभव, सदर सभेत निवेदन केले, व जास्तीत जास्त सदस्यांनी इंडियन सायन्स काँग्रेसला हजर राहण्याचे आवाहन केले. (दि. २६/०४/२०१८).

**डिजिटलायझेशन ऑफ इकॉनॉमी अँड कोऑपरेटिव्हज् :**
इंडियन सोयायटी फॉर स्टडीज इन कोऑपरेशनच्या दि. २ व ३ मार्च २०१८ रोजी भरणाऱ्या अधिवेशनासाठी वरील विषयावरील पेपर, संयोजक, कृषी व सहकार व्यासपीठ यांनी सादर केला होता. त्यातील सारांश मा. सहकार आयुक्त डॉ. विजय झाडे व अन्य प्रमुख संस्थांना दि. ३१/०३/२०१८ ला सादर करुन कारवाईची विनंती केली. त्यास अनुसरून निवडक सहकारी संस्था (नागरी बँका), वैकुंठ मेहता नॅशनल इन्स्टिट्यूट, इन्स्टिट्यूट ऑफ को-मॅनेजमेंट, राज्य सहकारी संघ, नागरी बँक असोसिएशन, सहकारी डिपार्टमेंटल स्टोअर्स, पूणे जिल्हा सहकारी गृहनिर्माण महासंघ, स्वयंसहायता सेवा संस्था, शासकीय

अधिकाऱ्यांची सभा बोलावण्यात आली. त्यानुसार दि. ८ मे २०१८ रोजी सहकार आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली सभा घेऊन चार सब कमिटींना आपल्या शिफारशी सादर करण्यास सांगण्यात आले. या शिफारशींवर चर्चा करण्यासाठी दि. ७ जून २०१८ रोजी मा.सहकार आयुक्त यांनी पुढील सभा बोलावली आहे.

**जलसाक्षरता केंद्र योजना :**

माजी प्राचार्य व संपादक 'जलसंवाद' यांचे 'महाराष्ट्र शासनाची जलसाक्षरता केंद्र योजना' याविषयी शनिवार दि. १९/०५/२०१८ रोजी व्याख्यान आयोजित करण्यात आले. त्यांनी महाराष्ट्र शासन हे अशाप्रकारे योजना कार्यान्वित करणारे पहिले राज्य असून या केंद्राचे मुख्यालय 'यशदा'मध्ये असून विभागीय केंद्रेही कार्यान्वित झाली असल्याचे स्पष्ट केले. मात्र सदर योजनेमध्ये जिल्हा, तालुका व त्याखालील स्तरावर विना मानधन काम करणे अपेक्षित असल्याने अपेक्षित प्रमाणांत योजना कार्यक्षम होईल का; याबाबत शंका प्रकट केली. असे असले तरी ज्याअर्थी वॉटर कप, नाम फौंडेशन अशा अनेक प्रकारच्या संस्था सेवाभावाने जलसंधारणाचे काम मोठ्या प्रमाणांत करीत आहेत, त्याअर्थी ही योजना शासकीय जलसंधारणाच्या कार्यक्रम कार्यवाहीसाठी हातभार लावणारी योजना ठरू शकेल, असेही मत श्रोत्यांमधून व्यक्त करण्यात आले.

**शहर शेती :**

वनराई (पूणे) यांच्या तर्फे दरमहा 'वनराई'चा अंक प्रसिद्ध करण्यात येतो. एप्रिल २०१८ चा अंक हा शहर शेती विशेषांक म्हणून प्रसिद्ध करण्यात आला. अंकातील लेख वाचून संयोजक, कृषी व सहकार व्यासपीठ यांनी श्री. रविंद्र धारिया, अध्यक्ष वनराई यांना पत्र लिहून संपादक व अन्य संबंधितांचे अभिनंदन केले. सदर पत्रामध्ये 'शहर शेती' या विषयावर पूर्णे जिल्हा सहकारी गृहनिर्माण महासंघ भिडे परिवार (मंगेशी), आणि प्रतिष्ठानतर्फे कार्यशाळा आयोजण्याबाबत प्रस्ताव दिला होता. या प्रस्तावास अनुसरून श्री. वाडेकर, संपादक वनराई, श्री. पटवर्धन, अध्यक्ष पूर्णे जिल्हा सहकारी गृहनिर्माण संस्था महासंघ व संयोजक व्यासपीठ यांची प्राथमिक चर्चा प्रतिष्ठानचे कार्यालयात होऊन दि. १९/०५/२०१८ रोजी महासंघाच्या वार्षिक सभेच्यावेळी अशी कार्यशाळा घेण्यात यावी असे ठरले. सभेत त्याशिवाय दि.०२/०६/२०१८ ला या विषयावर दुपारी २.३० ते ७ असा कार्यक्रम वनराई कार्यालयात करणेचे ठरले. सदर कार्यक्रमात 'व्यासपीठा'च्या काही सदस्यांनी सहभाग घेतला.

**उपविधी दुरुस्ती :**

ज्या सहकारी संस्थांमध्ये मागासवर्गीय सभासद वा महिला सभासद नाहीत अशा लहान संस्थांमध्ये निवडणुक होऊनही २-३ सभासद निवडून न आल्यामुळे कारभार निवडून आलेल्या सभासदांकडे सोपविण्यास अडचणी उद्‌भवत असल्याचे व त्याबाबत शासनाकडून मार्गदर्शन प्रलंबित असल्याचे मा. सहकारी निवडणूक आयुक्तांशी झालेल्या चर्चेतून समजले. त्यावर विचार करून व अन्य अधिकाऱ्यांशी चर्चा करून प्रतिष्ठानने उपविधीत दुरुस्ती सुचविली आहे. त्याचा पाठपुरावा केला असता दि. ७ जून २०१८ रोजी यासंबंधी मा. मंत्री महोदय (सहकार), मा. अतिरिक्त निबंधक व मा. आयुक्त (राज्य निवडणूक प्राधिकरण) यांची चर्चा मुंबई येथे आयोजिली होती.

**सहकारी कायदा दुरुस्ती आढावा :**

९७व्या घटना दुरुस्तीनंतर सहकारी संस्था कायद्यांत मोठ्या प्रमाणात दुरुस्ती झाली. त्यानंतर महाराष्ट्रात नवे सरकार येऊन त्यांनी काही महत्त्वाचे निर्णय घेऊन सहकार कायद्यांत बदल केले. त्याशिवाय मा. चरेगांवकर समिती, मा. मराठे समिती यांचे गठन होऊन त्यांच्याही शिफारशी अंमलात आणल्या. तेव्हा अशा प्रकारे येणाऱ्या दुरुस्त्या अंतिमतः सहकारी कार्यकर्त्यांपुढे ठेवून आढावा घ्यावा, कायद्यांतील तरतूदी व प्रत्यक्ष कारवाई यांमधील तफावतीचा आढावा घेण्यात यावा असा प्रस्ताव दि. २८/०५/२०१८ रोजी मा. नामदार मंत्री महोदय, सहकार यांना सादर केला आहे.

**रिझर्व बँकेशी पत्रव्यवहार :**

मृत्यूपश्चात ज्यांचे बँकेच्या अकाऊंट ठेवी याबाबत नॉमिनेशन नाही, तसेच नॉमिनेशन आहे त्यांनाही बँकेकडून पैसे मिळण्यात येणाऱ्या अडचणींचा विचार करुन योग्य त्या सूचना नागरी बँकांना देण्याबाबत दि.२८/०३/२०१८ ला प्रस्ताव सादर केला आहे. त्यावर पुढील पाठपुरावा सुरू आहे.

# विभागीय केंद्र- नागपूर

## कार्यवृत्त

कै. वि. वा. शिरवाडकर यांना भावांजली : प्रसिद्ध नाटककार वि. वा. शिरवाडकर म्हणजे नक्षत्रांचं देणं! त्यांची भाषाशैली अधोरेखित करणाऱ्या अजरामर भूमिका २७ फेब्रुवारी रोजी, त्यांच्या जन्मदिनानिमित्त सादर करण्यात आल्या.

याप्रसंगी अतिरिक्त प्रधान मुख्य वनसंरक्षक, वने मा. श्री. सुनील लिमये प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा.डॉ. गिरीश गांधी होते.

या कार्यक्रमाची संकल्पना रेखा दंडिगे - घिया यांची तर दिग्दर्शन दीपलक्ष्मी भट यांचे होते. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने मंगळवार दि.२७ फेब्रुवारी, २०१८ रोजी सायं. ५.३० वाजता श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह, राष्ट्रभाषा संकुल, शंकरनगर चौक, नागपूर येथे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

याप्रसंगी रेखा दंडिगे - घिया, आरती गाडबैल, रोहिणी मेश्राम, रागेश्री पिंपळघरे व स्नेहल मुळे, प्राजक्ता पाटील, हर्ष उकेश, अभिजीत मुळे व प्राची मुळे या कलावंतांनी सादरीकरण केले.

**'यशवंतराव चव्हाण यांच्या विचारांची प्रासंगिकता'**:

आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार व संयुक्त महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या १०५ व्या जयंतीदिनानिमित्त 'यशवंतराव चव्हाण यांच्या विचारांची प्रासंगिकता' या विषयावर सोमवार दि. १२ मार्च, २०१८ रोजी सायं. ५.३० वाजता श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह, राष्ट्रभाषा संकुल, शंकरनगर चौक, नागपूर येथे व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

याप्रसंगी ज्येष्ठ साहित्यिक व विचारवंत मा. डॉ. वि. स. जोग हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृष्णा इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस, कराडचे कुलपती मा.डॉ. वेदप्रकाश मिश्रा होते.

**सत्कार समारंभ** :

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूर, विदर्भ साहित्य संघ नागपूर, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद नागपूर शाखा व राम गणेश गडकरी स्मृती प्रतिष्ठान नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या प्रदेश प्रतिनिधींच्या निवडणुकीत विदर्भातून निवडून आलेल्या मान्यवर सदस्यांचा सत्कार रविवार दि. २५ मार्च, २०१८ रोजी सकाळी १०.०० वाजता श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह, राष्ट्रभाषा संकुल, शंकरनगर चौक, नागपूर येथे आयोजित करण्यात आला.

हा सत्कार समारंभ विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष मा. श्री. मनोहरराव म्हैसाळकर यांच्या शुभहस्ते व अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या नागपूर शाखेचे अध्यक्ष मा.श्री. प्रफुल्ल फरकसे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. याप्रसंगी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, विभागीय केंद्र, नागपूरचे अध्यक्ष मा.डॉ. गिरीश गांधी अध्यक्षस्थानी होते.

याप्रसंगी श्री. प्रमोद भुसारी, श्री. नरेश गडेकर, श्री. शेखर बेंद्रे, श्री. अशोक ढेरे अकोला, श्री. अनिल कुळकर्णी अकोला, श्री. उज्वल देशमुख वाशिम, श्री. नंदकिशोर कवाडकर वाशिम इ. सत्कारमूर्तींचा सत्कार करण्यात आला.

**स्त्री सूक्त - एक नाट्याविष्कार** :

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र नागपूर, व विदर्भ गौरव प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक रंगभूमीदिन व जागतिक महिला दिनानिमित्त सोमवार दि.२६ मार्च, २०१८ रोजी सायं.६.३० वाजता 'स्त्री सूक्त-एक नाट्याविष्कार' या कार्यक्रमाचे आयोजन सायंटिफिक सभागृह, आठ रस्ता चौक, नागपूर येथे करण्यात आले. हा कार्यक्रम विदर्भ गौरव प्रतिष्ठानचे

अध्यक्ष मा.श्री. दत्ताभाऊ मेघे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला.

या कार्यक्रमाची संकल्पना व निर्मिती रेखा दंडिगे-घिया, दिग्दर्शन दीपलक्ष्मी भट यांचे होते तर रेखा दंडिगे-घिया, रागेश्री पिंपळघरे, स्नेहल मुळे, आरती गाडबैल, हर्षा उकेश, प्राजक्ता पाटील, रोहिणी मेश्राम या कलावंतांचा सहभाग होता. सोबतच बालकलाकार प्रचिती इंगोले, इंद्रायणी मुळे, मैत्री मेश्राम होते नृत्याविष्कार मध्ये नृत्यदिग्दर्शन-प्रियंका अभ्यंकर यांचे होते. तसेच अमृता गुहा, अभिलाषा इंगोले, कौमुदी गिरीधर, संध्या नंबियार, सेजल देवलीकर या कलावंतांनी सादरीकरण केले.

**सत्कार व खुले कविसंमेलन :**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र नागपूर व व्रत प्रतिष्ठान नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने कवयित्री स्वर्गीय सौ. अपर्णाताई सहस्त्रबुद्धे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ 'सत्कार व खुल्या कविसंमेलना'चे आयोजन रविवार दिनांक २२ एप्रिल २०१८ रोजी सायंकाळी ४.०० वाजता श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह, राष्ट्रभाषा संकुल, शंकरनगर चौक, नागपूर येथे खालील मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले.

याप्रसंगी कवयित्री, लेखिका व समाजसेविका मा. डॉ. संध्या पवार कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होत्या. मा. डॉ. मदन कुळकर्णी, मा. मेजर हेमंत जकाते विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. मा. श्री प्रमोद भागडे, कवी हे कविसंमेलनाचे अध्यक्ष म्हणून तर मा.श्री. प्रफुल्ल भुजाडे, चांदस वाठोडा, जि. अमरावती, व मा. श्री. दीपक निलावार, उपाध्यक्ष, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूर हे अतिथी म्हणून उपस्थित होते.

**सभेचे आयोजन - शनिवार दि. २६ मे, २०१८ :**

शनिवार दि. २६ मे, २०१८ रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूरच्या कार्यकारिणीची सभा सकाळी ११ वाजता वनराई फाऊंडेशनचे नवीन कार्यालय, यश कॉम्प्लेक्स, बुलेट मोटरसायकल शो-रूमच्यावर, भरतनगर चौक, अमरावती रोड, नागपूर - ४४० ०३३, येथे सभा आयोजित करण्यात आली. सभेच्या अध्यक्षस्थानी विभागीय केंद्राचे अध्यक्ष डॉ. गिरीश गांधी होते.

## विज्ञान-संजीवनी विद्या

पण विज्ञानाकडे केवळ भौतिक दृष्टीने पाहून चालणार नाही. विज्ञान ही आधुनिक काळातील संजीवनी विद्या आहे. भारताला अशा संजीवनीची नितांत गरज आहे. कारण आपल्याला नुसते यंत्र नको आहे; त्या यंत्राबरोबर येणारे आधुनिक मन हवे आहे. आधुनिक मन हे कधीही स्थितिशील राहत नाही. ते चौफेर पाहते. इतर राष्ट्रांच्या प्रगतीचा सतत अभ्यास करते. असे आधुनिक मन भारताला हवे आहे. वस्तुस्थिती अशी आहे, की आपल्या देशाच्या मनावर पुराणमतवादाचे प्रचंड ओझे आहे.

आत्मसंतुष्टता वा निष्क्रियता ही त्यातूनच येते. भारताच्या संदर्भात विज्ञान म्हणजे केवळ भौतिक सुखे निर्माण करणारी शक्ती असून, सामाजिक परिवर्तन घडविणारी ती सामाजिक शक्ती ठरणार आहे.


**- मा. यशवंतराव चव्हाण**



नागपूर – जागतिक रंगभूमीदिन व जागतिक महिला दिनानिमित्त ‘स्त्री सुक्त-एक नाट्याविष्कार’ या कार्यक्रमाच्या आयोजनप्रसंगी मंचावर उपस्थित मान्यवर श्री. दत्ताभाऊ मेघे, प्रतिष्ठानचे सरचिटणीस डॉ. प्रदीप विटाळकर, सदस्य श्री. अनिल इंदाने व कार्यक्रमातील कलावंत




नागपूर – अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या प्रदेश प्रतिनिधीच्या निवडणुकीत विदर्भातून निवडून आलेल्या मान्यवर सदस्यांच्या सत्कार प्रसंगी व्यासपीठावर मनोगत व्यक्त करताना डॉ. गिरीश गांधी



माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी मुंबई अकॅडमीमधील सहभागी विद्यार्थी



अहमदनगर – महात्मा जोतिबा फुले जयंती प्रसंगी प्राचार्य डॉ. हरी मोरे व राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी



अहमदनगर – सावित्रीबाई फुले स्मृतिदिनानिमित्ताने कृषी महाविद्यालयातील विद्यार्थिनी आपले मनोगत व्यक्त करताना.



यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, विभागीय केंद्र लातूर तर्फे राष्ट्रमाता जिजाऊ मा साहेब तसेच स्वामी विवेकानंद यांना त्यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन




यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, विभागीय केंद्र लातूर तर्फे कथाकथनच्या कार्यक्रमात ग्रामीण जीवनावरील आपली कला सादर कर्ते, विभागीय सचिव मा. हरिभाऊ जवळगे व इतर मान्यवर मंडळी उपस्थित





अपंग हक्क विकास मंच आयोजित मोफत कृत्रिम अवयव व साधन वाटप कार्यक्रम आणि मा. यशवंतराव चव्हाण जयंती कार्यक्रम



विभागीय केंद्र रत्नागिरी आयोजित दि. ८ मार्च जागतिक महिला दिनानिमित्त दंत तपासणी करताना डॉ. कांबळे, डॉ. अमित साळवी, डॉ. मिनाक्षी पाटील इ.



विभागीय केंद्र रत्नागिरी आयोजित दि.१२ मार्च स्व. चव्हाण साहेबांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रम



विभागीय केंद्र अंबाजोगाईच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२७व्या जयंतीनिमित्तसुरेश सावंत यांच्या व्याख्यान प्रसंगी उपस्थित मान्यवर



मा. यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीदिनी विभागीय केंद्र अंबाजोगाई यांच्या वतीने अभिवादन





विभागीय केंद्र नाशिकच्या वतीने पत्रकार व वारली चित्रशैलीचे अभ्यासक संजय देवधर यांच्या मार्गदर्शनाखाली वारली चित्रसृष्टी प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.




महाराष्ट्र महिला व्यासपीठ आयोजित सौंदर्यतज्ज्ञ डॉ. पुर्णिमा म्हात्रे यांचे विनामुल्य व्याख्यान



महाराष्ट्र महिला व्यासपीठ आयोजित सहकारी गृहनिर्माण संस्था व्यवस्थापन प्रमाणपत्र वितरण सोहळा



निवृत्त प्रशासकीय अधिकारी भुजंगराव कुलकर्णी यांनी सोमवार, दि. ५ फेब्रुवारी रोजी वयाची १०० वर्षे पूर्ण केली. यानिमित्त यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, विभागीय केंद्र औरंगाबादतर्फे हृद्य सत्कार करण्यात आला.



विभागीय केंद्र औरंगाबाद आणि महात्मा गांधी मिशन यांच्या संयुक्त विद्यमाने जेएनईसी महाविद्यालयाच्या आर्यभट्ट सभागृहात शहरातील कचराकोंडी 'जागर संवाद' या कार्यक्रमात बोलताना मा. शरद काळे



यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान कार्यालयात महाराष्ट्राचे एकल महिलांसाठीचा धोरण मसूदा माननीय खासदास सुप्रियाताईंना सादर.



तृतीयपंथी आणि त्यांचे हक्क याविषयी शासकीय यंत्रणेसोबत आयोजित केलेले जाणीव जागृती प्रशिक्षण शिबिर कुलाबा पोलीस स्टेशन येथे आयोजित करण्यात आले होते.



विभागीय केंद्र ठाणे व कोकण मराठी साहित्य परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने विं. दा. करंदीरकर जीवनगौरव सन्मान प्राप्त पद्मश्री मधु मंगेश कर्णिक यांचा सत्कार करण्यात आला.



विभागीय केंद्र, ठाणे व साद संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने विद्रोही लेखक श्री. अशोक शहाणे यांची मुलाखत ज्येष्ठ पत्रकार श्री. अंबरिश मिश्र यांनी घेतली



यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई अपंग हक्क विकास मंचच्या वतीने दिव्यांगांना मोफत कृत्रिम अवयव व साधने वाटपासाठी मोजमाप शिबिराचे आयोजन






यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या मुख्य सभागृहात कॉ. दत्ता देशमुख यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त कलापथकाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला




चव्हाण सेंटर मुंबई येथे तृतीयपंथीयांसाठी 'स्वतंत्र धोरणाची आवश्यकता' या विषयावर राज्यस्तरीय चर्चासत्र






यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई आणि मराठी परिषद आयोजित विज्ञानगंगा कार्यक्रम





यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई आणि मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय येथे प्रकाशकांसोबत आयोजित बैठक





यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई येथे महाराष्ट्र राज्याचे पहिले एकल महिलांसाठी धोरण मसुदा मा. खा. सुप्रियाताईंना सादर. यावेळी मसुदा समितीच्या अध्यक्ष मा. विद्याताई चव्हाण, समितीचे समन्वयक रेणूका कड, सदस्य आशाताई मिरगे उपस्थित होते.





शिक्षण विकास मंचाच्या वतीने आयोजित 'खाजगी कोचिंग क्लासेस' या विषयावरील 'शिक्षणकट्टा' या कार्यक्रमात सहभागी मान्यवर






यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, रंगस्वर, सृजनच्या वतीने आयोजित कार्यशाळा




विभागीय केंद्र सोलापूर आणि नागरी बँक असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमात दीप प्रज्वलन करताना निमंत्रित मान्यवर

विभागीय केंद्र सोलापूर आयोजित प्रा. राजेन्द्र दास १ मे महाराष्ट्र दिनी 'यशवंतरावांच्या दृष्टिकोनातील महाराष्ट्र' या विषयावर व्याख्यान


YASHWANTRAO CHAVAN PRATISHTHAN
MKCL
Creating a Knowledge Lit World
नवीन
MS-CIT
आंतरराष्ट्रीय दर्जाचा परिपूर्ण कंप्यूटर कोर्स
या सुट्टीत घडवा तुमचे करियर,
होऊया कंप्यूटरचे स्मार्ट यूझर!
नव्या युगात आम्ही विद्यार्थी प्रवेश घेऊ फक्त
यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान
मध्येच
Windows 7
Office 2013
९५ लाखांहून अधिक लोकांना
कंप्यूटरचे 'स्मार्ट यूझर्स' बनविणारा कोर्स
Other Courses
MS-Office
Web Designing
Advance Excel
DTP
Tally Expert
5th Floor, Y.B.Chavan Centre, Gen J.Bhosale Marg, Opp Mantralaya,
Nariman Point, Mumbai - 400 021.
Tel No : 022 - 22817975 / 22043617/19 / 9769256343

# विभागीय केंद्र, कोकण

## कार्यवृत्त

**उद्योग विकास चर्चासत्र :**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई- कोकण विभागीय केंद्र, ओपेक्स स्टार्टअप ॲक्सलेटर इचलकरंजी आणि गोविंदराव निकम कॉलेज ऑफ फार्मसी, सावर्डे यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २४ फेब्रुवारी २०१८ रोजी 'उद्योगविकास' कार्यक्रम गोविंदराव निकम कॉलेज ऑफ फार्मसी, सावर्डेच्या सभागृहात आयोजित करण्यात आला. सदर कार्यक्रमात वेगवेगळ्या क्षेत्रातील नामवंत उद्योजक सहभागी झाले होते. कार्यक्रमाचे उद्घाटक श्री. सचिन पाकळेशेठ होते. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी 'माणदेशी चॅम्पियन'चे संस्थापक श्री. प्रभात सिन्हा होते. कार्यक्रमामध्ये 'सुराली ग्रुप ऑफ हॉटेल'चे श्री. सोहम अंबिये, 'सात्विक फुडस्' चे श्री. अक्षय अगरवाल आणि 'ओपेक्स स्टार्टअप ॲक्सलेटर, इचलकरंजी' चे श्री. सचिन कंभोज यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमास कोकणातील विविध भागातून, विविध महाविद्यालयातून लक्षणीय उपस्थिती होती. चर्चासत्रानंतर विद्यार्थ्यांच्या उद्योगवृत्ती वाढीस लागण्यासाठी स्टार्टअप स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. विद्यार्थ्यांनी या स्पर्धेलासुध्दा अभूतपूर्व प्रतिसाद दिला. सर्व कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी सह्याद्री शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष तथा कोकण विभागीय केंद्राचे अध्यक्ष श्री. शेखर निकम यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

**उद्योजक विकास कार्यक्रमाची उद्दिष्टे :**

१. सर्व महाविद्यालयातील सर्व क्षेत्रातील विद्यार्थ्यांचा नोकरीऐवजी उद्योगाकडे सकारात्मकतेने पाहण्याचा दृष्टिकोन वाढीस लावणे.

२. उद्योग स्थापनेपासून तो यशस्वी करण्यापर्यंतचा दृष्टिकोन विद्यार्थ्यांमध्ये रुजवण्यासाठी प्रयत्न करणे.

३. Make in India, Stand- up India, Start up India याबाबत विद्यार्थ्यांना विस्तृत माहिती देणे.

४. उद्योगांना विविध पतपुरवठा करणाऱ्या संस्थांची ओळख व माहिती विद्यार्थ्यांना देणे.

५. शेतकी पर्यटन, आदरातिथ्य, अन्न- औषध प्रक्रिया उद्योगांची जडणघडण याबाबत चर्चासत्राद्वारे त्याच उद्योगातील उद्योजकांकडून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे.

६. क्रीडा क्षेत्रातही उद्योगसंधी कशाप्रकारे मिळवता येऊ शकते, या विषयी 'माणदेशी चॅम्पियन'चे संस्थापक श्री. प्रभात सिन्हा यांच्याकडून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन.

**नारी महोत्सव :**

महिलांना आपल्या कलागुणांना, भावनांना वाट मोकळी करून देण्यासाठी दि. ३ ते ५ मार्च २०१८ या कालावधीत 'नारी महोत्सव' या कार्यक्रमांतर्गत सह्याद्री शिक्षण संकुल येथे व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले. सह्याद्री शिक्षण संस्था, सावर्डे व यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई-कोकण विभागीय केंद्र रत्नागिरी यांच्या संयुक्त विद्यमाने 'नारी महोत्सव' आयोजित करण्यात आला. याअंतर्गत सर्व बचतगट तसेच लघुउद्योजिकांना व्यावसायिकतेची संधी उपलब्ध करून देण्यात आली.

महोत्सवाचे उदघाटन सह्याद्री शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती अनुराधाताई निकम यांचे शुभहस्ते करण्यात आले. दि. ३ व ४ मार्च २०१८ रोजी महिलांसाठी रांगोळी स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, पाककला स्पर्धा, फॅन्सी ड्रेस स्पर्धा, फनी गेम्स व 'मिसेस सावर्डे' आदी स्पर्धा घेण्यात आल्या. दि. ५ मार्च रोजी कार्यक्रमाचा समारोप व झालेल्या स्पर्धांचा बक्षीस वितरण समारंभ करण्यात आला. सायंकाळी ७ वाजता 'नदी वाहते' हा चित्रपट दाखविण्यात आला.

**जागतिक महिला दिन :**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई -कोकण विभागीय केंद्र रत्नागिरी व फिनोलेक्स इंडस्ट्रीज, गोळप, रत्नागिरी यांचे संयुक्त विद्यमाने ८ मार्च 'जागतिक महिला दिना'चे औचित्य साधून बचतगट व इतर उद्योगिनी महिलांनी तयार केलेल्या वस्तूंचे प्रदर्शन व विक्री दि. ९ ते १२ मार्च २०१८ या कालावधीत संपन्न झाली.

हा महोत्सव जे.के.फाईल्स, रत्नागिरी येथील साई मंगल कार्यालय येथे घेण्यात आला. कार्यक्रमाचे उद्‌घाटन रत्नागिरी जिल्हा महिला विशेष सुरक्षा कक्षाच्या पोलीस उपनिरिक्षक व दामिनी पथकाच्या प्रमुख सौ. स्वाती यादव यांच्या शुभहस्ते करण्यात आले. कोकण विभागीय समितीचे माजी अध्यक्ष मा. श्री. राजाभाऊ लिमये, माजी उपाध्यक्ष मा. डॉ. श्रीरंग कद्रेकर, जिल्हा समिती सदस्या श्रीमती प्राची शिंदे, सदस्य श्री. विवेक सावंत, श्री.अविनाश काळे, श्री. किशोर पाटकर आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांच्या शुभहस्ते दीपप्रज्वलन करून स्व. चव्हाण साहेबांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला.

'चूल-मूल सांभाळणाऱ्या महिला आता उद्योगिनी होत आहेत. विविध क्षेत्रात भरारी मारत आहेत. गृहोपयोगी वस्तू, खाद्यपदार्थ व शोभिवंत वस्तू उत्तम प्रकारे तयार करणाऱ्या येथील महिला उद्योजिकांनीही रत्नागिरीचा ब्रॅन्ड करावा' असे आवाहन रत्नागिरी जिल्हा महिला विशेष सुरक्षा कक्षाच्या पोलीस उपनिरीक्षक व दामिनी पथकाच्या प्रमुख स्वाती यादव यांनी केले. माजी अध्यक्ष श्री. राजाभाऊ लिमये व उपाध्यक्ष मा. डॉ. श्रीरंग कद्रेकर यांनी उपस्थित महिलांना शुभेच्छा दिल्या.

श्रीमती प्राची शिंदे यांनी ९ ते १२ मार्च या चार दिवसात होणाऱ्या कार्यक्रमांबाबत महिलांना माहिती देऊन सर्व स्पर्धांमधून सहभाग घ्यावा. तसेच तज्ज्ञ डॉक्टरांच्या होणाऱ्या मार्गदर्शनाचाही लाभ घ्यावा असे सांगितले. श्रीमती स्वाती यादव यांचे प्रतिष्ठानच्यावतीने शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन आभार मानण्यात आले.

दि. ९ मार्च २०१८ रोजी दुपारी २.३० वा. महिलांची डोळे व कान तपासणी मोफत करण्यात आली. 'लायन्स आय केअर हॉस्पिटल'चे डॉ. पाटील यांनी डोळ्यांची तर डॉ. सूर्यवंशी यांनी महिलांच्या कानांची तपासणी केली. सायंकाळी ३.३० वाजता 'बेटी बचाओ बेटी पढाओ' हा विषय देऊन रांगोळी स्पर्धा घेण्यात आली. त्याचप्रमाणे महिलांसाठी फनी गेम्स घेण्यात आले.

स्त्रियांवरील वाढते अत्याचार, कुटुंबामध्ये पती, इतर कुटुंबियांकडून होणारी स्त्रीची पिळवणूक, शारीरिक, मानसिक छळ, पती- पत्नीमधील वैवाहिक मतभेद, विवाहबाह्य संबंध, लग्नाचे आमिष दाखवून होणारी फसवणूक आदी कित्येक समस्यांचा विचार केल्यास आज कौटुंबिक वातावरण पूर्णपणे बिघडत चालले आहे आणि त्याचा परिणाम म्हणून प्रामुख्याने कुटुंबातील स्त्री व मुले यांचा सर्वांगीण विकास खुंटला आहे. या सर्व समस्यांवर चर्चा करून सहारा कौन्सिलिंगच्या प्रमुख श्रीमती अंजली आमकर यांनी महिलांना योग्य ते मार्गदर्शन केले. हा कार्यक्रम दि. १० मार्च २०१८ रोजी दुपारी ३ वाजता आयोजित करण्यात आला होता. महिलांनी स्वत:चा हक्क कसा मागावा याची विविध उदाहरणे देऊन त्यांनी मार्गदर्शन केले. प्रत्येक समस्येचे कारण वेगळे असल्याने त्यावर करण्यात येणारे उपायही वेगळे आहेत असेही त्यांनी सांगितले.

दि. ११ मार्च २०१८ रोजी ११.३० वाजता महिलांसाठी मोफत दंतचिकित्सा व मार्गदर्शन आयोजित करण्यात आले होते. प्रथम डॉ. सौ. कांबळे यांनी आरोग्याचे दृष्टीने असलेले दातांचे महत्त्व, दातांची निगा व समस्या यांवर उत्तम मार्गदर्शन केले. डॉ. सौ. कांबळे, डॉ. अमित साळवी व डॉ. मिनाक्षी पाटील यांनी उपस्थित महिलांची दंतचिकित्सा करून त्यावर कोणते उपाय करावेत हे सांगितले.

'पोह्यापासून विविध पदार्थ' या विषयावर दुपारी २ वाजता पाककला स्पर्धा घेण्यात आली. पाककला स्पर्धेमध्ये बहुसंख्य महिलांनी सहभाग घेतला. 'मधुमेह' या एका आजारापासून अनेक आजार होतात. प्रत्येक कुटुंबामध्ये एकतरी मधुमेह झालेली व्यक्ती असतेच. 'मधुमेह' या आजाराची लक्षणे कोणती असतात, झालाच तर त्याची असणारी पथ्ये - म्हणजेच काय खावे? काय खाऊ नये, तो होऊ नये यासाठी कोणती काळजी घ्यावी यासर्वांचे मार्गदर्शन दि. ११ मार्च २०१८ रोजी सायंकाळी ३ वाजता डॉ. पल्लवी गद्रे यांनी केले. त्यांनी उपस्थित महिलांना 'मधुमेह' या आजाराबाबत कोणती काळजी घ्यावी, हे सविस्तर सांगितले. महिलांनीही आपल्या शंका विचारल्या.

सायं. ४.१५ वाजता पोह्यांपासून विविध पदार्थ बनविण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. हे प्रशिक्षण श्रीमती वैभवी हर्षे यांनी दिले.

दि. १२ मार्च २०१८ रोजी स्व. चव्हाण साहेबांच्या

जयंतीनिमित्त मिस्त्री हायस्कूल, रत्नागिरीचे श्री. इम्तियाज सिद्दीकी यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. व्याख्यानामध्ये त्यांनी स्व. यशवंतरावांचा जीवनपट उलगडून दाखविला. त्यांच्या राजकीय, सामाजिक व शैक्षणिक कार्याची माहिती त्यांनी सांगितली. दुष्काळी भागात जन्मलेल्या यशवंतरावांना त्यांच्या आईने कसे घडविले हे सांगून त्यांच्या नावाने सुरू केलेले 'यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान' खूप चांगले काम करीत आहे असे मतही त्यांनी यावेळी व्यक्त केले.

यावेळी फिनोलेक्स इंडस्ट्रीज चे जनसंपर्क अधिकारी मा. डॉ. आशुतोष मुळ्ये, कोकण विभागीय समितीचे माजी अध्यक्ष मा.श्री. राजाभाऊ लिमये, श्रीमती प्राची शिंदे, मा.प्रा. चंद्रमोहन देसाई, श्री. किशोर पाटकर, श्री. विनायक हातखंबकर आदी मान्यवर उपस्थित होते.

फिनोलेक्स कंपनीमार्फत महिला सक्षमीकरणासाठी विविध उपक्रम राबविले जातात. फिनोलेक्स कंपनीमार्फत महिलादिनानिमित्त महिलांची मोफत कर्करोग तपासणी केली जाते. महिलांना आजार असल्याचे निष्पन्न झाल्यास उपचारासाठी कंपनीमार्फत सहकार्य केले जाते. याचप्रमाणे यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे काम कौतुकास्पद आहे, महिलांनीही पुरुषांप्रमाणे सर्वच क्षेत्रात आपली प्रगती केली आहे. कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळून सर्वच क्षेत्रात महिलांनी प्रगती केली आहे असे मत फिनोलेक्स इंडस्ट्रीजचे जनसंपर्क अधिकारी डॉ. आशुतोष मुळ्ये यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाचा समारोप करताना दि. ९ ते १२ मार्च २०१८ या कालावधीत घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांचे बक्षिस वितरण उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचा समारोप सांस्कृतिक कार्यक्रमाने करण्यात आला. प्रा. चंद्रमोहन देसाई यांनी उपस्थितांचे आभार मानले तर प्रा. किशोर पाटकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

**यशवंतराव चव्हाण जयंती, लांजा :**

स्व. स्वातंत्र्यसेनानी शिवाजीराव सावंत लांजा तालुका सहकारी कुक्कुट व्यावसायिक संस्थेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त स्वतंत्र्यसेनानी शिवाजीराव सावंत यांचा स्मृतिदिन व महाराष्ट्राचे शिल्पकार स्व. यशवंतराव चव्हाण यांचा जयंती सोहळा दि. १२ मार्च २०१८ रोजी संस्थेच्या कृषिभूषण रणजितराव खानविलकर सभागृहात आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष श्री. विवेक सावंत होते. प्रमुख पाहुणे म्हणून आमदार राजन साळवी, जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा सौ. स्नेहा सावंत, पंचायत समितीच्या सभापती सौ. दिपाली दळवी, रत्नगिरी कृषी प्रक्रिया सहकारी संस्थेचे श्री. जयवंत विचारे आदी मान्यवर उपस्थित होते.

जागतिक दर्जाचे शहर मुंबई आणि जागतिक पर्यटनस्थळ गोवा या दोन महानगरांमध्ये कोकण वसले आहे. म्हणूनच कोकणाला सर्वांगीण विकासाची संधी असताना या ठिकाणी पायाभूत सुविधांची मोठी वानवा आहे. या सुविधा निर्माण करण्यात आपण कमी पडत असून लोकप्रतिनिधींचे अक्षम्य दुर्लक्ष याला कारणीभूत असल्याची खंत रत्नागिरी कृषी प्रक्रिया सहकारी संस्थेचे अध्यक्ष जयवंत विचारे यांनी व्यक्त केली.

या कार्यक्रमाप्रसंगी तालुक्याच्या विविध क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्ती व संस्थांचा विशेष गौरव करण्यात आला. व्यक्ती पुरस्कारामध्ये सहकार नेते शामराव पानवलकर, प्रगतीशील शेतकरी दिलीप उर्फ भाऊ नारकर, श्रीपत धनावडे, अजिंक्य कुरूप, श्रीमती अनुराधा राणे, तिलोत्तमा खानविलकर, स्वप्ना सावंत, धनिता चव्हाण, वर्षा कांबळे तर संस्था पुरस्कारांमध्ये लांजा नागरी सहकारी पतसंस्था लांजा, कुणबी नागरी पतसंस्था, लांजा सह. दूध उत्पादक संस्था, माचाळ मुचकुंदी परिसर पर्यटन विकास सेवा सहकारी संस्था या संस्थांचा गौरव करण्यात आला.

या कार्यक्रमानिमित्ताने राष्ट्रीय महामार्ग क.६६ चे 'चौपदरीकरण आणि कोकण विकासाच्या संधी' या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते.

**वसुंधरा दिन :**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई-जिल्हा केंद्र रत्नागिरी तर्फे वसुंधरा दिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन केंद्र शाळा निवेंडी व शाळा गणपतीपुळे येथे केले होते. वसुंधरेच्या संवर्धनाचा जागतिक कार्यक्रम साजरा होत असताना राज्य शासनाने ५० कोटी

वृक्षलागवड व प्लास्टीक बंदीचा संकल्प केला आहे. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान दरवर्षी वृक्ष लागवड करायची असेल तर चांगल्या बिया रुजवून नेटकी रोपे तयार करण्याचा कार्यक्रम राबवित असते. विश्वभर प्रचंड औद्योगिकीकरण झाले व तेवढ्याच प्रमाणात प्रदूषण झाल्याने वसुंधरेची अवहेलना झाली हे हेरून प्रतिष्ठान मानव जातीच्या कल्याणाचा, वसुंधरेच्या संवर्धनाचा कार्यक्रम राबवित असल्याचे उद्‌गार शिक्षक नेते हातखंबकर यांनी काढले. या दोन्ही शाळांत त्यांचे हस्ते बियांचे वाटप केले. कार्यक्रमासाठी माचाळ पर्यटन विकास केंद्राचे अध्यक्ष विवेक सावंत यांनी बियाणे पुरविले. चालू वर्षी प्लास्टीक बंदी असल्याने बिया रुजत घालण्यासाठी वापरलेल्या शहाळ्याचे कव्हर, रिकामे डबे याचा वापर करण्याचे ठरले व त्यासाठी लागणारे डबे शाळा व्यवस्थापन कमिटीचे अध्यक्ष विनायक सावंत, गणपतीपुळे सरपंच सौ. नूतन माईगडे व व्यवस्थापन कमिटीचे अध्यक्ष सुहास भाटलेकर यांच्या नेतृत्वाखाली सभा होऊन उपलब्ध करून देण्याचे ठरले. बिया रुजत घालण्याचे नियोजन व तयार रोपाला 'यशवंत' नाव देण्याचे बालकांनी आनंदाने ठरविले.

हा सर्व कार्यक्रम प्रतिष्ठानचे जिल्हा समिती अध्यक्ष श्री. कृ. आमदार पाटील यांचे नेतृत्वखाली संपन्न झाला. राज्यशासनाच्या आदर्श शिक्षिका व निवेंडीच्या केंद्रप्रमुख सौ. वैजयंती पाटील यांनी सौ. स्मिता जोशी (गणपतीपुळे), सुरेंद्र हातीसकर (निवेंडी) या शाळा प्रमुखांसह अनिल शेट्ये, संतोष देवळेकर, गायकवाड या सहकाऱ्यांच्या मदतीने, आत्मविश्वासाने कार्यक्रम यशस्वी करण्याचा संकल्प केला. या कार्यक्रमाला ग्रामपंचायत सदस्य, गावातील जेष्ठ नागरिक भोसले इ. नागरिक उपस्थित होते.

## साहित्य व समाज

साहित्य कोणत्याही रंगाचे असले तरी चालेल, पण आजूबाजूच्या परिस्थितीचा डोळसपणे अभ्यास करून, समाजात सर्व थरांत निर्माण झालेल्या अस्वस्थतेची जाणीव असणारे समाजचिंतन त्यात असले पाहिजे. आचार्य विनोबा भावे यांनी एकदा म्हटले होते, की लोकशाही हे प्रज्ञेचे राज्य असते. ही प्रज्ञा समाजाभिमुख असली पाहिजे. तरच ती समाजाचे परिवर्तन घडवून आणील, त्याला मार्गदर्शन करीत राहील. बुध्दीची कुवत वाढविणे, मने व्यापक करणे, जगातील नव्या प्रवाहांची समीक्षा करणे, स्वत:च्या संस्कृतीचा व परंपरेचा बुध्दिनिष्ठ अभ्यास करून, नव्या परिस्थितीला सुसंगत अशा मूलभूत परिवर्तनासाठी जनमानसाला तयार करणे ही पुढच्या पिढीतील चिंतनशील साहित्याची उद्दिष्टे असू शकतात.

**– मा. यशवंतराव चव्हाण**

# विभागीय केंद्र, औरंगाबाद

## कार्यवृत्त

**भुजंगराव कुलकर्णी यांचा सत्कार :**

निवृत्त प्रशासकीय अधिकारी भुजंगराव कुलकर्णी यांनी सोमवार दि. ५ फेब्रुवारी रोजी वयाची १०० वर्षे पूर्ण केली. यानिमित्त यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई-विभागीय केंद्र औरंगाबादतर्फे त्यांचा हृद्य सत्कार करण्यात आला.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्या औरंगाबाद विभागीय केंद्राचे अध्यक्ष अंकुशराव कदम, एमजीएमचे विश्वस्त प्रतापराव बोराडे, प्रतिष्ठानच्या विभागीय केंद्राचे सचिव निलेश राऊत, विजय कान्हेकर, सुहास तेंडुलकर यांनी भुजंगरावांच्या निवासस्थानी जाऊन त्यांचा गौरव करीत दीर्घायुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी प्रतिष्ठानचे सुबोध जाधव, गणेश घुले यांच्यासह प्रमोद कुलकर्णी उपस्थित होते.

या प्रसंगी झालेल्या चर्चेत भुजंगरावांनी माजी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, खासदार शरद पवार आणि खासदार सुप्रिया सुळे यांच्यासोबतच्या आपल्या आठवणींना उजाळा दिला.

**'चित्रपट चावडी'त शाम बेनेगल दिग्दर्शित 'समर':**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई-विभागीय केंद्र औरंगाबादत, एमजीएम जनसंवाद व वृत्तपत्रविद्या महाविद्यालय आयोजित 'चित्रपट चावडी' या उपक्रमांतर्गत १९९९ ला प्रदर्शित व शाम बेनेगल दिग्दर्शित, नॅशनल फिल्म अवार्ड प्राप्त 'समर' हा चित्रपट शनिवार, दि. १० फेब्रुवारी २०१८ रोजी, सायं. ५ वा. आईनस्टाईन सभागृह, जेएनईसी महाविद्यालय, एमजीएम परिसर, औरंगाबाद येथे दाखविण्यात आला.

जातीसंस्था व दांभिकपणावर प्रकाशझोत टाकणारा हा चित्रपट असून त्यात किशोर कदम, राजेशरी सचदेव, रजीत कपूर, रवी झंकार, सीमा बिस्वास यांच्या प्रमुख भूमिका आहेत. हा चित्रपट मध्य प्रदेशातील छोट्या गावातील शेतकऱ्याच्या वास्तविक जीवनावर आधारित आहे. या गावातील दोन समुदायांसाठी एका पाण्याचा पंप बसविण्यात येतो. यातील एक समुदायातील सदस्य नाथू (किशोर कदम) या निर्णयाचा निषेध करतो. त्यावेळी त्यास गावातील जमीनदार प्रतिकार करतो. नाथूच्या समुदायातील लोकांवर आर्थिक प्रतिबंध लादण्यात येतात. त्यांना मंदिरात प्रवेश करण्यास बंदीचे नियम तयार केले जातात. नाथूचे घर रहस्यमयरित्या जाळण्यात येते. त्यामुळे नाथू या अपमानास्पद परिस्थितीचा बदला घेण्यासाठी विद्रोह करतो व त्यातूनच निर्माण होतो हिंसाचार.

यावेळी चित्रपट रसिक, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वितेसाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई-विभागीय केंद्र औरंगाबादचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

**संगीत संध्या :** ''अक्षरांच्या साह्यानी, काना मात्रा वेलांट्यांनी, मऱ्हाटीचा टिळा मी लावीला, जिवापाड जपू मायमराठीला'' या कवयित्री प्रिया धारूरकर यांच्या लावणीला तेवढ्याच उत्स्फूर्तपणे उपस्थितांनी टाळ्यांची दाद दिली.

मराठी भाषा दिनानिमित्त मंगळवार, दि. २७ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५ वाजता यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई -विभागीय केंद्र औरंगाबाद व एमजीएम जनसंवाद व वृत्तपत्रविद्या महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित व नाथरंग प्रस्तुत एमजीएमच्या आईनस्टाईन सभागृहात 'ऐसी अक्षरे रसिके मेळवीन' हा काव्य सांगीतिक कार्यक्रम संपन्न झाला. मराठी भाषेचा आजपर्यंतचा प्रवास, गीत, भजन, लावणी, पोवाडा अशा विविधांगाने उलगडण्यात आला. 'मधुरभाषिणी अमृतवाणी वंदन करिते तुला...' असे वंदन गीत सौख्यदा देशपांडे यांनी सादर करून काव्य सांगीतिक कार्यक्रमाला सुरुवात केली. प्रिया धारूरकर यांनी कुसुमाग्रज यांचे 'माझ्या मराठी मातीचा, लावा ललाटास टिळा' हे काव्य सादर केले. आद्यकवी मुकुंदराज यांच्यापासून ते आजमितीपर्यंतचे काही निवडक काव्य, गीत वाचून दाखवीत

त्यांनी त्या मैफलीत रंगत आणली. यावेळी कुसुमाग्रज, सुरेश भट, माधव ज्युलियन, ना. गो. नांदापूरकर अशा साहित्यिक, कवींच्या कविता, गीत संगीताच्या तालावर सुरेखपणे मांडल्या. बहिणाबाईंच्या ओवीही सर्वांना आनंदित करून गेल्या. 'अवनीत हिंदवी राष्ट्रा, त्याचे उत्कृष्ट, महावैशिष्ट्य...नांदवी तीच माय मराठी' हा शाहीर महर्षि आत्माराम पाटील यांचा पोवाडा अजिंक्य लिंगायत यांनी सादर करीत सर्वांची दाद मिळविली.

अखेरीस मेणबत्तीच्या उजेडात 'मी मराठी बोलतो, लिहितो आणि वाचतो, याचा मला अभिमान आहे' ही प्रतिज्ञा सर्वांनी म्हटली. प्राचार्य रेखा शेळके अध्यक्षस्थानी होत्या. प्रारंभी श्रीकांत देशपांडे यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमासाठी रसिकांनी मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिला. विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, काव्य रसिक मोठ्या संख्येने कार्यक्रमाला उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वितेसाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई-विभागीय केंद्र औरंगाबादचे पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

**जागतिक महिलादिनानिमित्त किशोरवयीन मुलींचा मेळावा :**

जागतिक महिलादिनानिमित्त यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई-विभागीय केंद्र औरंगाबाद, कम्युनिटी डेव्हलपमेंट ट्रस्ट मुंबई संचालित आशा केंद्र पूर्णतांबा व अंगणवाडी क्रमांक ३ लोणीखुर्द, ता. वैजापूर यांच्या संयुक्त विद्यमाने किशोरवयीन मुलींचा मेळावा 'प्रगतीसाठी आग्रह धरा' चे आयोजन बुधवार दि. ७ मार्च २०१८ रोजी, सकाळी ९.३० ते ११.३० या वेळेत विनायक महाविद्यालय लोणीखुर्द, ता. वैजापूर येथे करण्यात आले. सदरील कार्यक्रमाकरिता आशा एकल महिला व बालविकास मंच, विकास अध्ययन केंद्र व फियान महाराष्ट्र ह्या सहयोगी संस्था म्हणून लाभल्या होत्या.

यावेळी सायबर क्राईम, मुला-मुलींचे लैंगिक शोषण तसेच किशोरवयीन मुलींचे आरोग्य आदी विषयांवर विकास अध्ययन केंद्राच्या समन्वयक मा. रेणुका कड व मा. शबाना शेख यांनी मुला-मुलींना मार्गदर्शन केले. 'जागर'च्या पहिल्या अंकाचे प्रकाशन करण्यात आले. अंगणवाडीच्या पर्यवेक्षिका छाया राऊत, शाळेचे मुख्याध्यापक रणजीतसिंग राजपूत, सुश्री रिडे, चौथे, सुनंदा पाटील, कोमल कुमावत आदींची उपस्थिती होती. यावेळी मुलींनी सुमधुर आवाजात गीतगायन केले. सदरील कार्यक्रमाकरिता जवळपास आठशे ते हजार विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

**यशवंतराव चव्हाण जयंतीनिमित्त व्याख्यान :**

शिक्षण अन् विविध क्षेत्रातील आपली भागीदारी कमी करत सरकार धोरणांमध्ये बदल करते आहे. बड्या अन् विदेशी कंपन्यांना डोळ्यासमोर ठेऊन होत असलेले हे बदल सरकारांवर बेबंद भांडवलशाही, कार्पोरेटशाहीचा पगडा वाढल्याची लक्षणे आहेत, असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार हेमंत देसाई यांनी आज (ता.१२) केले. एमजीएम परिसरातील आईनस्टाईन सभागृहात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. 'देशाचा चौकीदार झोपलेला अन् चोर चोरी करून जात आहेत,' असे सांगत पंतप्रधान मोदींवरही त्यांनी टीका केली.

महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या १०५ व्या जयंतीनिमित्त यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई विभागीय केंद्र औरंगाबाद व एमजीएम जनसंवाद व वृत्तपत्रविद्या महाविद्यालयातर्फे सोमवार दि. १२ मार्च २०१८ रोजी 'लोकशाही की कार्पोरेटशाही' या विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. यावेळी ते बोलत होते, बडे उद्योग, कंपन्या राजकीय पक्षांना मोठ्या प्रमाणात देणग्या देत आहेत. यामध्ये रिअल इस्टेट, मायनिंग, पेट्रोलियम कंपन्या, बिल्डरांचा वरचा क्रमांक लागतो. देणग्या ह्या माहिती अधिकाराच्या बाहेर ठेवण्यात आल्या त्याला भाजपसह काँग्रेसचाही पाठिंबा आहे. एवढ्या प्रमाणात देणग्या देणाऱ्या कंपन्या आपल्या हितासाठी, हेतू साध्य करून घेण्यासाठी धोरणांमध्ये बदल करण्यास दबाव टाकतात. पैशांच्या थेट भ्रष्टाचारापेक्षा धोरण बदलण्यातील हा भ्रष्टाचार गंभीर आहे. अशावेळी राजकर्त्यांच्या चारित्र्य, वृत्तीबद्दल शंका निर्माण होतेच. सध्याचे सरकारही दाखवते एक अन् करते एक. आगामी काळात देशात पाच मोठे औद्योगिक कॉरिडॉर होत आहेत. त्यामध्ये देशातील ४५ टक्के जमीन उद्योगांच्या घशात जाणार आहे. जमीन जाते, परंतु या नागरिकांचे पुनर्वसन होत नाही. सर्वसामान्यांना कर्ज देताना उपकार केल्यागत भावना असते, त्याचवेळी बड्या उद्योगांना मात्र, वेगळी वागणूक असते. हर्षद मेहता, केतन पारिख, सी.आर.भन्साळी, विजय माल्या, नीरव मोदी हे बँकांना बुडवून पसार होतात. ते पसार होईपर्यंत ही व्यवस्था झोपलेली

असते, नंतर हे एकमेकांवर आरोप करतात अन् यंत्रणा पुन्हा नवा भ्रष्टाचार करायला मोकळी होते, अशी खंतही त्यांनी व्यक्त केली.

माध्यमांमध्ये बाजारबुणगेपणा वाढला असल्याचे देसाई यांनी सांगितले. दीपिका-रणबीर कोठे जाणार, सासबहूचं काय होणार हे शोधण्यातच माध्यमांना रस दिसतो. महत्त्वाचे प्रश्न बाजूला, इतर प्रश्नांना मोठे करण्यात धन्यता मानली जाते. महिला दिनालाही मार्केटिंगचे स्वरूप आल्यागत भासविले जाते. शेतकऱ्यांचे, देशाचे महत्त्वाचे प्रश्न मागे पडत आहेत.

आरोग्यासारख्या क्षेत्रात खासगी हस्तक्षेप वाढत आहे. परिणामी वेळेवर आणि मुबलक औषधींचा पुरवठा न होणे, महागडे उपचार न मिळणे असे प्रश्न उद्‌भवतात. आजही मुंबईतील 'केईएम' सारख्या रुग्णालयात रुग्णांना बाहेरून औषधे घ्यायला सांगितले जाते. याशिवाय १९९५ नंतर रिझर्व्ह बँकेत कर्मचाऱ्यांची नेमणूक झाली नाही, ही खरी कार्पोरेटशाही असल्याचे श्री. देसाई म्हणाले.

मराठीचे कंकण हाती बांधलेल्या राज ठाकरे यांनी अगोदर शुद्ध मराठीत बोलावे, हे सांगताना राज हे माझ्याकडे काही विषयांच्या 'माहित्या' हाती आलेल्या आहेत, असे म्हणतात. तो शब्द 'माहिती' असा आहे, असा टोला त्यांनी लगावला. यासोबत अमित शहा, पंतप्रधान मोदी यांचा देशाचे चौकीदार असा उल्लेख करीत श्री. देसाईंनी टीकेची झोड उठवली. भाजपसोबतच काँग्रेसही धुतल्या तांदळाचा पक्ष नाही, असा टोलाही त्यांनी लगावला.

अध्यक्षीय समारोपात अंकुशराव कदम यांनी यशवंतरावांच्या आठवणींना उजाळा दिला. प्राचार्य डॉ. रेखा शेळके यांनी प्रास्ताविक केले. हिमांशु देशमुख यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी, राजकीय व सामाजिक अभ्यासक व विभागीय केंद्राचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**चित्रपट चावडीत क्लोज-अप चित्रपट :**

अतिव्यावसायिकीकरणामुळे भारतीय चित्रपटांतील कला लुप्त झाली आहे. अंतर्मनावर दूरगामी परिणाम करण्याची ताकद असलेले चित्रपट संवेदनशीलता आणि वैचारिक भान निर्माण करण्यापेक्षा विकृतीला खतपाणी घालत आहेत. यासाठी सेन्सॉर बोर्डावर मानसोपचार तज्ज्ञांचीही नियुक्ती करायला हवी, अशी अपेक्षा दिग्दर्शक शिव कदम यांनी 'चित्रपट चावडी'त शनिवारी (२४ मार्च) यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई-विभागीय केंद्र औरंगाबाद आणि एमजीएम जनसंवाद व वृत्तपत्रविद्या महाविद्यालय आयोजित परिसंवादात बोलताना व्यक्त केली. एमजीएमच्या आईनस्टाईन सभागृहात झालेल्या या परिसंवादात ज्येष्ठ पत्रकार महेश देशमुख, आंतरराष्ट्रीय चित्रपट अभ्यासक प्रा. अभिषेक भोसले यांनीही मार्गदर्शन केले. यावेळी मंचावर प्रा. विशाखा गारखेडकर यांची उपस्थिती होती. कदम म्हणाले, भारतीय चित्रपट व्यावसायिकतेच्या प्रवाहात असा काही वाहून जात आहे की, आपण मनोरंजनासोबत समाजाला वैचारिक दिशा देण्याचेही माध्यम आहोत, याचे भानच उरलेले नाही. उत्तम विषय निवडणे, दर्जेदार पटकथा लिहिणे आणि आशयघन गाणी असण्याचा जमाना आता उरला नाही, अशी खंतही त्यांनी व्यक्त केली.

देशमुख म्हणाले की, अधिकाधिक जागतिक चित्रपट पाहायला हवेत; त्यांची भाषा, संवादशैली अन् एखादा विषय मांडण्याच्या शैलीचे बारकाईने निरीक्षण केले पाहिजे. चित्रपट क्षेत्रात येऊ पाहणाऱ्यांसाठी तर हे उपयुक्त आहेच; पण प्रेक्षकांनीही जागतिक मानसिकता काय आहे हे व्यक्ती म्हणून समृद्ध होण्यासाठी पाहायला हवे, असे सांगितले. प्रा. भोसले यांनी आंतरराष्ट्रीय चित्रपटाच्या परिघाची सैर आपल्या मार्गदर्शनातून घडवली. चित्रपट पाहणे ही एक कला आहे आणि एमजीएमच्या नव्या अभ्यासक्रमातून ही कला शिकविण्यात येणार असल्याकडे लक्ष वेधले.

१९९०च्या दशकात गाजलेला इराणी चित्रपट 'क्लोजअप'चे प्रदर्शन यावेळी करण्यात आले. एका बड्या चित्रपट दिग्दर्शकाचा तोतया बनून एक जण एका कुटुंबाला फसवतो. त्या व्यक्तीला मग ते कुटुंब पकडून देते. त्याच्यावर खटला दाखल होतो. त्याचा हा अतिशय सुरेख कोर्टरूम ड्रामा यामध्ये आहे. प्रवाहात वाहणारा आणि प्रवाहाविरुद्ध जाणारा जागतिक दर्जाचा सिनेमा काय असतो याची जाणीव यानिमित्ताने चित्रपट चावडी रसिकांना घेता आली. यावेळी मोठ्या संख्येने सिनेरसिक, अभ्यासक व विद्यार्थी तसेच विभागीय केंद्राचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

**कचराकोंडी : जागर संवाद**

कचऱ्याची कोंडी फक्त औरंगाबादेत नाही, संपूर्ण देशच डम्पिंग ग्राउंड झाल्याचे चित्र आहे. या संकटातून बाहेर पडण्यासाठी प्रत्येकाने 'मी महापालिकेला कचरा देणार नाही' यासह त्रिसूत्री अमलात आणावी, असे आवाहन पद्मश्री डॉ. शरद काळे यांनी सोमवार, दि. २ एप्रिल रोजी 'जागर संवाद' कार्यक्रमात केले.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई-विभागीय केंद्र औरंगाबाद आणि महात्मा गांधी मिशन यांच्या संयुक्त विद्यमाने जेएनएसी महाविद्यालयाच्या आर्यभट्ट सभागृहात कचराकोंडी 'जागर संवाद' कार्यक्रम झाला. यावेळी डॉ. काळे बोलत होते. व्यासपीठावर महापौर नंदकुमार घोडेले, विभागीय आयुक्त डॉ. पुरुषोत्तम भापकर, एमजीएमचे विश्वस्त तथा प्रतिष्ठानच्या औरंगाबाद केंद्राचे अध्यक्ष अंकुशराव कदम, 'सकाळ' मराठवाडा आवृत्तीचे संपादक संजय वरकड, सचिन मुळे, डॉ. भालचंद्र कांगो, सुनील कीर्दक, बिजली देशमुख, ' घाटी'च्या अधिष्ठाता डॉ. कानन येळीकर यांची उपस्थिती होती. डॉ. काळे पुढे म्हणाले, 'कचरा मानवाने निर्माण केलेला आहे, 'फेकण्या'ची प्रवृत्ती वाढत असल्याने प्रत्येक शहरात हा प्रश्न गंभीर बनला आहे. घरात निघणाऱ्या तीनशे ग्रॅम कचऱ्याची आपण विल्हेवाट लावू शकत नाही, महापालिकेला दोष देऊन काय फायदा? ओल्या कचऱ्यापासून घरातच खतनिर्मिती व सुक्या कचऱ्याची आपण विल्हेवाट लावल्यास कचऱ्याचा प्रश्न कायमस्वरूपी मिटेल. प्रत्येकाने 'माझा कचरा, माझी जबाबदारी' हा नारा दिला पाहिजे. प्लॅस्टिकबंदीसाठी शासनाला मदत करा,'' असे आवाहन त्यांनी केले. भापकर म्हणाले, 'घनकचरा व्यवस्थापनाची चळवळ मराठवाडाभर पोहोचण्याची गरज निर्माण झाली आहे.' निलेश राऊत यांनी प्रास्ताविक केले. श्री. कदम यांनी आभार मानले. महेश अचिंतलवार यांनी सूत्रसंचालन केले.

**...तरच शहर स्वच्छ होईल**

डॉ. काळे यांनी उपस्थितांना तीन प्रकारे शपथ दिली. त्यात माझ्या घरातील कचरा बाहेर टाकणार नाही, अन्नाचा एक कणही वाया घालणार नाही, तीन झाडे लावणार, अशी शपथ घेऊन प्रत्येकाने त्याचे पालन केले तरच औरंगाबाद शहर स्वच्छ होईल, असे डॉ. काळे म्हणाले.

अजिंठा लेणीच्या पाहणी ची आठवण सांगताना डॉ. काळे म्हणाले, ''विदेशी पाहुण्यांना घेऊन गेलो तेव्हा परिसरात मोठ्या प्रमाणात प्लॅस्टिक कचरा साचला होता. हा कचरा पाहून लाज वाटली व आधी कचरा गोळा केला, त्यानंतरच लेणी पाहिल्या.''

जागर संवादाच्या दुसऱ्या सत्रात स्वच्छ पूणे, स्त्री मुक्ती संघटना-मुंबई, एमजीएम क्लीन इंडिया सेंटर-औरंगाबाद, सीआरटी-औरंगाबाद, औरंगाबाद कनेक्ट टीम, वायुमित्र, पूणे या महाराष्ट्रातील विविध स्वयंसेवी संस्थांनी त्या-त्या भागात राबविलेल्या यशस्वी प्रयोगांचे सादरीकरण केले.

महापौर नंदकुमार घोडेले यांनी कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासंदर्भात करीत असलेल्या प्रयत्नांची माहिती दिली. नागरिक जागरूक आहेत, त्यामुळे आतापर्यंत कोणी रस्त्यावर उतरले नाही, यापुढेही असेच सहकार्य मिळेल, शासनाने घनकचरा व्यवस्थापनासाठी दिलेल्या निधीतून, येत्या काही दिवसांत प्रकल्प मार्गी लागेल, असे घोडेले म्हणाले.

संजय वरकड यांनी 'औरंगाबाद शहर व कचरा' याविषयी सादरीकरण करताना कचऱ्यासंदर्भातील प्रमुख घडामोडी सांगितल्या. 'गोरगरीब राहतात या भागातच कचरा नेला जातो व त्यांना पोलिसांच्या तोंडी दिले जाते. कचरा ही महापालिकेची जबाबदारी असतानादेखील कधी नव्हे, तो राज्य शासनाला हस्तक्षेप करावा लागला, ही खेदाची बाब आहे. कचराकोंडीला विरोधकांसह सर्वच पक्ष जबाबदार आहेत. महापालिकेत कचऱ्यासारख्या गंभीर विषयावर चर्चा न होता, इतर विषयांना महत्त्व दिले जाते,' अशी खंतही त्यांनी व्यक्त केली.

शहराची कचराकोंडी फुटेपर्यंत महापालिकेचा कारभार प्रशासनाकडे देण्यात यावा. तुम्ही राजीनामा का देत नाही, कचऱ्यात मोठे अर्थकारण असल्यानेच हा प्रश्न सोडविला जात नाही असा थेट सवाल महापौर नंदकुमार घोडेले यांना कचऱ्यासंदर्भात आयोजित 'जागर' संवादात नागरिकांनी केला.

**'वेस्ट पासून बेस्ट' पुस्तिका**

शालेय जीवनापासून कचरा हा आपल्या ऊर्जेचे स्रोत ठरू शकतो, हा विचार विद्यार्थ्यांच्या मनात जागविणे गरजेचे आहे.

औरंगाबाद येथील रचनात्मक कार्यात अग्रेसर असलेला युवक परीक्षित सूर्यवंशी याने शालेय विद्यार्थ्यांकरिता अतिशय महत्त्वाच्या ठरू शकणाऱ्या पुस्तिकेचे लिखाण केले. शहरातल्या कचऱ्याच्या प्रश्नावर शालेय विद्यार्थ्यांकडून त्यांच्या शिक्षकांनी विविध प्रयोग करून घ्यावयास हवेत, ही परीक्षितची भूमिका होती. त्याच्या या लिखाणाला मूर्त स्वरूप देण्याचे काम यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई –विभागीय केंद्र औरंगाबादच्या वतीने करण्यात आले. परीक्षित सूर्यवंशी लिखित 'वेस्ट पासून बेस्ट' या पुस्तिकेची निर्मिती विभागीय केंद्राच्या वतीने करण्यात आली आहे.

'वेस्टपासून बेस्ट' मुख्यत्वे विद्यार्थीवर्गाला समोर ठेवून लिहिलेले पुस्तक असून, शिक्षक/पालक यांच्या मार्गदर्शनाखाली यातील सांगितलेल्या कृती करायच्या आहेत. कचऱ्याची समस्या सोडवण्यात विद्यार्थी अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. प्रत्येक विद्यार्थ्याने कमीत कमी आपल्या घरात जरी या पुस्तकात सांगितलेले – वर्गीकरण, कम्पोस्टिंग आणि रिसायकलिंग हे उपाय करायला सुरुवात केली तरी खूप मोठा बदल घडू शकतो. तसेच घन कचऱ्याचा प्रश्न समजून घेऊ पाहणाऱ्या आणि तो सोडविण्यासाठी आपल्या परीने प्रयत्न करू इच्छिणाऱ्या प्रत्येकाला हे पुस्तक नक्कीच उपयोगी पडेल. प्रत्येकाला 'कचरा साक्षर' बनवू शकेल अशा उत्तम पद्धतीने परीक्षितने या पुस्तिकेचे लिखाण केले आहे. पुस्तकाची आकर्षक मांडणी, योग्य रंगसंगती, आवश्यक चित्रे यामुळे ते वाचकांच्या नक्कीच पसंतीस पडेल. तसेच पुस्तकाच्या शेवटी कचरा समस्येवर आधारित भारतातील काही यशस्वी कथाही दिल्या आहेत.

## खरी समानता

कायद्यातील समानता आणि न्यायालयातील समानता यांना महत्त्व आहेच; पण ती समानता समाजाच्या दैनंदिन व्यवहारात प्रतिबिंबित झाली नाही, तर ती विसंगती दुस्सह होते. प्रत्येक वेळी न्याय मिळविण्यासाठी न्यायालयात जाता येत नाही किंवा कायद्यावर बोट ठेवता येत नाही. म्हणून सामाजिक हक्क हे समाजमनाच्या उदारतेवर, त्याच्या समंजसपणावर अवलंबून असतात. मला वाटते, हा तात्त्विक, सामाजिक उदारमतवाद व आपल्या मनात मूळ धरून बसलेली जुनी मूल्ये यांच्यातील संघर्षाचे पडसाद प्रत्येकाच्या जीवनात उमटतात. तुमच्या आमच्या प्रत्येकाच्या जीवनातही हे घडते. आणखी असे, की स्त्रियांचे किंवा दलितांचे समाजातील न्याय्य स्थान केवळ मानवतेच्या किंवा कारुण्याच्या भूमिकेतून आपण स्वीकारले तर ते एक ढोंग ठरेल. समाजघटक म्हणून या दोघांना आपण स्वीकारले पाहिजे, त्यांच्या कर्तृत्वाला स्थान दिले पाहिजे आणि या त्यांच्या नव्या सामाजिक स्थानाशी अनुकूल अशी समाजाची व व्यक्तीची मानसिक जडणघडण झाली पाहिजे.

**– मा. यशवंतराव चव्हाण**

# विभागीय केंद्र, लातूर

## कार्यवृत्त

**छत्रपती शिवाजी महाराज जयंती :**

विभागीय केंद्राच्या वतीने शिवाजी महाराज यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास अभिवादन करण्यात आले. सायं. ६ वाजता शालेय मुलामुलींसाठी गायन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

**लोकनेते मा. यशवंतराव चव्हाण १०५ वी जयंती :**

विभागीय केंद्राच्या वतीने लोकनेते मा. यशवंतराव चव्हाण यांची १०५वी जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी साहित्य अकादमी पुरस्कार विजेते श्रीकांत देशमुख यांनी यशवंतरावांबद्दल मोठ्या पोटतिडकीने विचार मांडले. ते म्हणाले, कर्तृत्वाचा सह्याद्री म्हणून ज्यांचा उल्लेख केला जातो असे यशवंतराव चव्हाण हे एक अष्टपैलू व्यक्तिमत्त्व होते. यशवंतराव हे राजकारणी, साहित्यिक म्हणून फार अभिमानाने कधी वावरले नाहीत. पण मी कुणब्याचं पोर आहे, शेतकरी आहे, असे उजळ माथ्याने कुणबीपण मिरवणारे नेते होते. महाराष्ट्रात समाजोद्धाराची जी प्रभावळ आहे त्या प्रभावळीवरील अत्यंत महत्त्वाचे नाव म्हणजे यशवंतराव चव्हाण होय. जमिनीच्या विकासाचा प्रश्न मांडताना यशवंतराव म्हणत, ''पहिल्यांदा माणसाचं संधारण करावं लागतं नंतर जमिनीचं मगच ते उपयोगाचं होईल.'' शेतकऱ्यांविषयी यशवंतराव म्हणतात की, या देशातला शेतकरी हा शोषक नसून तो तारणारा आहे. ज्याचा उदरनिर्वाह शेतीवर असतो तोच शेतकरी, अशीही व्याख्या यशवंतराव करतात.

अध्यक्षीय समारोप विभागीय केंद्राचे अध्यक्ष डॉ. जनार्दन वाघमारे यांनी केला. ते म्हणाले की, यशवंतराव चव्हाण हे द्रष्टे नेते असून त्यांनी येथील शेती सुधारण्यासंदर्भात अनेक विकासाभिमुख योजना राबविल्या, सिंचन प्रकल्प उभे केले. त्यांच्या कार्यपद्धतीचा अभ्यास करणे ही काळाची गरज आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रतिष्ठानचे सदस्य तथा ज्येष्ठ विचारवंत डॉ. नागोराव कुंभार यांनी केले. याप्रसंगी प्रतिष्ठानचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रतिष्ठानचे कोषाध्यक्ष विवेक सौताडेकर यानी केले.

आपण ज्ञानीही व्हा व शहाणेही व्हा. ज्ञानात आणि शहाणपणात फरक आहे असे सुचविलेले आहे. शास्त्रांचे ज्ञान तत्त्वाच्या दृष्टीने करून घेणे अत्यंत आवश्यक असते; परंतु त्या ज्ञानाचा समाजजीवनात उपयोग करून घेण्याचे जे शास्त्र आहे त्याचे नाव शहाणपण असे मी समजतो. विद्यापीठातून बाहेर पडल्यानंतर ज्ञानाबरोबरच हे शहानपण मिळवावे लागणार आहे; कारण या शहाणपणाची देशाला आज फार गरज आहे.

**– मा. यशवंतराव चव्हाण**

# अहमदनगर केंद्र

## कार्यवृत्त

**महिला दिन :**

गुरुवार दि.०८ मार्च २०१८ रोजी 'जागतिक महिला दिन' साजरा करण्यात आला. या प्रसंगी प्रमुख पाहुण्या म्हणून डॉ.कविता राऊत उपस्थित होत्या. त्यांनी विद्यार्थिनींना महिलांचा आहार, आरोग्य तसेच शिक्षणाविषयी सखोल मार्गदर्शन केले. त्यांनी महिलांना एक महत्त्वपूर्ण सल्ला दिला तो स्वावंलबी होण्याविषयीचा. डॉ. राऊत या वैद्यकिय क्षेत्रात कार्यरत असल्यामुळे विद्यार्थिंनींनी व महिलांनी त्यांच्या अनेक समस्या मांडल्या व डॉ. राऊत यांनी त्यांना चांगल्या प्रकारे मार्गदर्शन केले.

**स्व. यशवंतराव चव्हाण साहेब यांची १०६ वी जयंती व सावित्रीबाई फुले स्मृतिदिन :**

दि.१२ मार्च २०१८ रोजी स्व. यशवंतराव चव्हाण साहेब यांची १०६ वी जयंती व सावित्रीबाई फुले स्मृतिदिनानिमित्ताने यशवंतराव चव्हाण सार्वजनिक वाचनालय, कृषी महाविद्यालय सोनई, यशवंत स्पर्धा परीक्षा केंद्र, सोनई, यशवंतराव चव्हाण दंत महाविद्यालय, वडगांव गुप्ता अ.नगर या सर्व ठिकाणी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र अहमदनगरच्या वतीने विविध उपक्रमांच्या माध्यमांतून जयंती साजरी करण्यात आली. त्यात प्रामुख्याने वक्तृत्व स्पर्धा, रांगोळी स्पर्धा आदींचे आयोजन करून स्व. यशवंतराव चव्हाण साहेब यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून, अभिवादन करून जयंती साजरी करण्यात आली.

मा. श्री प्रशांत पाटील गडाख, सचिव, यशवंतराव चव्हाणप्रतिष्ठान - मुंबई, यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला.

**महात्मा ज्योतिबा फुले जयंती :**

बुधवार, दि. ११ एप्रिल २०१८ रोजी कृषी महाविद्यालयामध्ये महात्मा ज्योतिबा फुले जयंतीचा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. हरी मोरे, प्राचार्य, कृषी महाविद्यालय, सोनई यांनी करून प्रतिमेला पुष्पहार घालून पूजन केले. त्यानंतर महात्मा फुले यांनी केलेल्या सामाजिक, शैक्षणिक कार्याचा थोडक्यात आढावा व त्यांचा पूर्ण जीवनपट विद्यार्थ्यांना सविस्तर समजावून सांगितला.

या कार्यक्रमाप्रसंगी विद्यार्थी कल्याण अधिकारी प्रा. तांबे सर उपस्थित होते तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक तसेच कर्मचारी वृंद, विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठया संख्येने उपस्थित होत्या.

मा. श्री प्रशांत पाटील गडाख, सचिव, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान - मुंबई, यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला.

# सोलापूर केंद्र

## कार्यवृत्त

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई-विभागीय केंद्र सोलापूर आणि जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशन लि. सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने सोलापूर जिल्ह्यातील सहकारी बँकांचे अध्यक्ष, संचालक व व्यवस्थापक यांच्याकरिता 'एक दिवसीय कार्यशाळेचे' आयोजन करण्यात आले होते. २१ एप्रिल २०१८ रोजी हॉटेल साईप्रसाद येथे पार पडलेल्या या कार्यशाळेत ॲड. जयंत शाळीग्राम पुणे यांनी सहकारी बँकाशी संबंधित कामगार कायदे या विषयावर मार्गदर्शन केले. बँकांनी कामगारांच्या हितासाठी घ्यावयाची काळजी आणि तत्परता याविषयी सखोल मार्गदर्शन केले; त्याच बरोबर ॲड आर. आर गानू पुणे, यांनी सहकारी बँकांसंबंधित फौजदारी खटले याबाबत सखोल मार्गदर्शन केले. बँकेची वसुली करताना कर्जदाराने चुकीचे पाऊल टाकल्यास कर्मचाऱ्यांसाठी बँकेने घ्यावयाची काळजी आणि एखाद्या कर्जदाराने बँकेला फसवल्यास त्यासाठी कायद्यात तरतूद याबाबत विस्तृत मार्गदर्शन केले.

प्रारंभी विभागीय केंद्राचे कोषाध्यक्ष राजशेखर शिवदारे, सदस्य राहुल शहा, सोलापूर जिल्हा नागरी बँक्स असोसिएशनचे अध्यक्ष राजगोपाल झंवर, उपाध्यक्ष कल्याणराव काळे, संचालक मोहन दाते यांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने कार्यशाळेचे उद्घाटन करण्यात आले. या प्रसंगी सर्व सहकारी बँकांचे चेअरमन, संचालक, व्यवस्थापक व अधिकारी यांनी या कार्यशाळेत सहभाग घेतला.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई-विभागीय केंद्र सोलापूरच्यावतीने १ मे २०१८ रोजी सायंकाळी ६ वाजता डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृहात महाराष्ट्र दिनानिमित्त कार्यक्रमात ज्येष्ठ साहित्यिक प्रा. राजेंद्र दास यांचे 'महाराष्ट्र राज्याची निर्मिती व समकालीन समस्या' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून आयोजित केलेल्या व्याख्यानात बोलताना प्रा. राजेन्द्र दास यांनी राज्याची निर्मिती करताना चव्हाण साहेबांना अनेक संकटे आणि अडथळे पार करावे लागले तसेच समज-गैरसमज यांचा सामना करावा लागला, त्यांना अनेक यातना सहन कराव्या लागल्या पण यासाठी त्यांनी कोणालाच दोष न देता कौशल्याने महाराष्ट्राची निर्मिती केली. साहेब मनाने मोठे होते म्हणूनच हे शक्य झाले असे प्रा राजेंद्र दास यांनी सांगितले. तसेच समाजातील सर्व घटकांचे हे राज्य आहे हा विशास देण्यात साहेब यशस्वी झाले. शिक्षण, उद्योग, रोजगार, शेती, ग्रामीण विकास आणि साहित्य, कला व संस्कृती याबाबत साहेबांचे धोरण यावर प्रा राजेंद्र दास यांनी सविस्तर विवेचन या प्रसंगी केले.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी आमदार मा. युनुसभाई शेख हे होते. याप्रसंगी विभागीय केंद्राचे सदस्य दत्ता गायकवाड यांच्या हस्ते प्रा. राजेंद्र दास यांचा सत्कार करण्यात आला. प्रारंभी मा. यशवंतराव चव्हाण साहेबांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी पद्माकर कुलकर्णी, दिनेश शिंदे, साहित्यिक तसेच राज्यशास्त्राचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अंबाजोगाई केंद्र

## कार्यवृत्त

**ग्रंथदिंडी :**

रविवार, दि. ११ फेब्रुवारी २०१८ सकाळी ८ वाजता येथील शिवाजी चौकातून ग्रंथदिंडी काढण्यात आली. वेणूताई चव्हाण कन्या शाळेच्या मुख्याधापक प्रतिभाताई देशमुख व किरण राऊतमोरे यांनी अतिशय उत्कृष्टरित्या ग्रंथदिंडी नियोजनाची जबाबदारी पार पडली. बालसाहित्यिक नागनाथ बडे यांनी ग्रंथदिंडीचे उद्घाटन केले. यावेळी संमेलनाध्यक्ष बालाजी मदन इंगळे, माजी आमदार उषाताई दराडे, डॉ. नरेंद्र काळे, संमेलन कार्यवाह अभिजीत जोंधळे, मुख्याध्यापिका प्रतिभाताई देशमुख, प्रा. अरूंधती पाटील, ॲड. जयसिंग चव्हाण, परिवर्तन साहित्य चळवळीचे अध्यक्ष प्रा. गौतम गायकवाड, विद्याधर पांडे, डॉ. मुकुंद राजपंखे, डॉ. देवराज चामनर, अनंतराव चाटे, भारत सालपे, विवेक, गंगणे, पत्रकार रणजित डांगे, दत्ता वालेकर, वैजनाथ शेंगुळे, दत्ता देवकते आदींची यावेळी उपस्थित होती.

ही ग्रंथदिंडी शहरातील शिवाजी चौक, सावरकर चौक, राजमाता आहिल्यादेवी चौक मार्गे निघून संमेलनस्थळी दाखल झाली. ग्रंथदिंडीत शहरातील वेणुताई चव्हाण कन्या माध्यमिक विद्यालय, कै. वसंतराव काळे पब्लिक स्कूल, राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प, जिल्हाधिकारी कार्यालय, बालकामगार विशेष प्रशिक्षण केंद्र, भूमिका विश्वस्त संस्था बालनिकेतन, जोधाप्रसादजी मोदी माध्यमिक विद्यालय, योगेश्वरी प्राथमिक विद्यालय (प्रशांत नगर), नेताजी सुभाषचंद्र विद्यालय, घाटनागनाथ विद्यालय, स्वामी विवेकानंद विद्या मंदिर, खोलेश्वर प्राथमिक विद्यालय व खोलेश्वर माध्यमिक विद्यालय, एम.आय.टी.न्यू इंग्लिश स्कूल या शाळा सहभागी झाल्या. या शाळांतील सुमारे दिड हजाराहून अधिक विद्यार्थी ग्रंथदिंडीत सहभागी झाले.

दिंडीत 'भारतीय संविधान' ठेवण्यात आले होते. आकर्षक वेषभूषा व महापुरूषांची वेशभूषा करून विद्यार्थिनी सहभागी झाल्या. घोडे, वाद्य, संगीत संचलनाने व 'बेटी बचाव, बेटी पढाव', 'पर्यावरण जगजागृतीठ', 'ग्रंथ वाचा' आदींविषयीच्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. विद्यार्थिनींनी भारतमाता, छत्रपती शिवाजी महाराज, राजमाता जिजाऊ, झाशीची राणी, अहिल्यादेवी होळकर, महात्मा गांधी, चाँदबिबी, रजिया सुलतान, राणी पद्मावती, वारकरी, वासुदेव, गोंधळी यासहित पारंपारिक वेशभूषा करून संमेलनात सहभाग नोंदविला. स्नेहसंमेलनात उपस्थित विद्यार्थीनींनी घोषवाक्य असलेले फलक उंचावले. ग्रंथदिंडी व स्नेहसंमेलनात उपस्थित विद्यार्थीनींनी संयोजन समितीच्यावतीने खाऊवाटप करण्यात आला. सहभागी सर्व शाळांना सहभाग प्रमाणपत्र व स्मृतीचिन्ह देऊन मान्यवरांनी सन्मानित केले. यावेळी सर्व १२ शाळेतील शिक्षक शिक्षिकांचीही उपस्थिती होती.

उद्घाटन समारंभात प्रारंभी गोदावरी कुंकुलोळ कन्या शाळेतील मुलींच्या संचाने स्वागत गीत सादर केले. मान्यवरांच्या हस्ते लोकनेते यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेस अभिवादन करून दिपप्रज्वलन करण्यात आले. मान्यवरांचे स्वागत स्मृतीचिन्ह, फेटा, शाल व मुलांनी तयार केलेल्या गुच्छांनी करण्यात आले.

प्रास्ताविक करताना संमेलन कार्यवाह अभिजीत जोंधळे यांनी ग्रंथदिंडीत शहरातील १२ शाळांमधील सुमारे दिड हजाराहून अधिक विद्यार्थी सहभागी झाल्याचे सांगून या संमेलनाच्या यशस्वीतेसाठी मानवलोक, मनःस्विनी महिला प्रकल्प व वेणुताई कन्या माध्यमिक विद्यालय तसेच यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई केंद्र अंबाजोगाई यांचे सहकार्य लाभले. अंबाजोगाईत वर्षभर विविध व्याख्यानमाला होतात, बालझुंबडसारखा उपक्रम ही घेतला जातो. कुमारवयीन मुलांसाठी असे संमेलन असावे, या कल्पनेतून मुलांच्या सर्वांगीण विकासाबरोबरच समतोल विकास झाला पाहिजे. कुमारवयीन मुलांना केंद्रस्थानी ठेवून त्यांच्यातील सृजनशीलता वाढीस लागावी म्हणून हा उपक्रम संमेलन रूपाने होत असल्याचे जोंधळे म्हणाले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते 'साहित्याचा स्नेह पेरणार' या हस्तलिखितांचे प्रकाशन व

आदित्य सतीश आगळे या इयत्ता ७ वीच्या वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या 'अक्षराचं लेणं' या हस्तलिखित कविता संग्रहाचे प्रकाशन करण्यात आले.

बालसाहित्य लिहिण्यासाठी साहित्यिकांनी पुढाकार घ्यायला हवा. कारण, साहित्यातून कल्पनाशक्ती विकसित होते. आजची मुले स्मार्ट आहेत. 'श्यामची आई' या कथेची नव्या स्वरूपाने मांडणी करणे गरजेचे आहे. अशा संमेलनातून सृजनशीलतेला वाव मिळतो. विज्ञानवादी साहित्यनिर्मिती ही काळाची गरज असून विज्ञान डोळसपणा शिकविते तर कला जीवन सौंदर्य खुलवते, असे प्रतिपादन उद्घाटक दिपाताई देशमुख यांनी केले. 'मातृभाषेतून विद्यार्थ्यांची जडण-घडण होते. अशा संमेलनांतून सृजनशीलतेला वाव मिळतो. कल्पनाशक्ती विकसित होते.' असे सांगून त्यांनी संमेलनाच्या यशस्वी आयोजनाबद्दल संजोयकांचे अभिनंदन केले. संमेलनाध्यक्ष बालाजी मदन इंगळे यांनी आपल्या विविध कवितांचे सादरीकरण केले. 'मोबाईलकडे जादूचा दिवा म्हणून बघा. कारण, मोबईलमध्ये विश सामावले आहे. साहित्य जगण्याचे भान देते. जगणे समृद्ध करते' हे सांगून 'बालकांनी साहित्य वाचले पाहिजे, जे वाटेल ते लिहिले पाहिजे' असे विचार संमेलनाध्यक्ष बालाजी इंगळे यांनी मांडले. उपस्थित विद्यार्थीनींनी त्यांना भरभरून दाद दिली. कवितेच्या ओळींवर सभागृहाने ठेका धरला, तर 'मेलं नाही अजून आभाळ' ही कविता सादर करून शेतकरी आत्महत्येचा संदर्भ देऊन बालाजी इंगळे यांनी सभागृहाला अंतर्मुख केले. उद्घाटक डॉ. द्वारकादास लोहिया यांनी बालसाहित्यातून कसदार निर्मिती व्हावी व जबाबदार समाज घडावा यासाठी शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी माजी आमदार उषाताई दराडे यांनी मानवता हाच धर्म असल्याचे सांगून आपल्या मनातले बोलता आले पाहिजे, असे त्या म्हणाल्या. लोकनेते यशवंतरावजी चव्हाण, खासदार शरदचंद्रजी पवार व खासदार सुप्रिया सुळे यांचा उल्लेख करीत त्यांच्यासारखे समाजभान असलेले नेतृत्वच महाराष्ट्राला सांस्कृतिक व सामाजिकदृष्ट्या पुढे नेत असल्याचे त्यांनी सांगितले. दिपाताई क्षीरसागर यांनी 'लहान मुलांचे भावविश्व जाणून घेऊन साहित्यनिर्मिती झाली पाहिजे,' हे सांगत मुलांचा बुद्ध्यांक वाढला पण भावनांक कमी झाला आहे. विज्ञान विषयक साहित्य निर्मिती झाली पाहिजे. असे विचार मांडले. उपस्थितांचे आभार मानताना डॉ. नरेंद्र काळे यांनी या संमेलनातून बाल साहित्य निर्मितीला प्रोत्साहन मिळेल असे महत्वपूर्ण विचार व्यक्त केले.

यावेळी सभागृहात अमर हबीब, बालाजी सुतार, डॉ. श्रीहरी नागरगोजे, संतराम कराड, प्रा. वैशाली गोस्वामी, श्रीकांत देशपांडे, सखा गायकवाड, प्रा. विष्णु कावळे, मुजीब काझी, प्रा. अनंत मरकाळे, डॉ. राहुल धाकडे, प्रविण ठोंबरे, ॲड. जयसिंग चव्हाण, परिवर्तन साहित्य चळवळीचे अध्यक्ष प्रा. गौतम गायकवाड, विद्याधर पांडे, डॉ. मुकुंद राजपंखे, डॉ. देवराज चामनर, अनंतराव चाटे, भारत सालपे, विवेक गंगणे, पत्रकार रणजित डांगे, विजय हमिने, रोहिदास हातागळे, मुशीरबाबा, विकास गरड, नंदकुमार पांचाळ, उत्तम शिनगारे, दत्ता वालेकर, वैजनाथ शेंगुळे, दत्ता देवकते आदींची यावेळी उपस्थिती होती.

**कथाकथन**

कथाकथन कथाकथनातून बालकांचे विश्व उलगडले. बाल वयापासून विद्यार्थी हे खऱ्या अर्थाने आजी-आजोबांकडून कथा ऐकतात कथेत विविध गोष्टी त्यांच्या मनाला भावतात; नव्हे त्या गोष्टींचे प्रतिबिंब बालमनावर उमटते. 'श्यामची आई' हे साने गुरूजी लिखित आत्मचरित्रपर लेखन आजही बाल मनावर गारूड ठेवून आहे असे प्रतिपादन साहित्यिक प्रा. डॉ. वैशाली गोस्वामी यांनी केले. या संमेलनात २० हून अधिक विद्यार्थ्यांनी कथाकथनात भाग घेतला. कथाकथन सत्राला मान्यवरांनी ही हजेरी लावली व बाल कथाकथनकारांचे अभिनंदन करून प्रोत्साहन दिले.

दि. ११ फेब्रवारी रविवार रोजी अंबाजोगाई येथे यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान- मुंबई केंद्र अंबाजोगाई व मानवलोक संचलित मनःस्विनी महिला प्रकल्पांच्या संयुक्त विद्यमाने दुसरे जिल्हास्तरीय बालकुमार साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले होते. संमेलनाच्या तिसऱ्या सत्रात प्रमुख म्हणून प्रा. डॉ. अरुंधती पाटील (समन्वयक मनःस्विनी महिला प्रकल्प), प्रदीप कात्रे हे होते. तर कथाकथन सत्राच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. वैशाली गोस्वामी या होत्या.

सभागृहात स्वागताध्यक्ष डॉ. द्वारकादास लोहिया, उद्घाटक दिपाताई देशमुख व संमेलनाध्यक्ष बालाजी मदन इंगळे, संमेलन कार्यवाह अभिजीत जोंधळे, डॉ. दिपाताई क्षीरसागर, माजी

आमदार उषाताई दराडे, 'मानवलोक'चे अध्यक्ष अशोकराव देशमुख, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान अंबाजोगाईचे सचिव डॉ. नरेंद्र काळे, वेणूताई चव्हाण कन्या शाळेच्या मुख्याध्यापक प्रतिभाताई देशमुख आदींची प्रमुख उपस्थिती होती.

या सत्राचे प्रास्ताविक करताना प्रा. डॉ. अरूंधती पाटील यांनी संमेलनात बालकथाकारांच्या कथाकथनाचे आयोजनासंबंधीची माहिति दिली. तर अध्यक्षीय समारोप करताना प्रा. डॉ. वैशाली गोस्वामी यांनी कथेची मांडणी लयबद्ध असली पाहिजे, भाषाशैली स्पष्ट व योग्य असावी असे सुचविले. कथाकथनातून बालकांचे विश्‍व उलगडले. बाल वयापासून विद्यार्थी हे खऱ्या अर्थाने आजी–आजोबांकडून कथा ऐकतात कथेतल्या विविध गोष्टी त्यांच्या मनाला भावतात नव्हे तर त्या गोष्टींचे प्रतिबिंब बालमनावर उमटते.

'श्यामची आई' हे साने गुरूजी लिखित आत्मचरित्रपर लेखन आजही बाल मनावर गारूड ठेवून आहे. असे प्रतिपादन साहित्यिक प्रा. डॉ. वैशाली गोस्वामी यांनी केले या प्रसंगी सहभागी कथाकारांना साहित्यिक बालाजी सुतार यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. यावेळी गौरव पवार (जिल्हा परिषद शाळा, जरेवाडी) याने 'माणूसकी', आरती गणेश रासवे (इयत्ता १० वी खोलेशर विद्यालय) हिने 'स्वप्नांच्या पलिकडे', सायली जोशी (सोमेशर प्राथमिक शाळा घाटनांदुर) हिने परिपाठ, पंकजा केंद्रे (वसुंधरा पब्लिक स्कूल) हिने 'वसुंधरा', अमृता सतीश धानोरकर (वर्ग ७ वा), वेणुताई चव्हाण कन्या विद्यालय, अंबाजोगाई) हिने 'श्यामची आई', तन्वी सातपुते 'श्यामची आई', संपदा रणदिवे (जनता माध्यमिक विद्यालय, धारूर) हिने 'देवदासी' श्रीजा अभिजीत देशपांडे हिने 'साने गुरूजी', हर्ष गीते याने आनंद यादव यांची कथा, आनंद गायकवाड, श्रावणी निर्मळे हिने (श्रीमती गोदावरी कुंकुलोळ विद्यालय, अंबाजोगाई) हिने 'पर्यावरणावर होणारे परिणाम', आर्या शिंदे (शिवाजी विद्यालय अंबाजोगाई), श्रुती कांबळे (जि.प.प्रा.शाळा, आष्टी) हिने 'लाकूडतोड्या', स्वरा शिंदे (जि.प्र.प्रा.शाळा) हिने 'स्व ही आत्मकथा', सिद्धी शिंदे हिने 'छडी लागे छमछम' तसेच धनंजय फड याने संभाजी महाराजांवरील तर स्वरा धायगुडे हिने 'थॉमस एडीसन' यांचे कथा, प्रिती आढाव हिने साने गुरूजी यांच्या विषयीची तसेच ईश्‍वरी देशपांडे हिने ही साने गुरूजी यांच्या विषयीची कथा सादर करून कथाकथनात रंगत आणली. कथाकथनात सर्वच सहभागी विद्यार्थी कथाकारांनी बोध कथेला प्राधान्य दिले. भाषा प्रभुत्व, सादरीकरण, नाट्य, स्मरण, उत्तम निवेदन, ओघवती भाषा, पाठांतर या बाबी या विद्यार्थ्यांत दिसून आल्या.

कथाकथन सत्राचे सूत्रसंचालन विवेक गंगणे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार प्रदिप कात्रे यांनी मानले. यावेळी सभागृहात अमर हबीब, बालाजी सुतार, डॉ. श्रीहरी नागरगोजे, संतराम कराड, प्रा. वैशाली गोस्वामी, श्रीकांत देशपांडे, सखा गायकवाड, प्रा. विष्णु कावळे, मुजीब काझी, प्रा. आनंद मरकाळे, डॉ. राहुल धाकडे, प्रविण ठोंबरे, अ‍ॅड. मुकुंद राजपंखे, डॉ. देवराज चामनर, अनंतराव चाटे, भारत सालपे, विवेक गंगणे, पत्रकार रणजित डांगे, विजय हमिने, रोहिदास हातागळे, मुशीरबाबा, विकास गरड, नंदकुमार पांचाळ, उत्तम शिनगारे, दत्ता वालेकर, वैजनाथ शेंगुळे, दत्ता देवकते आदींची यावेळी उपस्थिती होती.

**कवी संमेलन**

अंबाजोगाईत आयोजित दुसऱ्या जिल्हास्तरीय बालकुमार साहित्य संमेलनातील कवी संमेलनात तब्बत ३१ बालकवी विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. कविसंमलनातील सत्राला मान्यवरांसह पालकांनीही हजेरी लावली व बालकवी कवयित्रींना दाद देऊन प्रोत्साहन दिले.

या सत्राचे प्रमुख म्हणून भागवत मसने व शितल बोधले हे होते. तर कविसंमेलनाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. मुकुंद राजपंखे होते.

या सत्राचे प्रास्ताविक करताना शितल बोधले यांनी प्रारंभी संमेलनाबाबत माहिती दिली, अध्यक्षीय समारोप करताना प्रा. डॉ. मुकुंद राजपंखे यांनी 'लेकरं लिहिती, बोलती व वाचती व्हावीत' हाच या संमेलनाचा मुख्य उद्देश असल्याचे सांगून त्यांनी आपली सदाबहर रचना सादर केली. उपस्थित विद्यार्थ्यांनीही यावेळी राजपंखे यांच्या कवितेवर ठेका धरला.

याप्रसंगी सहभागी बालकवी, कवयित्रींना साहित्यिक ज्येष्ठ कवी कृष्णा भोकरे यांच्या हस्ते सहभाग प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. कवीसंमेलनात बीड जिल्ह्यातील आष्टी, माजलगाव, वडवणी, परळी, धारूर, अंबाजोगाई तालुक्यातील विविध शाळेतून सुमारे ३१ बालकवी व कवयित्री सहभागी झाले, ज्यात दहा मुले व २१ मुलींचा समावेश होता. सहभागी सर्व कवींनी आपल्या वैविध्यपूर्ण सादरीकरणांमधून व कवितांमधून समाजातील ज्वलंत विषय मांडले. ज्यात 'बेटी बचाव, बेटी पढाव', पर्यावरण, शेतकरी आत्महत्या, कुटुंबव्यवस्था, बदलती जीवनशैली, समाजजीवन, नातेसंबंध, निसर्ग, 'शौचालय बांधा घरोघरी', 'चिऊकाऊ पासून मनीमाऊ' पर्यंत सर्व विषयांचा समावेश होता.

कविसंमेलन सत्राचे बहारदार सूत्रसंचालन भागवत मसने यांनी केले तर उपस्थितांचे आभार शितल बोधले यांनी मानले. यावेळी सभागृहात अमरकाका हबीब, बालाजी सुतार, नायब तहसिलदार शंकर बुरांडे, डॉ. श्रीहरी नागरगोजे, संतराम कराड, प्रा. वैशाली गोस्वामी, श्रीकांत देशपांडे, सखा गायकवाड, प्रा. विष्णु कावळे, मुजीब काझी, प्रा. अनंत मरकाळे, डॉ. दिलीप भिसे, डॉ. राहुल धाकडे, प्रविण ठोंबरे, ॲड. जयसिंग चव्हाण, परिवर्तन साहित्य चळवळीचे अध्यक्ष प्रा. गौतम गायकवाड, विद्याधर पांडे, डॉ. देवराज चामनर, अनंतराव चाटे, भारत सालपे, अभिकथाकार विवेक गंगणे, वात्रटिकाकार व पत्रकार रणजित डांगे, पत्रकार जगन सरवदे, विश्वंभर वराट गुरूजी, नागनाथ बडे, ज्येष्ठ पत्रकार विजय हमिने, पत्रकार रोहिदास हातागळे, पत्रकार मुशीरबाबा, पत्रकार मारोती जोगदंड, विकास गरड, पत्रकार नंदकुमार पांचाळ, पत्रकार उत्तम शिनगारे, दत्ता वालेकर, वैजनाथ शेंगुळे, दत्ता देवकते, वैजनाथ देशमुख, मुजीब काझी, किर्तीराज लोणारे, आदींची उपस्थिती होती. हे बाल कुमार साहित्य संमेलन अंबाजोगाई बसस्थानकासमोर वेणूताई चव्हाण कन्या माध्यमिक शाळेच्या परिसरात आयोजित करण्यात आले होते.

कविसंमलेनाच्या यशस्वीतेसाठी स्वागत समिती सदस्य प्रा. अरुंधती पाटील, गणपत व्यास, सुवर्णाताई लोमटे, डॉ. नरेंद्र काळे, नामदेव गुंडाळे, भागवत मसने, ज्योती भोसले, बन्सी पवार आश्विनी कुमार मुकदम, उषा रामधामी, प्रभावती अवचार व गणेश कदम यांनी पुढाकार घेतला आहे.

**शब्दकोडे स्पर्धा**

संमेलनाचे पाचवे सत्र हे शब्दकोडे स्पर्धेचे होते. या सत्राचे प्रमुख म्हणून नामदेव गुंडाळे व वैशाली भुसा यांनी काम पाहिले. हे सत्र दुपारी ३.३० ते सायंकाळी ५ यावेळेत वेणूताई चव्हाण माध्यमिक विद्यालयाच्या हॉलमध्ये घेण्यात आले. या सत्राचे प्रास्ताविक करताना नामदेव गुंडाळे यांनी प्रारंभी संमलनात शब्दकोडे स्पर्धेबाबत माहिती दिली. गुंडाळे म्हणाले की, शब्दकोडे ही अभिनव स्पर्धा या संमेलनात दोन गटांत होत आहे. इयत्ता पहिली ते पाचवी हा 'बालधमाल गट' आहे. इयत्ता सहावी ते दहावीचा 'झुंजार कुमार गट' होय. शब्दकोड्यांच्या चिठ्ठ्या करून एकेकाने कोडे सोडवणे, अशा स्वरूपाची ही स्पर्धा आहे. विजेत्यांना लागलीच बक्षीसे देण्यात आली. या स्पर्धेच्या आयोजनाकरीता नामदेव गुंडाळे, वैशाली भुसा, शितल बोधले, किरण राऊतमोरे, हेमंत धानोरकर, दत्तप्रसाद गोस्वामी, सागर कुलकर्णी व वेणूताई चव्हाण विद्यालयातील शिक्षक, शिक्षिका व कर्मचारीवृंद यांनी पुढाकार घेतला.

**सांगितीक कार्यक्रम :**

'सुंदर माझी शाळा' हा बाल अभ्युदय फाउंडेशनने सादर केलेला बालगीते व कवितांचा सांगितीक कार्यक्रम विशेष रंगला. हा कार्यक्रम अभ्युदय फाऊंडेशन, औरंगाबादचे श्रीराम पोतदार (गायक) तर बहारदार निवेदन श्री. घुले यांनी केले. या सत्रालाही उपस्थित बाल-कुमारांनी विशेष दाद दिली. यावेळी सर्व मान्यवर उपस्थित होते.

**समारोप व पारितोषिक वितरण :**

'दुसरे जिल्हास्तरीय बालकुमार साहित्य संमेलन अखिल भारतीय संमेलनानंतर शहरात सुमारे तीस ते चाळीस वर्षांनंतर झाले. या संमेलनाने ती उणीव भरून काढली. या संमेलनाने खऱ्या अर्थाने बाल-कुमार हे समृद्ध झाले.' असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक अमर हबीब यांनी केले. ते संमेलनाच्या समारोपप्रसंगी बोलत होते.

समारोप सत्राच्या अध्यक्षस्थानी गणपत व्यास होते. विचारपीठावर संमेलनाध्यक्ष बालाजी मदन इंगळे, संमेलन कार्यवाह अभिजित जोंधळे, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे सुहास तेंडुलकर, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान अंबाजोगाईचे सचिव डॉ. नरेंद्र काळे, वेणूताई चव्हाण कन्या शाळेच्या मुख्याध्यापक प्रतिभाताई देशमुख, मनःस्विनी महिला प्रकल्पाच्या समन्वयक प्रा. डॉ. अरूंधती पाटील आदींची प्रमुख उपस्थिती होती.

समारोप सत्राचा अध्यक्षीय समारोप करताना गणपत व्यास यांनी अंबाजोगाईच्या मातीतच साहित्यिक गुण असल्याचे सांगून 'वर्षभर शहरात विविध कार्यक्रम होतात. संस्कार मुल्ये रूजविण्याचे काम अशा संमेलनातून होते,' असे सांगितले. बाल-कुमारांना 'वाचा, लिहा व बोलते व्हा' असे आवाहन केले. समारोप सत्राचे सूत्रसंचालन ज्योती शिंदे यांनी केले तर आभार मानताना डॉ. नरेंद्र काळे यांनी बाल-कुमार साहित्य संमेलनाच्या संपूर्ण आयोजनाची माहिती देऊन, संमेलन यशस्वी करण्यासाठी सहकार्य करणाऱ्या सर्वांचेच आभार मानले.

पुष्परचना व हस्तलिखित स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिके देण्यात आली पुष्परचना स्पर्धेत बालगटात शबनम पप्पुवाले (प्रथम), रिद्धी नंदकिशोर रांदड (द्वितीय), श्रावणी शिवकुमार निर्मळे (तृतीय) तर कुमारगटांत श्रद्धा बरूरे व संच (प्रथम), वैष्णवी गोविंद मुंडे (द्वितीय), नसिफा गवळी (तृतीय) तसेच हस्तलिखित स्पर्धेत बालगटात, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, जरेवाडी (प्रथम), प्रमोदजी महाजन इंग्लिश स्कूल (द्वितीय), स्वामी विवेकानंद बाल विद्यामंदिर (तृतीय) व कुमार गटांत वेणूताई चव्हाण माध्यमिक विद्यालय, अंबाजोगाई (प्रथम), जयप्रभा माध्यमिक विद्यालय, कुंभेफळ (द्वितीय), सिद्धेश्वर माध्यमिक विद्यालय, माजलगांव (तृतीय) यांना स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र देऊन मान्यवरांनी प्रोत्साहित केले.

बालकुमार साहित्य संमेलन यशस्वी करण्यासाठी पुढाकार घेणारे स्वागत समिती सदस्य प्रा. अरुंधती पाटील, सुवर्णाताई लोमटे, डॉ. नरेंद्र काळे, संमेलन कार्यवाह अभिजीत जोंधळे, नामदेव गुंडाळे, भागवत मसने, ज्योती भोसले, बन्सी पवार, प्रदीप कात्रे, शितल बोधले, दत्तप्रकाश गोस्वामी, उमेश डांगे, सुनिता गौरशेटे, पतंगेमॅडम, तरकसेसर, किरण राऊतमोरे, स्मिता धावडकर व गणेश कदम यांचा मान्यवरांच्या हस्ते विशेष सन्मान करण्यात आला.

**सांस्कृतिक कार्यक्रमामुळे रंगत :**

दुसरे जिल्हास्तरीय बालकुमार साहित्य संमेलनानिमित्त बाल व कुमारवयीन विद्यार्थ्यांनी आपला बहारदार कलाविष्कार सादर केला. विविध वेषभूषा करून संगीतप्रधान गीते, नृत्य, नाटिका सादर करून उपस्थितांची वाहवा मिळवली. या सत्राचे प्रमुख म्हणून स्मिता धावडकर, ज्योती भोसले यांनी काम पाहिले. सार्थक करपे या विद्यार्थ्याने सूत्रसंचालन केले; तर उपस्थितांचे आभार अभिकथाकार विवेक गंगणे यांनी मानले.

**यशवंतराव चव्हाण जयंती :**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान- मुंबई, केंद्र अंबाजोगाई व येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या यशवंतराव चव्हाण महाविद्यालय अंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने यशवंतराव चव्हाण यांच्या १०५ व्या जयंतीनिमित्ताने लातूर येथील राजर्षी शाहू महाविद्यालयातील डॉ. महादेव गव्हाणे, अंकुशदादा काळदाते तर विचारमंचावर यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान- मुंबई केंद्र अंबाजोगाईचे सचिव डॉ. नरेंद्र काळे, संचालक अभिजीत जोंधळे, प्राचार्य डॉ. वनमाला रेड्डी, 'अक्षरमानव'चे अध्यक्ष सुदर्शन रापतवार, उपप्राचार्य प्रा. कांतराव गाडे, उपप्राचार्य डॉ. दिनकर तांदळे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरूवात यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेला पुष्पहार व पुष्पांजली अर्पण करून करण्यात आली. या कार्यक्रमामध्ये प्रमुख वक्ते डॉ. महादेव गव्हाणे यांनी 'आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण' या विषयावर बोलताना सांगितले की, यशवंतराव हेच आधुनिक महाराष्ट्राचे निर्माते होते. आयुष्यभर दुसऱ्यांच्या हिताचे रक्षण व जतन करणे ही भूमिका घेऊनत त्यांनी कार्य केले. यशवंतरावांनी अनेक पुस्तके वाचून त्यातील विचार आत्मसात करून जीवनातील अडीअडचणींवर मात कशी करायची संकटांना कसे पेलायचे हे समजून घेतले होते. सर्व आयुष्य देशासाठी समाजासाठी अर्पिले. संपर्काची कोणतीही साधने नसताना जनसंपर्क वाढवून पंधरा मिनिटांत

सभा घेऊन यशवंतराव थेट जनतेशी संवाद साधत होते. राजकीय प्रवासामध्ये देशाचे उपपंतप्रधान, गृहमंत्री, परराष्ट्रमंत्री, संरक्षण मंत्र्यांसारखी महत्वाची पदे त्यांनी भूषविली. या सर्ववेळी पक्षनिष्ठा राष्ट्रनिष्ठा, देशहित, आणि नैतिकतेची कास त्यांनी सोडली नाही. मनात केव्हाही स्वार्थ येऊ दिला नाही. राजकारण नैतिकतेवर आधारित असावे, असा विचार मांडला. जनतेच्या मनात नेहमी आपला नेता, या नेत्याच्या हातून आपले नुकसान होणार नाही असा विश्वास जनतेत निर्माण केला. सुसंस्कृत राजकारणी नेता म्हणजे यशवंतरावजी चव्हाण होते. कृषी, शिक्षण, उद्योग, पंचायतराज व्यवस्था, रोहयो, कमाल जमीन कायदा इ. बाबतची यशवंतरावांची दूरदृष्टी उल्लेखनीय होती. मनात कोणताही भेदभाव न ठेवता भारतीय आहोत, हा राष्ट्रवाद मनात ठेवून आयुष्यभर कार्य करणारा धुरंधर नेता म्हणजे यशवंतराव होते, असे प्रतिपादन त्यांनी केले.

यावेळी अध्यक्षीय समारोप करताना अंकुशदादा काळदाते म्हणाले, 'यशवंतरावांच्या व्यक्तीमत्वाचे अनेक पैलू आहेत. ते उल्लेखनीय आहेत. ते बहुआयामी व्यक्तीमत्व होते. यशवंतराव हे वाचनाने घडले. वाचनाची प्रचंड आवड असणारे यशवंतराव आदर्श चारित्र्याचे होते. वाचन हा आयुष्यातील महत्वाचा भाग व्हावा. मनात जिंकण्याची जिद्द ठेवावी. समाजाचे बारकाव्याने अवलोकन करून माणसे समजावून घ्यावीत आदर्श व्यक्ती बनण्याचा प्रयत्न करावा' असे सांगून 'यशवंतराव चव्हाणांसारखे व्यक्तीमत्व घडवावे' असा संदेश काळदाते यांनी यावेळी दिला.

प्रारंभी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई केंद्र, अंबाजोगाईचे सचिव डॉ. नरेंद्र काळे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. मुकुंद राजपंखे यांनी केले. तर उपस्थितांचे आभार प्रा. डॉ. दिलीप भिसे यांनी मानले.

कार्यक्रमासाठी डॉ. धर्मराज तांदुळजेकर, डॉ. सुरेवाड संजय, डॉ. रमेश शिंदे, डॉ. अहिल्या बरूरे, डॉ. अरविंद घोडके, प्रा. इंद्रजीत भगत, डॉ. दिलीप भिसे, प्रा. जगन्नाथ तत्तापुरे, डॉ. विठ्ठल केदारी, प्रा. अनंत मरकाळे. प्रा. डॉ. सवाई अमोल, प्रा. प्रताप जाधव, प्रा. प्रशांत जगताप, प्रा. जयश्री डाके, प्रा. सुजाता पाटील कार्यालयीन अधिक्षक लक्ष्मण वाघमारे तसेच विद्यार्थ्यांबरोबरच श्री योगेश्वरी शिक्षण संस्थेचे पदाधिकारी प्रा. एस. के. जोगदंड, सामाजिक कार्यकर्ते अंकुशराव ढोबळे, पत्रकार रणजित डांगे प्रा. कदम आदी उपस्थित होते.

**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त व्याख्यान**

'समतेचे मूल्य नाकारण्यासाठी समरसतेचे ढोंग केले जातेय. संविधानाला विरोध करणारे, ते बदलू पहाणारे लोक आज सत्तेत बसले आहेत. त्यामुळे संविधानाची मिरवणूक काढण्यापेक्षा संविधान आज प्रत्येकाच्या मनात रूजवावे लागेल. भारतीय संविधानातील मूल्ये नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रबोधन करावे लागेल. कारण, हा देश वाचवायचा असेल तर संविधान वाचले पाहिजे' असे प्रतिपादन सुरेश सावंत (मुंबई) यांनी केले. त्याचे व्याख्यान मंगळवार, दि. १७ एप्रिल २०१८, सायं. ५ वाजता विलासराव देशमुख सभागृहात आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. एस. के. जोगदंड तर विचारपीठावर केजचे माजी आमदार पृथ्वीराज साठे, दत्ता बाळसराफ (कार्यक्रम संयोजक, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई), डॉ. नरेंद्र काळे (यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई केंद्र अंबाजोगाईचे सचिव) यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रमुख वक्ते सुरेश सावंत यांनी 'भारतीय संविधानासमोरील आव्हाने' या विषयावर आपले मौलिक विचार मांडले. सावंत म्हणाले, आज सभोवतालचे वर्तमान अस्वस्थ आहे. 'ऐपतीप्रमाणे शाळा' हे नवे धोरण आले आहे. स्वायतत्ता दिली जात आहे. ज्यांना आरक्षण तेही त्रस्त व ज्यांना आरक्षणच नाही तेही त्रस्त आहेत. व्यक्तीऐवजी जात व धर्म महत्वाचे ठरू लागलेत. वैयक्तिक जीवनात अद्यापही लोकशाही आली नाही. भारतीयांसमोर मुळ घटना आली पाहिजे. विषमता संपवली पाहिजे.' सावंत यांनी संविधान प्रास्ताविकेतील प्रत्येक शब्दाचा अर्थ सांगून श्रोत्यांनी विचारलेल्या विविध प्रश्नांना उत्तरेही दिली. अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना प्रा. एस. के. जोगदंड यांनी संविधान बदलू पहाणारे लोक सत्तेत आल्याने गेल्या चार वर्षांत वंचित घटकांतील विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती तसेच व्यावसाईक अभ्यासक्रमाची फी बंद केली आहे. एकीकडे बाबासाहेबांचे स्मारक, पुतळे उभे करायचे; तर दुसरीकडे आंबेडकरी, अल्पसंख्याक समाजाला

दडपणे सुरू आहे. हिंदुत्ववादी विचारांना भारतीय संविधान हेच अडचण वाटू लागल्याचे मत प्रा. एस. के. जोगदंड यांनी मांडले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करून दत्ता बाळसराफ (कार्यक्रम संयोजक, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान- मुंबई), यांनी सभागृहाला प्रमुख वक्त्यांचा परिचय करून दिला. सूत्रसंचालन अभिजीत जोंधळे यांनी केले. उपस्थितांचे आभार मानताना यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान- मुंबई, केंद्र अंबाजोगाईचे सचिव डॉ. नरेंद्र काळे म्हणाले, 'भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२७ व्या जयंतीनिमित्त प्रतिष्ठानच्या वतीने आज व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला अंबाजोगाईकरांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिल्याने पुढील काळात याच विषयांवर कार्यशाळा घेण्याचा प्रयत्न करू', अशी ग्वाही डॉ. काळे यांनी यावेळी दिली.

प्रारंभी मान्यवरांनी दीपप्रज्ज्वलन करून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस अभिवादन केले. अनंत कांबळे यांनी भारतीय संविधान प्रास्तविकेचे वाचन केले. विचारपीठावरील मान्यवरांचे स्वागत डॉ. नरेंद्र काळे (सचिव), दगडू लोमटे (उपाध्यक्ष), डॉ. राहुल धाकडे (सदस्य), मुजीब काझी (सदस्य) यांनी केले. स्व. प्रा. सुर्यकांत मोहरीर यांना सभागृहाने दोन मिनिटे मौन पाळून भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी सभागृहात यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान- मुंबई केंद्र अंबाजोगाईचे सदस्य अमर हबीब, अनिकेत लोहिया, रणजीत मोरे, आशिष जाधव, गोविंद टेकाळे, कृष्णा सापते यांच्या सह प्रा. नानासाहेब गाठाळ, अंकुशराव काळदाते, अॅड. अनंतराव जगतकर, डॉ. साहेबराव गाठाळ, प्रा. डि. जी. धाकडे, शिवाजी खोगरे, भगवानराव बप्पा शिंदे, अंगदराव तट, बन्सी जोगदंड, प्रा. गौतम गायकवाड, रविकिरण देशमुख, पत्रकार रणजित डांगे, विश्वंभर वराट, विद्याधर पांडे, संतराम कराड, डॉ. देवराज चामनर, लंकेश वेडे, सखदेव भुंबे, अंकुश ढोबळे, धीमंत राष्ट्रपाल, अशोक पालके, अमृत महाजन, वैजेनाथ शेंगुळे, प्रा. इंद्रजित भगत आदींसहित अंबाजोगाई शहराच्या विविध क्षेत्रात कार्य करणारे मान्यवर, महिला, युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**यशवंत बाल चित्रपट चावडीः**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, विभागीय केंद्र - अंबाजोगाईच्या वतीने दिनांक १५ मे २०१८ ते १७ मे २०१८ या कालावधीत 'यशवंत बाल चित्रपट चावडी'चे आयोजन करण्यात आले होते. या चित्रपट चावडीमध्ये किशोरवयीन मुलांना चित्रपटातून सुप्त गुण, त्यांना देशाच्या वास्तवाची कल्पना यावी, यासाठी काही ठराविक चित्रपटांची निवड करण्यात आली होती. यावेळी बाल चित्रपट चावडी मध्ये 'आय अॅम कलाम' हा एक राजस्थानमधील बालकामगारावर आधारित चित्रपट दाखवण्यात आला. या चित्रपटामध्ये राजस्थान येथील संस्कृतीचे दर्शन, बालकामगाराची दाहकता, शिक्षण घेण्याची जिद्द, स्वप्न, आदी गोष्टी दाखवण्यात आल्या. दुसरा चित्रपट 'फादर अँड डॉटर' दाखवण्यात आला. या चित्रपटातून मुलांनी कशा पद्धतीने वागावे, कशा पद्धतीने जगावे, हे दाखवण्यात आले.

तिसरा चित्रपट 'जलपरी' होता. यामध्ये दोन लहान बहिण-भावाची कथा दाखवण्यात आली, ग्रामीण भागात मुलींना समाजात कशी हीन वागणूक मिळते, हे यात दाखवण्यात आले. यामध्ये ग्रामीण भागात कशापद्धतीने अंधश्रद्धा जोपासल्या जातात, याची दाहकता दाखवण्यात आली. स्त्री भ्रूणहत्या कशाप्रकारे समाजात गैरसमज पसरवून केली जाते, हे या चित्रपटात दाखवण्यात आले. चौथा चित्रपट 'जुता' दाखवण्यात आला. यामध्ये शाळेतील एका गरीब विद्यार्थ्याची परिस्थिती जाणीव व शिक्षणाची आवड दाखवून मुलांचे मनोरंजन करण्यात आले.

बाल चित्रपट चावडी मध्ये रोज ५५ ते ६० किशोरवयीन व बालगटातील मुलांनी चित्रपटाचा आनंद घेतला. चित्रपट दाखवल्यानंतर चित्रपटामधील कथेवर मुलांमधील तर्क, आवडलेले पात्र, आदींवर चर्चा घडवून आणली गेली. बाल चित्रपट चावडी यशस्वी करण्यासाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान- मुंबई, विभागीय केंद्र अंबाजोगाईचे सचिव डॉ. नरेंद्र काळे, कोषाध्यक्ष अभिजीत जोंधळे, रणजित मोरे, गोंविद टेकाळे, आशिष जाधव, केदार वाघमारे, सुमंत केदार, कृष्णा सापते, सलीम शेख आदींनी परिश्रम घेतले.

# ठाणे केंद्र

## कार्यवृत्त

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान-मुंबई, ठाणे जिल्हा केंद्र आणि संजीवनी आदिवासी ग्रुप, डोंबिवली यांच्या संयुक्त विद्यमाने हाजीमलंग गडाच्या पायथ्याशी असलेल्या दुर्गम परिसरातील शाळांमधील विद्यार्थ्यांना विविध वस्तूंचे वाटप करण्यात आले. खोंड्याचा पाडा, जांभुळपाडा, विकासवाडी, नवसुची वाडी व ह्याची वाडी येथील जिल्हा परिषदेच्या शाळांमधील १०० विद्यार्थ्यांना गूळ, शेंगदाणे, डाळ, तांदूळ, साखर, लाडू, केक, रॉबिन्स, फुगे, ग्लुकोज बिस्किट्स, ब्लँकेट्स, जाजम, चादरी, कपडे यासारख्या दैनंदिन जीवनात गरजेच्या वस्तू वेगवेगळ्या दात्यांकडून गोळा करून देण्यात आल्या. त्यावेळी श्री. प्रविण वांदकर, श्रुती शिंदे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना योगाचे प्रशिक्षण प्रात्यक्षिकासह दिले. ठाणे जिल्हा केंद्राच्या कार्यकारिणीचे सदस्य डॉ. अरूण पाटील यांचा या कार्यक्रमातील सहभाग मोलाचा होता.

१२ मार्च २०१८ रोजी स्व. यशवंतराव चव्हाण साहेबांच्या जयंतीचे औचित्य साधून यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, ठाणे जिल्हा केंद्र व कोकण मराठी साहित्य परिषद (मध्यवर्ती) यांच्या संयुक्त विद्यमाने सायंकाळी ठीक ६ वाजता सहयोग मंदिर सभागृह, दुसरा मजला, घंटाळी, ठाणे (पश्चिम) येथे महाराष्ट्र शासनाचा विं.दा. करंदीकर जीवनगौरव सन्मानप्राप्त पद्मश्री मधु मंगेश कर्णिक यांचा हार्दिक सत्कार करण्यात आला. यावेळी ज्येष्ठ पत्रकार श्री. राधाकृष्ण नार्वेकर यांचा 'साहित्यकारण आणि राजकारण' या विषयावर मधुभाईशी दीर्घ मुक्त संवाद आयोजित करण्यात आला होता. ज्येष्ठ पत्रकार श्री. राधाकृष्ण नार्वेकर यांनी पद्मश्री श्री. मधु मंगेश कर्णिक यांना जे प्रश्न विचारले व त्यास कर्णिकसाहेबांनी दिलेल्या उत्तरांचा मतितार्थ खालीलप्रमाणेः

अभिव्यक्ती स्वातंत्र्य ही मागावयाची गोष्ट नाही आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याला कुणी प्रतिबंधही करावयाचा नसतो. व्यक्ती, गटांची किंवा प्रत्येक क्षेत्रातल्या कलाकारांची, पत्रकारांची, लेखकांची निर्मितीक्षमता ही नैसर्गिक असते. त्या निर्मितीक्षमतेवर, अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर बंधने घातली की काम बिघडते. म्हणून त्यावर बंधन घालणे चूक आहे. त्यामुळे सरकारने अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर बंधने घालू नयेत. मला व्यक्तिगत स्वातंत्र्याला कुंपण मान्य नाही. साहित्यिक, कलावंत शुद्धपणे कलाकृतीतून आपले मत मांडतो त्याला ते मुक्तपणे मांडू दिले पाहिजे. अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा मुद्दा चर्चेला असताना आणीबाणीच्या काळाविषयीचा प्रश्नही नार्वेकरांनी विचारला. या बाबत कर्णिकांनी असे मत मांडले की, आणीबाणी लादली गेली तेव्हा दुर्गा भागवत, पु. ल. देशपांडे यांना अटक करण्याचे साहस त्यावेळच्या सरकारने केले नाही. कारण त्यांना जनतेचा रोष पत्करावा लागला असता. तसेच साहित्यसंमेलनाचे अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख यांच्या साहित्यसंमेलनातील भाषणावर मत व्यक्त करताना आपल्या देशात लोकशाहीला ७० वर्षे झाली. लोकशाही स्थिर झाल्यावर एखाद्या साहित्यिकाने राजाला 'तू चुकत आहेस' असे सांगणे ही अत्यंत नैसर्गिक बाब आहे. त्यातून योग्य माणसाने योग्य धडा घ्यावा, असे सांगत त्यांनी देशमुख यांच्या मताचे कौतुक केले.

१ एप्रिल २०१८ रोजी सायंकाळी ठीक ५ वाजता ठाणे जिल्हा केंद्र व साद संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने नरेंद्र बल्लाळ सभागृह, ठाणे येथे ज्येष्ठ साहित्यिक श्री. अशोक शहाणे यांची मुलाखत ज्येष्ठ पत्रकार श्री. अंबरीश मिश्र यांनी घेतली. यावेळी श्री. अंबरीश मिश्र यांनी श्री. अशोक शहाणे यांना त्यांच्या पूर्वायुष्यावद्दल विचारणा केली व त्यांच्या प्रयोगशील लेखक होण्यामागची पार्श्वभूमी विचारली. तसेच लेखक केव्हा व का लिहितो, साहित्य, लघु अनियतकालिके, भाषा, अनुवाद प्रक्रिया आदी अनेक प्रश्नांचा त्यांच्या भडिमार केला. त्याला श्री. शहाणे यांनी मासलेवाईक उत्तरे दिली.

श्री. अशोक शहाणे म्हणाले,'माझ्यावर कुठल्याही साहित्यिकाचा प्रभाव नाही. भाषा ही बोलण्याची गोष्ट आहे,

लिहिण्याची नाही. आभिव्यक्ती स्वातंत्र्याबद्दल बोलताना हे पुर्वीपासूनच चालू आहे. अगदी तुकाराम महाराजांच्या वह्या बुडविणे हे त्याचेच उदाहरण! प्रत्येक लेखक स्वतंत्र असतो, त्याप्रमाणे त्याचा वाचकही स्वतंत्र असतो. मात्र राजकीय विचार मांडताना त्यात उथळपणा नसावा. बंगाली भाषेतून उत्तम साहित्य मराठीत आणणाऱ्या शहाणे यांनी अनुवाद प्रक्रियेविषयीचे अनुभव सांगितले. ज्या भाषेत अनुवाद करावयाचा आहे त्या भाषेची स्वतंत्र शैली ओळखूनच अनुवाद व्हायला हवा, असते म्हणाले कार्यक्रमाला लोकसत्ताचे संपादक श्री. गिरीश कुबेर, महाराष्ट्र टाईम्सचे श्री. प्रकाश अकोलकर, आभिराम भडकमकर, राजा ढाले, प्रा. प्रज्ञा दया पवार, प्रतिष्ठानचे श्री. दत्ता बाळसराफ, वृत्तपत्रांचे प्रतिनिधी तसेच ठाण्यातील मान्यवर साहित्यिक व रसिक उपस्थित होते.




# देवराष्ट्रे केंद्र

## कार्यवृत्त

मा.यशवंतराव चव्हाण जन्मघर स्मारक देवराष्ट्रे येथे, २६ जून २०१४ पासून येणाऱ्या सर्व पर्यटकांची रजिस्टर नोंद ठेवण्यात आली आहे. रजिस्टरमध्ये प्रत्येक दिवसाची नोंद वेगळी घेतली आहे. पर्यटकांचे नाव, फोन नं., गाव, अभिप्राय, सही इत्यादीप्रमाणे.

मा.चव्हाण साहेबांचे जन्मघर पाहण्यासाठी (१ फेब्रुवारी २०१८ ते ३१ मे २०१८) विविध ठिकाणच्या ९८० पर्यटकांनी भेट दिली आहे. त्यांचे अभिप्राय देखील चांगले आहेत. काही बाबतीत सुधारणा करावयास सांगितल्या आहेत. काहींनी त्यांच्या वापरातील वस्तू ठेवण्यास सांगितल्या आहेत. याच कालावधीत जन्मघर स्मारकास विविध ठिकाणच्या जिल्हा परिषद शाळेच्या ७० विद्यार्थ्यांनी भेटी दिल्या. विद्यार्थ्यांना 'यशवंतराव चव्हाण' हे व्यक्तिमत्व पुस्तकात माहीती होते परंतु जन्मघर स्मारकात आल्यानंतर यशवंतरावांचे काम, कीर्ती त्यांना माहीती झाली. संपूर्ण इतिहास त्यांना पाहावयास मिळाला. यशवंतराव चव्हाण साहेबांच्या विचाराने व प्रेरणेने येणाऱ्या पर्यटकांचे मन हेलावले जाते. त्यांच्याकडून जन्मघरातील माती कपाळी लावून नमस्कार केला जातो. या पर्यटकांना मा. चव्हाण साहेबांची भाषणे ऐकवली जातात व एक लहान चित्रफीत देखील दाखवली जाते. चव्हाण साहेबांची जडण घडण पाहून एका साध्या कुटुबांतील सर्वसामान्य माणूस एवढया मोठ्या पदावर जातो याचे उदाहरण म्हणजे यशवंतराव चव्हाण असे उद्‍गार देखील पर्यटक काढत असतात. त्यांचा आदर्श भावी पिढीने घ्यावा तसेच आताच्या सर्व राजकीय नेत्यांनीही घ्यावा, निस्वार्थीपणाने समाजकार्य करावे, असे जर राजकारण्यांनी केले तर महाराष्ट्र अजून किती पुढे जाईल असे उद्‍गार काढले जातात.

**त्याच बरोबर या चार महिन्यांच्या कालावधीत विविध ठिकाणांवरून काही शासकीय व प्रशासकीय अधिकाऱ्यांनी देखील भेटी दिल्या त्या पुढीलप्रमाणे :**

- दि.२८/२/२०१८ सौ.लीना बाळा नांदगावकर मुंबई.
- दि.११/३/२०१८ डॉ. पी.डी.पाटील (चान्सलर डी.वाय. पाटील युनिव्हर्सिटी पिंपरी पुणे)
- द.१२/३/२०१८ श्री.राम खांडेकर (यशवंतराव चव्हाण साहेबांचे सेक्रेटरी)
- दि.१२/३/२०१८ मुक्ता दाभोळकर (अंधश्रद्धा निर्मूलन समिती, मुंबई)
- दि.३०/३/२०१८ श्री. बाबासाहेब भांडारे (शिक्षणाधिकारी जि.प.कोल्हापूर)
- दि/१०/४/२०१८ श्री. संतोष घोळवे (स.पो.नि.पोस्ट वाकड पुणे शहर)
- दि.२६/४/२०१८ श्री. डॉ. विलास जगताप पुणे
- दि.२९/४/२०१८ राही भिडे (मुख्य संपादक दै. पुण्यनगरी मुंबई)

# यशवंतराव चव्हाण राज्य पारितोषिक पुरस्कारप्राप्त मान्यवर

| सन | पारितोषिक विजेता | पारितोषिक |
|---|---|---|
| १९९० | मा. तात्यासाहेब कोरे | कृषी-औद्योगिक समाजरचना पारितोषिक |
| १९९१ | मा. बाबा आढाव | सामाजिक एकात्मता पारितोषिक |
| १९९२ | मा. विजय बोराडे | ग्रामीण विकास पारितोषिक |
| १९९३ | मा. नारायण सुर्वे | मराठी साहित्य-संस्कृती पारितोषिक |
| १९९४ | मा. आप्पासाहेब चमणकर | कृषी-औद्योगिक समाजरचना पारितोषिक |
| १९९६ | श्रीमती शांताबाई दाणी | सामाजिक एकात्मता पारितोषिक |
| १९९६ | मा. अरूण निकम | ग्रामीण विकास पारितोषिक |
| १९९७ | मा. शंकरराव खरात | मराठी साहित्य-संस्कृती पारितोषिक |
| १९९८ | डॉ. जयंतराव पाटील | कृषी-औद्योगिक समाजरचना पारितोषिक |
| १९९९ | मा. दादासाहेब रूपवते | सामाजिक एकात्मता पारितोषिक |
| २००० | सर्च-शोधग्राम, गडचिरोली | ग्रामीण विकास पारितोषिक |
| २००१ | कवयित्री शांता शेळके | मराठी साहित्य-संस्कृती पारितोषिक |
| २००२ | ‘प्रयोग’ परिवार | कृषी-औद्योगिक समाजरचना पारितोषिक |
| २००३ | डॉ. यू. म. पठाण | सामाजिक एकात्मता पारितोषिक |
| २००४ | डॉ. चित्रा नाईक | ग्रामीण विकास/आर्थिक-सामाजिक विकास |
| २००५ | पं. भीमसेन जोशी | मराठी साहित्य-संस्कृती/कला, क्रीडा पारितोषिक |
| २००६ | श्री. भंवरलाल जैन | कृषी-औद्योगिक समाजरचना/व्यवस्था प्रशासन पारितोषिक |
| २००७ | श्री. अनिल काकोडकर | सामाजिक एकात्मता विज्ञान-तंत्रज्ञान पारितोषिक |
| २००८ | प्राचार्या लीला पाटील | ग्रामीण विकास/आर्थिक-सामाजिक विकास |
| २००९ | श्रीमती किशोरी आमोणकर | मराठी साहित्य-संस्कृती/कला, क्रीडा पारितोषिक |
| २०१० | श्री. सा. रे. पाटील | कृषी-औद्योगिक समाजरचना/ व्यवस्था प्रशासन पारितोषिक |
| २०११ | मराठी विज्ञान परिषद, मुंबई | सामाजिक एकात्मता विज्ञान-तंत्रज्ञान पारितोषिक |
| २०१२ | मातृमंदिर, देवरुख, रत्नागिरी | ग्रामीण विकास/आर्थिक-सामाजिक विकास |
| २०१३ | मा. श्री. गोविंदराव तळवलकर | मराठी साहित्य संस्कृती/कला, क्रीडा पारितोषिक |
| २०१४ | मा. श्री. शरद जोशी | कृषी-औद्योगिक समाजरचना/व्यवस्था प्रशासन |
| २०१५ | श्रीमती अरुनिमा सिन्हा | मराठी साहित्य-संस्कृती/कला, क्रीडा पारितोषिक |
| २०१६ | श्री. प्रतापशेठ साळुंखे | ग्रामीण विकास/आर्थिक सामाजिक विकास |
| २०१७ | श्री. भुजंगराव कुलकर्णी | कृषि औद्योगिक समाज रचना/व्यवस्थापन प्रशासन |

# यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कारप्राप्त मान्यवर

| अ. नं. | वर्ष | पुरस्कार प्राप्त मान्यवराचे नाव |
|---|---|---|
| १ | १९९५ | प्राध्यापक मधु दंडवते |
| २ | १९९६ | श्री. बियांत सिंग- मरणोत्तर |
| ३ | १९९७ | डॉ. सी. सुब्रमण्यम् |
| ४ | १९९८ | श्रीमती इला भट |
| ५ | १९९९ | श्रीमती आवाबाई वाडिया |
| ६ | २००० | श्री. सुंदरलाल बहुगुणा |
| ७ | २००१ | डॉ. व्ही. कुरियन |
| ८ | २००२ | डॉ. जयंत नारळीकर |
| ९ | २००३ | श्री. आर. के. लक्ष्मण |
| १० | २००४ | न्या. व्ही.आर. कृष्णा अय्यर |
| ११ | २००५ | श्री. सॅम पित्रोदा |
| १२ | २००६ | श्री. नारायण मूर्ती व सौ. सुधा मूर्ती |
| १३ | २००७ | श्री. आर. के पचौरी व श्रीमती सरोज पचौरी |
| १४ | २००८ | इस्रो - (इंडियन स्पेस रिसर्च ऑर्गनायझेशन) |
| १५ | २००९ | प्रो. यश पाल |
| १६ | २०१० | श्रीमती महाश्वेता देवी |
| १७ | २०११ | एअर चीफ मार्शल श्री. अर्जुनसिंग |
| १८ | २०१२ | डॉ. ई. श्रीधरन |
| १९ | २०१३ | श्री. झुबिन मेहता |
| २० | २०१४ | श्री. रतन टाटा |
| २१ | २०१५ | डॉ. विजय केळकर |
| २२ | २०१६ | श्री. नंदन निलेकणी |
| २३ | २०१७ | डॉ. एम. एम. शर्मा |

# प्रतिष्ठानची विक्रीसाठी असलेली प्रकाशने

| | | |
|---|---|---|
| १. | यशवंतराव चव्हाण : विधिमंडळातील निवडक मराठी भाषणे : भाग १ – संकलन : डॉ व्ही जी खोबरेकर | २५०.०० |
| २. | वाय. बी. चव्हाण : सिलेक्टेड स्पीचेस – विधिमंडळ – भाग २ – संकलन : डॉ. व्ही. जी. खोबरेकर | २५०.०० |
| ३. | सिलेक्टेड स्पीचेस इन पार्लमेंट – वाय. बी. चव्हाण – खंड १ ते ४ संपादक : राम प्रधान प्रत्येकी | २५०.०० |
| ४. | यशवंतराव चव्हाण यांचे मौलिक विचार संकलन – ना. धों. महानोर | १.०० |
| ५. | सह्याद्री वारे – यशवंतराव चव्हाण | २५०.०० |
| ६. | म. जोतिबा फुले यांचे निवडक विचार संकलन – प्रा. गजमल माळी | १२.०० |
| ७. | बेकारी निर्मूलनातून ग्रामीण विकास – संपादक – वि. स. पागे | ३५.०० |
| ८. | महाराष्ट्रातील दुष्काळ आणि जलसंपत्तीचे नियोजन – संपादन : अण्णासाहेब शिंदे | २००.०० |
| ९. | महाराष्ट्र : एक दृष्टिकोन – शरदराव पवार – भाषणसंग्रह – संपादन : दादासाहेब रुपवते | ७५.०० |
| १०. | पंचायत राज, जिल्हा नियोजन आणि ग्रामीण विकास संपादन : पी. बी. पाटील | १००.०० |
| ११. | नवभारत : परिवर्तनाची दिशा – संपादन : पी. बी. पाटील | |
| १२. | विमुक्तायन : महाराष्ट्रातील विमुक्त जमाती : चिकित्सक अभ्यास संशोधक / लेखक – लक्ष्मण माने | २५०.०० |
| १३. | महिलांसंबंधीचे धोरण : स्वयंसिद्धतेकडे वाटचाल – डॉ. नीलम गोऱ्हे | १५.०० |
| १४. | यशवंतराव चव्हाण – चरित्र – लेखक – अनंतराव पाटील | ८०.०० |
| १५. | शब्दाचे सामर्थ्य – संपादन : राम प्रधान | ३७५.०० |
| १६. | महाराष्ट्राची चार दशकांतील वाटचाल : एक आढावा (इंग्रजी) (यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई व महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळ यांचे संयुक्त प्रकाशन) | २५०.०० |
| १७. | बाउंटीफुल बनियान – डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील चरित्र – खंड ४ (इंग्रजी) बॅ. पी. जी. पाटील | ८००.०० |
| १८. | ज्येष्ठ नागरिकांसाठी पुस्तिका | ३५.०० |
| १९. | अजिंठा – (काव्यसंग्रह) लेखक : ना. धों. महानोर (इंग्रजी) | १५०.०० |
| २०. | ‘ई’बुक (मराठी/इंग्रजी) (यशवंत साहित्य / फोटो) | १५०.०० |
| २१. | न्यायालयीन व्यवहार आणि मराठी भाषा | ४००.०० |
| २२. | शैक्षणिक गुणवत्ता : आव्हान आणि आवाहन – डॉ. वसंत काळपांडे | २००.०० |
| २३. | हवामान बदल आणि महाराष्ट्र | ५०.०० |
| २४. | उपक्रम : वेचक-वेधक – डॉ. वसंत काळपांडे | १००.०० |
| २५. | स्त्रीरत्न सावित्रीबाई फुले – श्रीनिवास भालेराव | २०.०० |
| २६. | स्त्रियांचे कायदे, आरोग्य आणि योजना – सुप्रिया सुळे | २०.०० |
| २७. | ‘संवादिनी’ – सुप्रिया सुळे | २०.०० |
| २८. | ‘शाळांचे प्रगतिपुस्तक’ डॉ. वसंत काळपांडे, बसंती रॉय, शुभदा चौकर | २००.०० |
| २९. | Yashwantrao Chavhan : an Autobiography | ३९५.०० |

| | |
|---|---|
| ३०. यशवंतराव चव्हाण आत्मचरित्र – कृष्णाकाठ | ३००.०० |
| ३१. यशवंतराव चव्हाण व्यक्तिमत्त्व आणि कर्तृत्व | ५००.०० |
| ३२. शिक्षणवृत्ती – डॉ. कुमुद बन्सल | २००.०० |
| ३३. शिक्षणकट्टा – बसंती रॉय | २००.०० |
| ३४. वाटचाल ई–शिक्षणाची – बसंती रॉय | २००.०० |
| ३५. हवामान बदलास आमचे उत्तर | १००.०० |
| ३६. विचारसूत्रे – संपादन : पद्मभूषण देशपांडे | २००.०० |
| ३७. पाणीबाणी – प्रभाकर साळेगावकर | १६०.०० |
| ३८. पर्व–प्रगतीचे परिवर्तनाचे – पद्मभूषण देशपांडे (मराठीबरोबरच हिंदी, इंग्रजी, ऊर्दूतही उपलब्ध) | खाजगी वितरणासाठी |
| ३९. Whats App चर्चा– शिक्षण विकासाच्या – संपादक : माधव सुर्यवंशी, नितीन खंडागळे, किशोर भागवत | २००.०० |

- डीव्हीडी व ऑडीओ कॅसेट्स
- मी एस. एम. : एस. एम. जोशी यांचा जीवनपट
- तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा जीवनपट
- प्रवासी पक्षी : सुप्रसिद्ध साहित्यिक कुसुमाग्रज यांचा जीवनपट
- पु. ल. वृत्तान्त : पु. ल. देशपांडे यांचा जीवनपट
- वरील चारही व्हिडिओ कॅसेट्सची निर्मिती दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांची
- कॉ. केशवराव जेधे : कॉ. केशवराव जेधे यांचा जीवनपट, दिग्दर्शक – श्री. राम गबाले
- येस आय ॲम कम्युनिस्ट : कॉ. श्रीपाद अमृत डांगे यांच्या जीवनावरील अनुबोधपट, दिग्दर्शक : विनय नेवाळकर
- 'बशर नवाज : ख्वाब, जिंदगी और मै' माहितीपट, दिग्दर्शक – जयप्रद देसाई
- 'जागर हा जाणिवांचा....' लघुपट, दिग्दर्शक – चंद्रकांत कुलकर्णी
- 'कृष्णाकांठ' : ऑडीओ सी. डी. (ध्वनिमुद्रिका)

**चित्रपट**

- यशवंतराव चव्हाण... बखर एका वादळाची : दिग्दर्शक – जब्बार पटेल

**यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई निर्मित संकेतस्थळे**

- यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे संकेतस्थळ – http://ybchavanpratishthan.org/
- यशवंतराव चव्हाण यांचे समग्र संदर्भ साहित्य – http://ybchavan.in
- धर्मानंद कोसंबी यांचे समग्र साहित्य – http://dharmanandkosambi.com/
- केतकरकृत महाराष्ट्रीय ज्ञानकोश – http://ketkardnyankosh.com/
- महर्षि विठ्ठल रामजी शिंदे समग्र साहित्य – http://virashinde.com/
- इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंडळाकडे उपलब्ध दुर्मीळ कागदपत्रांचे डिजिटायझेशन – http://vkrajwade.com











**वयोश्री योजना**

ज्येष्ठ नागरिकांना वयोपरत्वे येणाऱ्या अपंगत्वाची तपासणी अणि त्यानुसार लागणाऱ्या यंत्र/साहित्याचे वाटप

राष्ट्रीय वयोश्री योजना
RASHTRIYA VAYOSHRI YOJANA

यशवंतराव चव्हाण
प्रतिष्ठान, मुंबई

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, नवमहाराष्ट्र युवा अभियान आयोजित



## राज्यस्तरीय महाविद्यालयीन
# नियतकालिक स्पर्धा २०१८

नियतकालिक स्पर्धा
नियतकालिक स्पर्धा
नियतकालिक स्पर्धा

### पारितोषिक वितरण कार्यक्रम

- **प्रथम पारितोषिक**
  रु. १०,०००/- चा धनादेश, स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र
- **द्वितीय पारितोषिक**
  रु. ७,०००/- चा धनादेश, स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र
- **तृतीय पारितोषिक**
  रु. ५,०००/- चा धनादेश, स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र
- **उत्तेजनार्थ (दोन बक्षिसे)**
  रु. ३,०००/- चा धनादेश, स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र



**प्रथम** | कर्मवीर रामरावजी आहेर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,देवळा, जि. नाशिक



**द्वितीय** | नागेश कराजगी ऑर्किड कॉलेज ऑफ इजिनीअरिंग ॲण्ड टेक्नोलॉजी, सोलापूर.



**तृतीय** | विद्याभारती महाविद्यालय, अमरावती.



**उत्तेजनार्थ** | नूतन विद्या प्रसारक मंडळाचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, लालसगांव, जि. नाशिक



**उत्तेजनार्थ** | राधाबाई काळे महिला महाविद्यालय, अहमदनगर